
३० डिसेंबर
१९६७
४० पैसे

# माणूस



कोलंबसाची गर्वगीते गाण्यासाठी

चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती

कथा या खुळ्या सागराला

"अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा

किनारा तुला पामराला"

— कुसुमाग्रज

कोलंबसाचे गर्वगीत

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : एकतिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

स. न. ८–१२–६७

आपल्या लोकप्रिय साप्ताहिकातील 'पुरंदरच्या बुरजावरून' हे सदर आपण दिवाळी अंकानंतरच्या अंकापासून बंद करून टाकले ह्याबद्दल फार आश्चर्य वाटले व मन बेचन झाले. ह्या सदरातील गोष्टी वाचून माझे भाचे व पुतणे थरारून जात. आपणही काहीतरी पराक्रम करावा अशी इर्षा त्यांच्या मनात निर्माण होई. हे सदर बंद करून आपण लहान मुलांची दारुण निराशा केलीत.

अशोक प्रधान, दादर.

[ 'पुरंदरच्या बुरजावरून' हे सदर १५ ऑगस्ट ते दिवाळीपर्यंत सहा महिन्यासाठी योजले होते. पुन्हा सुरू करण्याचे प्रयत्न चालू आहेत. –संपादक ]

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

आपला देश गरीब आहे हे एक सत्य आहे.
आपला देश 'मागासलेला' आहे हे एक अर्धसत्य आहे.

आमचे उद्योगधंदे मारून, पुन्हा ते कधीही वर येऊ नयेत म्हणून इंग्रजांनी 'हा देश शेतीप्रधान आहे' हा भ्रम दीडशे वर्षांपूर्वी आपल्या साम्राज्याच्या सुरक्षिततेसाठी येथे हेतुपुरस्सर पसरवला, दृढमूल केला. आमचेही पुस्तकी पोपट बोलू लागले, 'खरंच, हा देश शेतीप्रधानच आहे.' म्हणजे आपला औद्योगिक वारसा विसरून आम्ही चिरकाल कच्चा माल निर्यात करून पक्क्या मालाची वसाहत बनून निपचीत पडून राहावे हा परकीयांचा उद्देश आम्हीच सिद्धीस नेऊ लागलो.

आज इतिहासाची अशीच पुनरावृत्ती सुरू आहे. स्वतंत्र होऊन वीस वर्षे झाली तरी अजून आम्ही 'मागासलेले' आहोत हे ऊठसूट आम्हांला ऐकवले जात आहे. हा शब्द फारच बोचत असेल तर घ्या, 'विकसनशील देश' हा जरा सभ्य किताब ! अर्थ एकच-स्वतःला विसरा, आपल्या नैसर्गिक साधनसामग्रीची आबाळ करा, परक्याला घरात हातपाय पसरू द्या, श्रीमंत राष्ट्रांच्या तयार मालाची कायमची बाजारपेठ बनून राहा. आयात जास्त, निर्यात कमी. तूट भरून काढण्यासाठी भीक. पण स्पर्धेसाठी मैदानात उतरू नका. हा विकसनशील देश असल्याने याला बराच काळ आधुनिक यंत्रतंत्रासाठी दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागणारच ! यासाठी मदत घ्या, कर्ज मागा, काही सहयोग–सहकार्य वगैरे जमवा, वाटल्यास भीकही मिळेल. या आश्रितपणाची लाजखंत कशासाठी ?

अशाने आमची गरिबी हटेल, मागासलेपणाचा आमच्यावरचा डाग पुसला जाईल, अशी ज्या विद्वानांची समजूत असेल त्यांची असो बापडी. वास्तवात ही एक शुद्ध फसवणूक आहे. स्वतःची कदाचित् नसेल; पण देशाची निश्चित आहे.

# चला..

गरिबी हटवण्याचा, पुढारलेले राष्ट्र म्हणून जगण्याचा राजमार्ग म्हणजे प्रयत्न आणि परिश्रम. स्वावलंबनाशिवाय गरिबाला दुसरा आधार नाही हा एक अपरिवर्तनीय निसर्गनियम आहे. हे सत्य दृष्टिआड करून, परिश्रमांचा राजमार्ग सोडून गेली वीस वर्षे आपण कुठल्या मृगजळामागे भरकटत आहोत, याचा काही विवेक ?

दारिद्र्याशी समोरासमोर झुंज घ्यावी, त्यासाठी अवश्य असणारे ज्ञानविज्ञान, यंत्रतंत्र येथे जन्माला घालावे, येथली शक्तिबुद्धी आणि नैसर्गिक साधनसामग्री यांचा काही मेळ साधावा, घासूनपुसून, वेळप्रसंगी पणाला लावून येथले स्वाभाविक सामर्थ्य वाढवावे, येथली प्रतिभा जागी करावी, खुलवावी, विस्तारावी आणि जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत तिचा लौकिक नेऊन भिडवावा ही जिद्दच येथे नाहीशी झाली. आयते तंत्र आयात करून झटपट गबर होण्यात येथील कारखानदारांना भूषण वाटू लागले, आयते अन्न आणून येथील दुष्काळ आणि उपासमार थांबवण्यात येथील राज्यकर्त्यांना कसलाही कमीपणा वाटेनासा झाला. आडमार्गाने, दुसऱ्याच्या ज्ञानावर व श्रमावर डल्ला मारून झटपट सुखी व श्रीमंत होण्याची स्वप्ने दिल्लीपासून गल्लीपर्यंत सर्वांनाच पडू लागली. श्रम नाहीत, साहस नाही. आयते जगण्याजेवण्याची चीड नाही. पौरुषाचा ऱ्हास अटळ होता आणि आता तर तो सर्वत्र अगदी गृहीतच धरला जातो.

परवाची घटना. ' भारतीय साहित्या'वर व्याख्याने देण्यासाठी नुकतेच एक बंगाली विद्वान–लोकनाथ भट्टाचार्य–फ्रान्समध्ये गेले होते. पॅरीसमधल्या त्यांच्या व्याख्यानाच्या शेवटी अठरा वर्षांच्या एका तरुणाने (पदार्थविज्ञानाचे नोबेल पारितोषिक मिळवणाऱ्या एका शास्त्रज्ञाचा तो नातू होता) नम्रपणे विचारले, " आपले धान्यही न उत्पादणाऱ्या देशास कल्पना-विचार-साहित्य प्रांतात म्हणण्यासारखं काही निर्मिती येईल असं तुम्हास खरंच वाटतं ? "



बंगालीबाबूंचे रवींद्रपुराण तिथेच संपले.

सर्वच क्षेत्रांतील आमचे परावलंबन वाढविणारे कसले हे नियोजन ! पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात अन्नधान्याव्यतिरिक्त आपण दीडशे कोटी रुपयांची परकीय मदत घेतली. दुसऱ्या योजनेसाठी नऊशे कोटी रुपये उचलले. तिसरीच्या कालखंडात आकडा गेला दोन हजार कोटींच्या घरात. चवथी, परकीय मदत किती मिळणार हे नक्की कळल्यावाचून सुरूच होऊ शकत नाही ही अवस्था ! मागच्या योजनेत खरेदी केलेली यंत्रसामग्री दुरुस्त राखण्यासाठी पुढच्या योजनेतील नवीन तरतुदी आणि त्यासाठी पुन्हा नवीन परकीय मदत, असे हे न थांबणारे चक्र आहे. गेल्या दहा वर्षांत देशात प्रस्थापित आलेल्या मूलभूत उद्योगधंद्यांपैकी बहुतेक सर्व उद्योगधंदे अजूनही त्यांच्या उत्पादनाच्या २५ ते ५० टक्केपर्यंत परदेशी आयातीवर अवलंबून आहेत. हे देशाचे औद्योगीकरण की परदेशीकरण !

शेतीची व अन्नधान्याची कहाणी तर यापेक्षाही लाजीरवाणी. कृत्रिमरीत्या देशातील अन्नधान्याचे भाव खाली ठेवून समृद्धीची व वैपुल्याची खोटी व फसवी भावना देशात निर्माण करण्यासाठी ही परकीय अन्नमदत घेण्याची क्लृप्ती निघाली. गरजेपेक्षा तेव्हा पाच टक्के अन्नधान्य देशात कमी होते. भाव वाढले असते, गरीब वर्गात कदाचित् असंतोष फैलावला असता या भीतीने तूट भरून काढण्याचा हा आडमार्ग तेव्हा स्वीकारण्यात आला. सरळ मार्ग हा होता, की एकतर गरज कमी करणे किंवा उत्पादन वाढविणे. परंतु यासाठी शेतीव्यवस्थेच्या संपूर्ण पुनर्घटनेची, जोखीम पत्करावी लागली असती. ही आव्हाने कोण स्वीकारतो ! त्यापेक्षा आयातीचा बिनधोक मार्ग सोयीस्कर. पुढे या मार्गाची इतकी सवय झाली की इकडे समस्या उद्भवली, की झोळी मोठी पसरायची, इतकेच काम राज्यकर्त्यांना शिल्लक उरले. कधी वाढत्या लोकसंख्येला जबाबदार धरायचे, कधी चीन-पाकिस्तान युद्धाची निमित्त्ये सांगायची; काहीच नसले तर निसर्गाची अवकृपा आहेच. उत्पादन वाढले तरी तूट कायमच; त्या वेळी पाच टक्के होती, आता ती दहा टक्क्यांवर आली. यंदा तर पीकपाणी भरघोस आहे. आपल्या मानेवर बसलेला हा भिकेचा समंध उठवण्याची ही नामी संधी आहे. तरीही आम्ही अमेरिकेकडे पंचाहत्तर लाख टन अन्नधान्याची मागणी केलीच आहे. अमेरिका यातली निम्मी मागणी पूर्ण करणार आहे. प्रांतबंदी उठवलीत तर यापेक्षा अधिक भीक वाढू असे अमेरिकेकडून सूचित केले गेले असल्याची वार्ता आहे. आपल्या अंतर्गत कारभारात इतका उघडउघड हस्तक्षेप करून, आमच्या उरल्या सुरल्या प्रतिष्ठेचे अमेरिकेने अगदीच धिंडवडे काढू नयेत म्हणून मूळ पंचाहत्तर लाख टनांची मागणी साठ लाख टनांपर्यंत खाली आणण्याची केंद्रीय अन्नमंत्र्यांनी तयारी दाखवली आहे असेही कळते.

विवेकभ्रष्टांचा शतमुखांनी अध:पात होत असतो तो असा.

या प्रकारच्या नियोजनाला आता सुटी दिलीच पाहिजे. आमचे मनुष्यबळ,

आमची साधनसामग्री गतिमान करणारे, स्वावलंबनाच्या पायाशुद्ध आधारावर उभे असलेले स्वदेशी संयोजन आपल्याला हवे आहे. गरिबी निश्चित वाईट आहे व ती हटविली पाहिजे याविषयी दुमत नाही. पण रक्त, अश्रू आणि घाम यांशिवाय गरिबी हटविण्याचा दुसरा पर्याय अद्याप कुणाला कुठेही सापडलेला नाही हे आपण आता लोकांना आणि सरकारलाही हडसूनखडसून सांगितले पाहिजे. भांडवलशाही देश आर्थिक प्रलोभनाने हे कार्य साधतात, साम्यवादी देश हुकूमशाहीच्या वळावर ही श्रमशक्ती जागृत करतात. आपला घडगुजरी समाजवाद यापैकी काहीच करू शकत नाही. श्रमाच्या काटेरी मार्गाऐवजी भिकेचा आरामी आणि हरामी मार्ग आपण पत्करला; स्वाभिमान विकला, सोय पाहिली. परिणाम झाला देशाच्या पुरुषार्थ-शक्तीवरच. आपणच नाही, दोन तृतीयांश गरीब जग या सोयीस्कर पळवाटेने श्रीमंत होण्यासाठी बेभान धावत आहेत. कदाचित् काही दिवस, यापैकी काहींना श्रीमंती लाभेलही. पण त्यांच्या हातून पुरुषार्थ कधीही घडणार नाही. कारण पुरुषार्थाच्या मुळाशी असणारी आत्मशक्तीच येथे प्रथमपासून खच्ची होत आलेली आहे, पद्धतशीरपणे केली जात आहे.

तेव्हा हे परदेशी मदतीचे नवे साखळदंड आपण खटाखट तोडले पाहिजेत. निदान अन्नाबाबत तरी आत्ताच, या क्षणीच निर्णय घेऊ. दहा टक्केच तूट आहे ना ! हरकत नाही. मागवून घेऊ पण तावडतोब परकीय अन्नमदत थांबवा, असे शासनाला एकमुखाने सांगू. ती पावबिस्किटे आणि दुधाच्या पावडरी तर समुद्रात फेकून द्या. लहान वयात, कोवळ्या बालमनांवर कसले गुलामीचे, लाचारीचे घाणेरडे संस्कार करता! एकही 'श्यामची आई' निघू नये की जिने या पसरल्या जाणाऱ्या हातांवर चरचरून डाग द्यावा आणि मुलाची वेदना स्वतःलाही डागून घेऊन भोगावी !

**एक वेळ भूकबळी होऊ, पण हे भीकबळी होणे नाही, हे आता सर्वांनी ओरडून सांगितले पाहिजे.** शक्यता आहे की भूकबळी ठरण्याची वेळ येणार नाही. कारण दहा टक्के तूट आहे तर दहा टक्क्यांच्या आसपास नासधूसही आहे. जास्तीच पण कमी नाही. पाकिस्तानकडे, चीनकडे चोरट्या मार्गांनी किती धान्य जाते याचा काही हिशेब ! साठेबाजांविरुद्धही लोकमत जागृत केले पाहिजे. मग ही साठेबाजी श्रीमंत शेतकऱ्यांची असो, व्यापाऱ्यांची असो की शिऊकी अन्नधान्यांच्या राज्यांची असो. प्रांतबंदी आडवी येत असेल तर उठवली पाहिजे, जिल्हाबंदी तोडली पाहिजे. एकदा परकीय मदतीचे दोर कापले की पळ काढण्याला आपल्याला वाव राहणार नाही; युद्धपातळीवरून सर्वच शेतीव्यवस्थेच्या पुनर्घटनेचा विचार आपण सुरू करू. लढा नाही तर मरा असे दोनच पर्याय तेव्हा आपल्यासमोर असतील आणि शक्यता आहे, एखाद्या सूर्याजीच्या नाहीतर शेलारमामाच्या नेतृत्वाखाली गडावर स्वातंत्र्याचे आणि समतेचे निशाण फडकेल.

३० डिसेंबर १९६७

यासाठी आम्ही तरी निघायचे ठरविले आहे. ज्यांना शक्य आहे, येणे योग्य आहे असे वाटत आहे, ते येतील अशी आशा आहे. एक आवाज तर उठवू ! संघटना, पक्ष येतील न येतील, शासन ऐकेल न ऐकेल. पण इतकी विटंबना चालू असताना आपण निपचीत पडून राहिलो हे पाप तरी टाळू ! वेरूळच्या भव्य कैलासलेण्यापासून थेट मुंबईच्या चौपाटीपर्यंत चालत चालत, लोकांशी हे विचार बोलत बोलत, सभा घेत, प्रचार करीत जायचे आहे. निघण्याचा दिवस : २६ जानेवारी. तीस वर्षांपूर्वी रात्रीच्या तीरावर स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्र होण्याचे महान् स्वप्न जेव्हा देशाला पडले तो दिवस. हे स्वप्न अजूनही अपुरेच आहे. स्वतंत्र झालो. सार्वभौम आहोत की नाही याची शंका आहे. या सार्वभौमत्वाच्या साक्षात्कारासाठी, समर्थ राष्ट्रीयत्वासाठी, प्रचीतीच्या पुरुषार्थासाठी, आत्मसन्मानासाठी हे संचलन आहे. प्रवास थोडा जिकिरीचा आहे, सावकाशीचा आहे. हरकत नाही. हेच तर आपले म्हणणे आहे–सावकाश चालू, पण स्वतःच्या बळावर चालू. थोडा वेळ जास्त लागला तरी काही बिघडणार नाही. दुसऱ्यांचा आधार सोडला पाहिजे. फार काळ घेतला. आता घेतला तर कायमचे पांगळे राहू. ज्यांनी आधार दिला त्यांचे आभार मानू. यापुढे जे देऊ करतील त्यांना साभार नकार देऊ. म्हणू ‘ आमचे आम्ही पाहून घेऊ. धन्यवाद ’.

वाटेत होळीचा दिवस येईल. करू पुन्हा एकदा परदेशी वस्तूंची होळी. निदान त्या दूधभुकट्यांची नाहीतर अमेरिकन गव्हाची तरी ! सगळ्यांनी आले पाहिजे.

आणि २९ मार्चला मुक्काम मुंबई. वर्षप्रतिपदेला–नव्या वर्षाच्या नव्या दिवशी नव्या गुढ्या उभारू, नवे संकल्प उच्चारू; त्या अथांग दर्यात आपलीही स्वतंत्र अस्तित्वाची नाव निर्भयपणे लोटून देऊ. त्या वेळी आपल्या सर्वांच्या मुखात असतील ‘कोलंबसाची गर्वगीते’; आपल्या अंतःकरणातील स्फूर्ती असेल ‘ वंदे मातरम्... ’ वंदे मातरम्...



**या गर्वगीतांच्या आणि स्फूर्तीमंत्रांच्या सामगायनासाठी,**
**मित्रांनो ! चला**
**कैलास ते सिंधुसागर**
**एक-दोन एक-दोन एक-दोन एक...**
**संचलन सुरू होत आहे.**
**स्वयंचलनाचे पहिले पाऊल उचलले जात आहे.**
**श्री कै ला स ते सिं धू सा ग र...**

**श्री. ग. मा.**

# तांदळापेक्षा अक्षता महाग असतात...



**आम्ही**
**तुमच्या मुलीच्या लग्नाला**
**हमखास पैसे देऊ.**

नवऱ्या मुलीच्या डोक्यावर सर्वांच्या शुभाशीर्वादाच्या चार अक्षता पडतात. त्या अक्षतांची किंमत भारी असते. लग्न म्हणजे खर्च आलाच. किती काटकसर केली तरी खर्च हा येणारच.

विमा उतरवून ह्या साऱ्या खर्चाची अगदी सहज आणि निश्चित सोय आता करता येते. आपली मुलगी लहान आहे तेव्हाच थोडक्या हप्त्याची पॉलिसी घ्या. म्हणजे ठराविक वेळी ठरलेले पैसे निश्चित मिळतील आणि लग्नाच्या खर्चाची काळजी राहणार नाही.

आजच तुमच्या विमा एजंटाला भेटा.

**आयुर्विम्याला पर्याय नाही**

PRATIBHA 673

# दिल्ली दरबार

१९६७ हे वर्ष आता कालाच्या उदरात समाविष्ट होत आहे. भारतीय राजकारणाच्या दृष्टीने हे वर्ष फारच महत्त्वाचे ठरले. या वर्षास प्रारंभ झाला तेव्हा चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या दुंदुभी वाजू लागलेल्या होत्या. या चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीला महत्त्व प्राप्त होण्याला कारणेही तशीच घडत होती. स्वातंत्र्यप्राप्तीपासून या देशाच्या राज्यकारभाराची धुरा सांभाळणाऱ्या काँग्रेस पक्षाचा पं. नेहरूंसारखा फार मोठा आधार या मधल्या कालखंडात निधन पावला होता. पंडितजींची वैयक्तिक लोकप्रियता एवढी दांडगी होती की काँग्रेस पक्षाच्या हातून कितीही चुका झाल्या किंवा जिल्हा परिषदेपासून केंद्रीय मंत्रिमंडळापर्यंतच्या कोणत्याही पातळीवरील काँग्रेस कार्यकर्त्याविरुद्ध जनमानसात प्रक्षोभ निर्माण झाला तरीदेखील काँग्रेसला सत्तेपासून दूर लोटण्याचे सामर्थ्य कोणाच्याच अंगी येऊ शकले नाही. पंडितजींशी रास्त कारणाकरिता का होईना ज्यांनी ज्यांनी झुंज घेतली ते ते सर्वजण दूर फेकले गेले आणि पंडितजींचे स्थान अढळच राहिले. इतका सर्वसमर्थ नेता काँग्रेस पक्षाजवळ आता उरला नसल्यामुळे या चौथ्या निवडणुकीच्या रिंगणात उतरताना विरोधी पक्षांना खूपच धीर आलेला होता.

याशिवाय मधल्या पाच वर्षांच्या कालावधीत आणखीही महत्त्वाच्या आणि विशेषतः भारताच्या राजकारणावर आणि अर्थकारणावर दूरगामी परिणाम करणाऱ्या काही घटना घडल्या होत्या. चीन आणि पाकिस्तान या दोन शेजारी राष्ट्रांची आक्रमणे याच कालखंडात झाली आणि आतापर्यंत उपेक्षिलेल्या सेनासामर्थ्याच्या आवश्यकतेचे भान जागे झाले. जगाला शांतिपाठ शिकवण्याच्या नादात स्वतःच्या सीमांचे संरक्षण करण्याची व्यवस्था करण्याच्या बाबतीत आम्ही किती गाफील होतो याचा पुरावा या दोन आक्रमणांनी भरपूर प्रमाणात सादर केला आहे. याच कालखंडात दोन अवर्षणांनाही तोंड देण्याची आपल्यावर पाळी आली. या अवर्षणांचा तडाखा आपल्या नियोजनास फारच मोठ्या प्रमाणावर जाणवला. इतका की या वर्षी पंचवार्षिक नियोजन हाती घेणे अशक्य झाले. आपण आपली चौथी पंचवार्षिक योजना दोन वर्षांनी पुढे ढकलली आहे. रुपयाचे अवमूल्यन करावे लागल्यामुळे निर्यात व्यापार तर वाढला नाहीच; उलट आयातीवर मात्र अनिष्ट परिणाम झाला. गेल्या वर्षीच्या अखेरीस गोहत्याबंदीबाबत राजधानीत विराट

# अनेक दृष्टींनी महत्त्वाचे ठरलेले वर्ष

आंदोलन होऊन लोकमानस पुन्हा एकदा घुसळले गेले.

या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर चौथी निवडणूक सामोरी येत होती. भारतीय राजकारणाचे चित्र रेखाटणाऱ्या पाश्चात्त्य व विशेषत: ब्रिटिश निरीक्षकांनी तर भारतातील ही शेवटचीच निवडणूक ठरण्याची भाकितेही वर्तविण्यास प्रारंभ केला होता.

## अकल्पनीय

अशा सर्व उलटसुलट आणि वादग्रस्त घटनांच्या संमिश्रणाचा या निवडणुकीवर परिणाम झाला नसता तरच नवल. परंतु जो परिणाम दिसून आला तो या काँग्रेस पक्षासच काय पण विरोधी पक्षांनाही अकल्पनीय होता. सहा राज्यांतून काँग्रेस पक्ष सत्तेवरून दूर फेकला गेल्याचा चमत्कार पाहावयास मिळाला. निवडणूक जिंकण्याच्या तंत्रात निष्णात असलेले कामराज, स. का. पाटील, अतुल्य घोष आदी मोहरे एखादे वठलेले झाड कोसळावे तसे आदळले. लोकसभेतील काँग्रेसच्या अमर्याद बहुमताला किंचितदेखील धक्का लावण्याचे आतापर्यंत विरोधी पक्षाला सामर्थ्य लाभले नव्हते. परंतु गेल्या निवडणुकीत काँग्रेसचे बहुमत इतके घसरले आहे की इतर काही राज्यांत जशी नंतर काँग्रेस-त्यागाची लाट उसळली होती, तशीच एखादी लाट दिल्लीपर्यंत पोचली असती तर लोकसभेमध्ये विरोधी पक्षांच्या जागेवर बसण्याची काँग्रेसवर पाळी आली असती. निवडणुकीनंतरच्या प्रारंभीच्या एक-दोन महिन्यांत तसे घडणेही अशक्य नव्हते. हरेकृष्ण मेहेताबांसारखे एकेकाळचे काँग्रेसच्या वरच्या गोटातील राजकारणात मुरलेले आणि विजू पटनाईकांना नेहरूंचा आशीर्वाद लाभताच काँग्रेसशी कट्टर शत्रुत्व करू लागलेले नेते त्या दृष्टीने हालचालीही करीत होते.

परंतु केंद्र सरकारपुरते तरी हे प्रयत्न विफल ठरले. काही राज्यांत मात्र काँग्रेसची नौका हेलकावे खाऊ लागल्याचे दिसून येताच काँग्रेसभक्तांनी त्या नौकेचा सोयीस्कर रीतीने त्याग करून विरोधकांशी संधान बांधले आणि मुख्यमंत्रीपदाच्या आमिषापायी काँग्रेसशी घटस्फोट घेतला. बीरेंद्रसिंग, गोविंद नारायणसिंग आणि चरणसिंग या तिघांना आपापल्या राज्यांत बंडखोरीची पारितोषिके मिळाली आणि सतरांपैकी नऊ राज्यांतून काँग्रेसला विरोधी पक्षाची भूमिका वठवावी लागली. त्या वेळेस गुजराथ

आणि आंध्र प्रदेश ही राज्येही असाच मध्यंतरी खेळ खेळत होती. परंतु गुजरातेत स्वतंत्र पक्षाला आणि आंध्रमध्ये अपक्षीयांना त्या प्रयत्नात यश लाभले नाही. येथ-पर्यंत हे सारे ठीक होते. काँग्रेसच्या भ्रष्ट कारभारास कंटाळून आपण काँग्रेसचा त्याग करीत आहोत असे हे बंडखोर मोठ्या रुबाबात सांगत होते. परंतु आपल्या पायाखाली काय जळत आहे याचे त्या वेळी त्यांच्यापैकी कोणालाही भान नव्हते. जसे काही काँग्रेस कार्यकर्ते सत्तेच्या आशेने विरोधी पक्षांच्या आसऱ्यास गेले, तसेच या संयुक्त राजवटीत आपल्याला खुर्ची मिळत नाही असे आढळून आल्यानंतर काँग्रेस पक्षाशी सहकार्य करून संयुक्त मंत्रिमंडळांना खाली खेचण्याच्या कारवाया सुरू झाल्या. अतिशय क्षुद्र पातळीवरची ही सौदेबाजी इतक्या विकृत अवस्थेस पोचली की हरियानासारख्या नवोदित राज्यात कोण कोणत्या पक्षाचा आहे याचा उलगडाच होत नसे.

## अपयश

एकीकडे ही वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपायी बोकाळलेली सौदेबाजी आणि दुसरीकडे संयुक्त मंत्रिमंडळांच्या गोंडस नावाखाली एकत्र आलेल्या पक्षांतील अंतर्गत लाथाळी. यामुळे भारतीय राजकारणात नवे युग निर्माण झाल्याची ग्वाही देणारी संमिश्र मंत्रिमंडळे म्हणजे सत्ता आणि पक्षस्वार्थ यांचे राजरोस अड्डे बनले. अर्थात संयुक्त आघाड्यांच्या राजकारणात कम्युनिस्ट पक्ष सर्वांत तयार. इतरांना बदनाम करून सर्व सत्ता केवळ आपल्या हाती कशी येईल याची पावले टाकण्यात ते किती तरबेज असतात हे अजय मुखर्जी यांच्या वैतागावरून दिसून आले. संयुक्त समाजवादी पक्ष, प्रजा समाजवादी पक्ष, जनसंघ, स्वतंत्र हे सारे पक्षही आपला तथाकथित प्रखर जाज्वल्य आणि उदात्त ध्येयवाद बाजूस ठेवून याच घुमाळीत शिरले. संमिश्र मंत्रि-मंडळाचा प्रयोग तितकासा यशस्वी झालेला नाही अशी कबुली आता वाजपेयीं-पासून एस. एम. जोशींपर्यंत सर्वचजण देऊ लागले आहेत. परंतु ही परिस्थिती कोणी निर्माण केली याचे साहजिक विश्लेषण करण्याची कोणताही राजकीय पक्ष आज तरी हिंमत दाखवीत नाही. कम्युनिस्टांच्या नक्षलबारी–प्रयोगाचा अनुभव घेतल्यानंतरही संयुक्त समाजवाद्यांना पश्चिम बंगालच्या मंत्रिमंडळातून बाहेर पडा-वेसे वाटले नाही आणि बीरेंद्रसिंगांनी सुरू केलेल्या तमाशाचे दर्शन झाल्यानंतरही जनसंघाला बीरेंद्रसिंगांविरुद्ध बोलण्याची हिंमत झाली नाही. मग प्र. स. आणि स्वतंत्र या त्या मानाने दुबळ्या असलेल्या पक्षांची गोष्टच विचारायला नको !

१९६७ हे वर्ष भारतीय राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले ते या बाबतीत. सर्वच राजकीय पक्षांचे राजकारण केवळ सत्तानिष्ठ आहे हे या वर्षाने अतिशय घवघवीत रीतीने सिद्ध केलेले आहे. तत्त्वनिष्ठा असली तर ती पुराव्यापुरती. तसे

नसते तर सत्तेच्या राजकारणाबरोबरच या पक्षांनी देशाच्या सर्वांगीण प्रश्नाबाबत आपले राष्ट्रीय धोरण निश्चित करून त्या दिशेने दोन-चार पावले तरी टाकली असती. प्रत्येक पक्षाची राज्यवार, भाषावार आणि जातवार शकले झाल्याचे आजचे दृश्य दिसत आहे त्या मागची कारणमीमांसा वेगळी असू शकेल. पण ही वस्तुस्थिती आहे ही गोष्ट मात्र कोणालाच अमान्य करता येणार नाही. १९६७ या वर्षाने सर्वांत झगझगीत प्रकाश कशावर टाकला असेल तर तो या वस्तुस्थितीवर.

—सदाशिव पेठकर

## आकडेशास्त्राची महती

बलगरियाचे भूतपूर्व अर्थमंत्री व सध्या सोफिया विश्वविद्यालयाचे आकडेशास्त्राचे प्राध्यापक डॉ. स्टीफनॉव्ह हे भारतातील आकडेशास्त्रविषयक प्रगतीची पाहणी करून सुधारणा सुचविण्यासाठी सध्या भारतात आले आहेत. त्यांच्या मते कोठल्याही प्रकारच्या संशोधन-कार्यासाठी आकडेशास्त्रीय पद्धत आवश्यक असते, व हल्लीच्या जगात तांत्रिक व वैज्ञानिक संशोधन चालू असल्याने आकडेशास्त्रज्ञांना सध्या बरेच महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रगत देशातून हे महत्त्व ओळखून विश्वविद्यालयात आणि महाविद्यालयात आकडेशास्त्र शिकविण्याच्या सोयी वाढविण्यात आल्या आहेत, परंतु प्रगतिशील देशांत आकडेशास्त्राला अशा प्रकारचे महत्त्व प्राप्त होणे अधिक अगत्याचे आहे.

स्टीफनॉव्ह हे बल्गेरियातील सहकारी शेती चळवळीचे प्रणेते आहेत. सहकारी शेतीची किमया वर्णन करताना ते म्हणाले, " सर्वसाधारण बल्गेरियन शेत फक्त १·१ एकर एवढे मोठे होते,आणि पुष्कळदा त्यातही लहान लहान तुकडे पडलेले असत म्हणजे सध्या हिंदुस्थानातल्या काही भागांत जशी परिस्थिती आहे तशीच पूर्वी बल्गेरियात होती. परंतु आता बल्गेरियातील सर्वसाधारण सहकारी शेत ४००० हेक्टेर एवढे विशाल असते. त्यामुळे यांत्रिक पद्धतीने शेती करणे सुकर झाले आहे व पैदासही वाढली आहे."

# १९२२ चा मे महिना उजाडला

नव-रशियाच्या निर्मितीत गढून गेलेल्या
लेनिनला
अर्धांगवायूचा पहिला झटका आला.
तो या आजारातून उठत नाही
हे सर्वांनाच कळून चुकले.
आणि मग ?
लेनिनच्या सिंहासनावर
कोणी बसावयाचे यासाठी
कारस्थाने सुरू झाली.

ट्रॉटस्की विरुद्ध स्टॅलिन असा हा सामना होता

रुग्णशय्येवर खिळलेला लेनिन
दुबळ्या आवाजात सांगत होता –
'ट्रॉटस्की हा माझा वारस आहे.
स्टॅलिनला अधिकारपदापासून दूर
ठेवले पाहिजे.'
परंतु
स्टॅलिनला हे ठाऊक होते की

रशियन भूमीला ट्रॉटस्की मानवणार नाही.

दोन वर्षांच्या आतच
लेनिनचा मृत्यू झाला
आणि ट्रॉटस्कीवर
रशियातून परागंदा
होण्याची पाळी आली.
स्टॅलिनचा एकछत्री– एकतंत्री
अंमल सुरू झाला.
'शुद्धिकरणा'च्या नावाखाली
किती हत्याकांडे, किती शिरकाणे झाली
याला गणती नाही.

व्होल्गाचा प्रवाह लालम् लाल होऊन गेला

आणि तरीही आधुनिक रशियाचा शिल्पकार
या बिरुदावलीवर
स्टॅलिनचाच रास्त अधिकार पोचतो अशी
त्याच्या शत्रूंनाही कबुली द्यावी लागली.


हा सारा रोमहर्षक इतिहास

# व्होल्गा जेव्हा लाल होते

लेखक : वि. स. वाळिंबे

या लेखमालेच्या उत्तरार्धात वाचा.

पुढील अंकापासून क्रमशः प्रसिद्ध होत आहे



जीवन हे
जपण्यासाठी नाही
भिरकावण्यासाठी
आहे...

# ‘ ग्रँड प्रिक्स ’

आपले प्राण आणि स्वास्थ्य सुरक्षित ठेवून ताशी दीड दोनशे मैलांच्या सुसाट झपाटयाने साक्षात् मृत्यूच्या प्रदेशातून वेडयावाकडया भिरकांडया मारून येणे तुम्हांला आवडेल ? पाहताना अक्षरश: गरगरेल, डोळे फिरू लागतील, पोटात खाई पडेल, मती गुंग होईल आणि बसल्या बसल्याच शरीरमनाने तुम्ही पार थकून गळून जाल. या विलक्षण अनुभवासाठी तुमची तयारी असेल तर ‘ ग्रँड प्रिक्स ’ हा चित्रपट पाहा. युरोपातल्या मोटर-शर्यतींच्या जगाचे, त्यातल्या भिरकांडत्या वेगाचे, प्राणांच्या बाजीचे आणि क्षणोक्षणी चालणाऱ्या आशानिराशेच्या दारुण खेळाचे असे थरारून टाकणारे चित्रण यापूर्वी कधीही पडद्यावर आले नसेल. केवळ या जगाचे चित्रणच या चित्रपटात नाही तर या जगाच्या दृष्टिकोनातून बाकी जगाचे आणि जीवनाचे गरगरते चित्रणही या ‘ ग्रँड प्रिक्स ’ मध्ये अतिशय हुशारीने आणि अभूतपूर्व तांत्रिक करामतीने केले आहे.

कथानक, व्यक्तिरेखा इत्यादी गोष्टी वगळूनदेखील केवळ या अनुभवासाठीच हा चित्रपट स्वतंत्रपणे प्रेक्षणीय आहे. प्रथम म्हटल्याप्रमाणे प्राण आणि स्वास्थ्य शंभर टक्के शाबूत ठेवून एका अचाट धाडसी व्यवसायाचा असा साक्षात अनुभव, बसल्या-जागी सर्वसामान्यांना देण्याची चित्रपट-माध्यमाला आज प्राप्त झालेली ताकद अन्य कोणत्याही माध्यमांत नाही. आणि या ताकदीचा प्रत्यय मॉन फ्रँकेनहीमर हा तरुण दिग्दर्शक जसा घडवतो तसा अद्याप अन्य कोणीही घडवीत नाही.

फ्रँकेनहीमरचा आधीचा ‘ सेकंडस ’ नावाचा चित्रपट शास्त्रीय संशोधनाच्या आणि शोधांच्या आजच्या घोडदौडीत जरा भविष्यकाळाचा वेध घेऊन जिवंतपणी पुनर्जन्माची एक शास्त्रीय कल्पना घुसमटवून टाकणाऱ्या प्रखर प्रत्ययकारकतेने पडद्या-वर उभी करणारा होता. हा चित्रपट मुळीच चालला नाही इतका त्याचा ताण

## रातराणी

**विजय तेंडुलकर**

भयंकर होता. तुलनेने 'ग्रँड प्रिक्स' कमी ताणाचा आणि अधिक थरारक आहे. जत्रेतल्या 'जायंट व्हील'मध्ये बसून जरा वेगाने वरखाली फिरत राहिले तर वाटेल तसे या चित्रपटाने वाटते.

परंतु फ्रँकेनहीमर मानवी मनाचे पापुद्रे हळुवारपणे उकलून दाखविण्यातही तसा तरबेज आहे. 'सेकंडस' आधीच्या त्याच्या 'ट्रेन' आणि 'बर्डमन ऑफ अल्कत्राझ' या चित्रपटांत दोन अपवादात्मक आणि सत्य हकीकतींना चित्रपटाचे रूप देताना एकाच वेळी इतिहासकाराची वस्तुनिष्ठता ठेवून संबंधित व्यक्तींच्या भावभावनांचे जे नाजूक, मार्मिक चित्रण फ्रँकेनहीमरने केले होते ते सहजी विसरता येणारे नाही. 'ट्रेन' चा कालखंड नाझी आमदानीच्या उत्तरार्धातला युद्धकालीन होता. फ्रान्स-मधले काही पोटार्थी पराभवाच्या संभवापोटच्या नाझी भ्याडपणाने आणि नीच वृत्तीने प्रभावित होऊन नाझींशी कसा प्राणांच्या बाजीने सामना देतात आणि वस्तुतः ज्याविषयी त्यांना काडीचीही जाण नाही तो फ्रेंच कलाकृतींचा अमोल ठेवा कसा फ्रान्समध्येच यशस्वीरीत्या अडवून ठेवतात ती 'ट्रेन'ची कथा होती. 'बर्डमन' जन्मठेपेची आणि एकांतवासाची सजा झालेल्या एका गुन्हेगाराने स्वतःला शरीरमनाने शाबूत राखण्यासाठी पक्षी पाळण्याचा नाद कसा लावून घेऊन जोपासला आणि त्यापोटी त्या विषयात मोलाचे संशोधन कसे केले त्याची सत्य कहाणी चित्रीत करणारा होता. पहिला जेवढा गतिमान तेवढाच दुसरा संथ होता. दोन्ही चित्रपट भावविवशतेचा आश्रय न घेता एका सच्चेपणाने स्फूर्तिदायक झालेले होते. 'ग्रँड प्रिक्स' असाच कोठलाही अट्टाहास न करता स्फूर्तिदायक झाला आहे. जीवना-विषयीचा त्यातला दृष्टिकोन पौरुषयुक्त आहे. जीवन हे जपण्यासाठी नाही, भिरकावण्यासाठी आहे असे मानलेल्या शर्यतबाज मोटर-सारथ्यांचो आयुष्ये तो साजेशा दणकट हाताळणीने पडद्यावर उभी करतो. धोके, ताण, रक्त, जखमा, वेदना, मृत्यू हे तर या आयुष्यांच्या पाचवीला पुजलेले. क्वचित भेटणाऱ्या तात्कालिक पौरुषयुक्त यशासाठी आणि गरगरत्या वेगाच्या नशेसाठी त्यांना हे सारे स्वीकार्य वाटते. हे सारेच त्यातल्या थरारक, भयावह, रक्तरंजित, वेदनामय आणि नुसत्याच सुन्न अशादेखील क्षणांसहित फ्रँकेनहीमर आपल्यासमोर अशा खुबीने मांडतो की, जीवनाबाबत भीरू आणि हळवा दृष्टिकोन ठेवणे, नंतर काही वेळ तरी आपल्याला नकोसे वाटते. कोणत्याही स्वप्नरंजनापोटी नव्हे तर जीवनाच्याच एका अपवादात्मक परंतु सच्च्या दर्शनाने आपण प्रभावित होतो, निबर आणि दणकट होऊन या निष्फळ परंतु जगण्यायोग्य जीवनाचा विचार करू इच्छितो.

चार शर्यतबाज मोटर-सारथ्यांच्या आयुष्यातून शर्यतीच्या रिंगणांभोवतीच या चित्रपटाची कथा विणली आहे. पैकी स्कॉट स्टोडर्ड नावाच्या एका तरुण शर्यत-बाजाच्या पत्नीला आपल्या नवऱ्याचे हे शर्यतीचे 'व्यसन' साफ अमान्य आहे. चित्रपटाच्या पहिल्या काही भागांतच स्कॉटला शर्यतीत भयंकर अपघात होतो आणि

त्याची पत्नी त्याच्यावरच्या प्रीतीपोटीच त्याला त्याच्या व्यसनासाठी ठेवून अन्य एका पुरुषाचा स्नेह जोडते. हाही पेट ॲरॉन नावाचा शर्यतबाज सारथीच. याच्या प्रेमात न गुंतल्याने याचे वेगाचे व्यसन तिला त्रासदायक वाटत नाही, अशी स्वतःची समजूत ती घालते. वस्तुतः आपली उपेक्षा करणाऱ्या पतीविषयीची प्रतिक्रिया म्हणूनच तिने ही नवी संगत कोणत्याही भावनेविनाच आवडून घेतलेली असते. तिसरा शर्यतबाज सारथी पिअरे सार्ती. हा या क्षेत्रात चँपिअन म्हणून ओळखला जाणारा दर्दी माणूस. हाही विवाहित. याची पत्नी तिच्या अर्थार्जनाच्या ' करिअर '–मध्ये सर्व वेळ मश्गुल असते आणि त्यानेच हट्टाला पेटून हा स्वतःला दर वेळी नव्याने जिवाच्या बाजीने शर्यतीत लोटून देतो आणि अनेकदा यश जिकतो. शर्यतीच्या हंगामासाठी येऊन पोचलेली लुई फ्रेडरिकसन ही अमेरिकन वार्ताहर स्त्री त्याच्या प्रेमात पडते. चौथा शर्यतबाज निनो बार्लिनी हा केवळ आयुष्याच्या बाह्य रूपरंगाचाच विचार करणारा तगडा जवान, सुखी जीव. आंतरिक संघर्षाचा स्पर्श याला नाही. कपड्यांसारख्या तो स्त्रिया बदलू शकतो. या चौघांचे शर्यतींभोवतालीच वेढे घेणारे, देणारे जीवनप्रवाह प्रत्येक शर्यतीच्या निमित्ताने नव्याने जीवनमरणाच्या प्रदेशातून उलटसुलट वाहत जातात, यशापयशाचे झटके खातात. चित्रपटाच्या उत्तरार्धात एकदा बार्लिनी शर्यत जिंकून यशाने झिंगतो. एकदा अपघाताने पांगळा झालेला स्टोडर्ड पांगळ्या परिस्थितीत जिद्द एकवटून शर्यत जिंकतो. ॲरॉन यशापशात हेलकावे खात शेवटी एक यश मिळवतो ते सार्तीच्या ऐन शर्यतीतल्या भीषण मृत्युमुळेच. आणि व्यवसायाला, त्यातील धकाधकीला, निष्फळ साहसांना, स्पर्धेला आणि क्षणभंगूर यशाला सलाम करून व्यवसायाबाहेर चालता होतो. कथेच्या या चार टोकांत ' कथानक ' म्हणावे अशी एकसूत्रता आणि प्रत्यक्ष संगती नाही. सामायिकता आहे ती शर्यतीला. या एकाच पटावर पुढे मागे होणाऱ्या सोंगट्या म्हणजे मुख्य व्यक्तिरेखा. पण या सोंगट्या फ्रँकेनहीमरने इतक्या समजुतीने पड्यावर दाखविल्या आहेत की ' पट ' प्रकर्षाने जिवंत वाटतो. केवळ तांत्रिक करामत न उरता माणसा–माणसांची एक गोष्टही तयार होते. आणि विशिष्ट आयुष्याच्या आणि जयापजयातल्या अंतिम वैफल्य-भावनेवर संपते. तरीही आयुष्य हा पोरखेळ नव्हे, ती परिकथा नव्हे, ते स्वप्नरंजन नव्हे, तर ते एक मैदान आहे आणि फळाची अपेक्षा न धरता ते प्राणाच्या बाजीने लढणारालाच मर्द म्हणतात हे हा चित्रपट चांगल्या प्रकारे सांगून जातो.

म्हणूनच तो चांगला आहे. स्वप्नरंजनात्मक न होता स्फूर्तिदायक, खऱ्या अर्थाने जीवनाभिमुख आणि ' शूर मर्द 'चा म्हणून ' शूर मर्दां 'नीच–निदान होतकरू शूर मर्दांनी–पाहावा असा.

सर्वच भूमिका चांगल्या झाल्या आहेत. जेम्स गार्नर (पेट ॲरॉन), व्हेस मोतांद (जां-पिरे सार्ती), ब्रिअन बेडफोर्ड (स्कॉट स्टोडर्ड), अंतोनियो सबातो (निनो बार्लिनी)

आपापल्या रांगड्या भूमिका धंदेवाईक शर्यतबाज मोटर-सारथ्यांच्या सहजतेने जगले आहेत. तोशिरो मिफुन या जपानी नटाने इझो यामुरा हा शर्यतीच्या मोटारींचा महत्त्वाकांक्षी कारखानदार सुरेख साकार केला आहे. शर्यतीच्या मैदानावर हा प्रथम अवतीर्ण होतो तो जपानी दुभाष्या घेऊन. वृत्तपत्र-प्रतिनिधींसकट सर्व त्याच्याभोवती गर्दी करतात. इतरांच्या प्रत्येक इंग्रजी वाक्याचे भाषांतर जपानीत करून दुभाष्या यामुराला सांगतो आणि यामुराचे जपानी वाक्य इंग्रजीत करून हा दुभाष्या संबंधित इतरांना ते ऐकवतो. पुढे नायक पेट अॅरॉन यामुराच्या निमंत्रणावरून त्याची दुसरी खाजगी भेट घेतो तेव्हा दुभाष्या हजर नसतो आणि यामुरा फडर्डा इंग्रजीत संभाषण सुरू करतो. स्तिमित अॅरॉन म्हणतो, तुम्हांला तर इंग्रजी येते ! यामुरा तत्काळ त्यावर म्हणतो, येस, बट नॉट फॉर द प्रेस ! वर्तमानपत्रवाल्यांसाठी आणि त्यांच्या वार्ताहरांसाठी माझे इंग्रजी नाही. ते सार्वजनिक नाही, ते व्यवहारासाठी आहे ! जपानी माणसाचा पिंड या छोट्या प्रसंगात फार मार्मिकतेने चित्रीत झाला आहे. तो व्यवहारासाठी कुणाचे काहीही पत्करील पण चार लोकांत अभिमान बाळगेल तो आपले स्वतःचे परंपरागत, अंगचे असेल त्याचाच.

अशा छोट्या प्रसंगांतूनही हे परदेशी चित्रपट काही 'ग्यानबाची मेख' मारून जातात जी आपले चित्रपट उभ्या कथानकातूनही साधू शकत नाहीत ! असे का ? ○

# खेळ दो जिवांचा

एक चित्रपट मी मागे एकदा अगदी पहिल्या रांगेतून मान मोडेस्तोवर वाकडी करून पाहिला होता. बालपणी शाळा चुकवून नव्हे, चांगला मोठेपणीच. म्हणजे जरा उशीराच डोक्यात आले की चित्रपट पाहावा. थिएटराशी गेलो तर अक्षरशः एकच तिकीट शिल्लक होते. ते मी घेतले आणि काळोखात थिएटरात घुसलो. द्वारपाल महाशयांनी मला थेट नेऊन बसविले ते पहिल्या रांगेत पुढेच !

नाटकात पहिली रांग म्हणजे बहुमान ! (तरी नाटक व्यवस्थित दिसते, ते चारपाच रांगा टाकून त्यामागल्या एखाद्या आसनावरूनच.) चित्रपटात पहिली रांग म्हणजे शिक्षा. 'वाइड स्क्रीन' नामक केवढाल्या तरी रुंद पड्द्यावर पहिल्या रांगेतून मला तो चित्रपट त्या दिवशी दिसला तसा सहसा कुणालाच दिसला नसेल.

माणसांची, वस्तूंची सर्व प्रमाणेच वेगळी, अवास्तव, अद्‌भुत दिसत होती. रंगातला तपशील वाहवल्यासारखा पडदाभर पसरत होता. तो चित्रपट इतरांना कळला तसा मला कळला नाही – किंबहुना मला तो मुळी कळलाच नाही. ' मोमेंट टु मोमेंट ' असे त्या चित्रपटाचे नाव होते. तो रहस्यपट होता. रहस्याऐवजी डोकेदुखी घेऊन त्या दिवशी मी चित्रपटगृहाबाहेर पडलो. अर्थात दोष माझाच होता.

आणि नुकते या चित्रपटाचे मराठी रूपांतर रंगभूमीवर पाहण्याचा योग आला. रूपांतराचे नाव ' खेळ दो जिवांचा ' असे होते. रूपांतरकार रत्नाकर मतकरी. सादरकर्ती संस्था ललित–कला–साधना, मुंबई.

एकेका गोष्टीचा आणि आपला काय योग असतो पाहा. याही खेपेस परिस्थिती वशिष्टयपूर्ण होती. कोयनानगरच्या उत्पाताने विजेत कपात आणि त्यामुळे रवींद्र थिएटरातले एअरकंडिशनिंग संपूर्ण बंद होते ! रंगभूमीवर थंड हवेचे एक स्थळ अभिप्रेत धरून नटमंडळी जाड जाड, उबदार कपड्यात वावरत होती आणि प्रेक्षागृहात जाम उकाडा होता. रंगभूमीवरचे गरम कपडे नुसते पाहूनदेखील आम्हा प्रेक्षकांना घाम फुटत होता.

इतस्ततः कामानिमित्ताने दौरे करणाऱ्या एखाद्या बड्या माणसाच्या पत्नीला एकाकी वाटत असले आणि त्या मनःस्थितीत अन्य एखाद्या समवयस्क तरुणाशी तिची मैत्री जुळली तर त्यात आश्चर्य नव्हे ! आता समजा की, या मैत्रीतून एक आकर्षण निर्माण होऊ लागून पतीअपरोक्ष ती विवाहिता त्या तरुणाच्या भेटीगाठी वाढत्या प्रमाणात घेऊ लागली; तिला कळत असले की हे जे काही आपण करतो आहोत ते पतीशी विश्वासघात करण्यासारखे आहे, आणि घरच्या पिस्तुलाच्या अपघाताने तो तरुण तिच्या घरी मेला – तर काय होईल ? खुनाच्या आणि व्यभिचाराच्या जाहीर आरोपातून व बदनामीतून सुटण्यासाठी ती सरळमार्गी विवाहिता स्त्री कोणाच्या तरी साहाय्याने त्या प्रेताची विल्हेवाट घाईघाईने लावू पाहील. त्या तरुणाविषयीच्या आकर्षणापोटची वेदना तिच्या उरात त्याच वेळी जळत असेल. आपले रहस्य उघड तर होणार नाही ना हे मनस्वी भयही तिच्या मनात असेल आणि समजा, एक पोलिस अधिकारी तिच्या दारी उगवला; इतकेच नव्हे तर आपल्या कृत्यावर पांघरूण घालण्याच्या केविलवाण्या धडपडीत ती असताना मेलेला तिचा तरुण मित्रच अकस्मात त्याने तिच्यासमोर उभा केला – मृत अवस्थेत नव्हे, अगदी खडखडीत जिवंत अवस्थेत – आणि तेवढ्यात तिचा पती दौऱ्यावरून परतला – तर ? त्या बिचारीची काय अवस्था होईल हो ?

' खेळ दो जिवांचा ' मध्ये ही अवस्था तेवढ्या प्रकर्षाने जागवली नाही, पण अवस्था भयाण होईल हे नक्की. प्रारंभी दोन जिवांचाच वाटणारा ' खेळ ' एकदम नायिका, तिचा पती आणि मित्र असा तीन जिवांचा आणि गुंतागुंतीचा, अपरिमित वेदनांचा होईल.

'मोमेंट टु मोमेंट' पाहून न पाहिल्यासारखे असल्याने मूळ इंग्रजी आणि त्याचे मराठी रूपांतर यांत काय फरक होता ते समजण्याला मार्ग नव्हता. पण मराठी रूपांतरात त्या विवाहितेचे रहस्य आणि तिच्या वैवाहिक समस्या या दोन सूत्रांची गुंफण काही तितकीशी पक्की झालेली नव्हती. थकलेले ओझ्याचे जनावर जसे आळीपाळीने एकेका पायावर भर टाकून उभे राहील तसे या नाटकाचे झाले. एकदा त्यातल्या पोलिसी रहस्यावर भार पडत होता तर एकदा समस्येचे भावगर्भ काव्यात्म शैलीचे चित्रण महत्त्व पावत होते. मध्येच नायिकेची एक थिल्लर जिभेची अविवाहित विदुषी मैत्रीण आणि तिची समस्या नाटक कब्जात घेत होती. याशिवाय नायिकेच्या चिमुरड्या पोरीनेही आपल्या चटपटीत गोडव्याने कुठे कुठे नाटकाची बाकी अंगे तात्पुरती तरी निष्प्रभ करून टाकली. तात्पर्य, एकसंध, एकजीव असा हा 'खेळ' भासला नाही.

आता त्यातही तपशिलात शिरायचे तर नाटकातील रहस्य 'आपले' म्हणजे आपल्याकडे घडलेले वाटले नाही. नायिकेची मानसिक आंदोलने, तिची फाटक्या तोंडाची अविवाहित विदुषी मैत्रीण, तिचा विश्वासू रक्षणकर्ताच असा अविवाहित प्रौढ भाडेकरू, तिचा चित्रकार 'मित्र', 'गुन्ह्या'च्या तपासातली पोलिस मंडळी आणि नायिकेचे घरदेखील आपल्या प्रचीतीत कुठेच बसणारे ठरले नाही. हे सारे एक वेगळेच जग वाटले. बरेचसे पाश्चात्त्य चेहऱ्या–मोहऱ्याचे! असे वाटण्यालाही हरकत नव्हती. पण तशा त्या जगातले रहस्य म्हणूनही नाटकातले रहस्य मोठेसे भक्कम आणि त्याची उकल मती गुंग करणारी ठरली नाही. रहस्यातल्या उत्कर्ष-बिंदूने अंगावर काटा उभा केला नाही.

भयाची एखादी लाट थेटरात उठली नाही. उत्कंठेने श्वास अडले नाहीत. वाटले ते साधे निव्वळ आश्चर्य. मेला म्हटलेला माणूस जिवंत समोर उभा राहिला तर ते क्षणमात्र वाटणारच की. बुद्धिलाही मोठासा ताण पडला नाही. खरे म्हणजे पिस्तुलाची गोळी उडून रंगमंचावर आडवा लोळलेला माणूस मेला असे संवादातून बुद्ध्याच भासवून तो पुन्हा जिवंत करण्याची नाटककर्त्यांची किमया प्रेक्षकांना बाल-बुद्धी समजून केलेली वाटून गेली.

हे झाले रहस्याचे. समस्येतदेखील या नाटकाने फारशी उंची-खोली गाठली नाही. महत्त्वाकांक्षी पतीच्या कार्यव्याप्त जीवनपद्धतीमुळे संवेदनाक्षम, तरुण पत्नीला येणारा एकाकीपणा, त्यात एका तरुणाशी तिचे तिलाही नकळत वाढत जाणारे भावनिक संबंध, त्यातून सुटण्याची तिची धडपड आणि तितके अधिकाधिक गुंतत जाणे, यातून शेवटी पतीला हे कळताच संबंधित सर्वांपुढेच उभे ठाकणारे गंभीर प्रश्न–हे प्रकरण तसे साधेसुधे नव्हते. रहस्य सोडूनही एका संपूर्ण नाटकाचा हा विषय होता. या विशिष्ट नाटकात एक तर रहस्य आणि त्याची सोडवणूक घशात अडकल्याने हा विषय गुदमरला. त्यात औपचारिक, खडबडीत, खोटया काव्यात्म

अशा कृत्रिम संवादांचे लोढणे त्याच्या गळ्यात अडकले. सहजस्फूर्त म्हणावेत असे फक्त विनोदच उरले; तेही अनेकदा अस्थानी वाटले.

यातच मुख्य भूमिकांतील नटनटींना त्यांच्या भूमिका पेलल्या नाहीत. नायिका सुनीताच्या भूमिकेतल्या सौ. सुनीला प्रधान रहस्यात बऱ्यापैकी शोभल्या, पण समस्येत उपऱ्या वावरल्या, बोलल्या. भावनावेगांचे शब्द त्यांनी चोख उच्चारले आणि भाव मात्र बाकी ठेवले. भय, ओढ, मानसिक संघर्ष, नर्व्हसनेस या मानसिक अवस्था त्यांच्या उभ्या व्यक्तिमत्त्वातून व्यक्त होण्याऐवजी प्रामुख्याने चोख शब्दोच्चारातूनच कळल्या. त्यांचा अभिनय मन:पूर्वक होत होता पण परकायाप्रवेशाचा अत्यावश्यक स्पर्श त्यात उणा होता. सौ. प्रधान सौ. प्रधानच वाटत राहिल्या. त्यांना साथ देणारे गिरीशच्या भूमिकेतील रमेश वर्तक आणि नरेंद्राच्या भूमिकेतील मोने हेदेखील भूमिकांच्या वजनात कमी पडले. गिरीशच्या कलावंत व्यक्तिरेखेची धार रंगमंचावरच्या या व्यक्तिरेखेच्या आविष्कारात वजा राहिली तर नरेंद्राच्या व्यक्तिरेखेचे कर्तृत्वसंपन्न परिपक्व धीरगंभीर रूप रंगमंचावर नुसतेच फार गंभीर आणि कुटुंबवत्सल वाटत राहिले. ज्यांचा ' खेळ ' त्या तीन जिवांची ही अवस्था झाल्यावर ' खेळा 'त मुक्तपणे बागडणाऱ्या छोट्या बच्चीने (मेधा जोशी) आपल्या सहजतेने, गोडव्याने भाव खाल्ला नसता तरच आश्चर्य ! पोलिस इन्स्पेक्टर धुरंधर झालेले मधुकर नाईक त्यांच्या रहस्यप्रधान भूमिकेत चांगले वावरले, बोलले, पण खून मुळी झालाच नाही, मुडदा पडलाच नाही असे शेवटी प्रेक्षकांपुढे उघड झाल्यावर या धुरंधराला अनुभवी वडील माणसाची गुळवट, प्रेमळ, समंजस भूमिका वठवून रंगमंचावरून धीमे प्रयाण करण्यापलीकडे काही भूमिकाच उरली नाही.

नेपथ्य आणि नायिका, दोन्ही दृष्ट लागण्याइतकी देखणी होती. नंदकुमार रावते यांच्या गोळीबंद बंदिस्त दिग्दर्शनात पात्रांच्या हालचालींवर जरा जास्तच भर होता. माझ्या शेजारचा प्रेक्षक दीर्घकाळ या हालचाली पाहून शेवटी म्हणाला, हे ' मोमेंट टु मोमेंट ' की ' मुव्हमेंट टु मुव्हमेंट ?'

प्रेक्षागृहात फार उकाडा झाला ना, की सामान्य प्रेक्षकदेखील क्वचित हे असे बरे काहीतरी बोलून जातो.

## □ शिक्षण : एक जागतिक समस्या

युनेस्कोचे एक पश्चिम जर्मन शिक्षण-तज्ज्ञ डॉ. हेलमुट् बेकर नुकतेच भारतात येऊन गेले. त्यांच्या मते "शिक्षणाच्या क्षेत्रात आणि कमी सुधारलेल्या अशा दोन्ही प्रकारच्या देशांत एक प्रकारचा समरप्रसंग निर्माण झाला. आणि हा समर-प्रसंग उद्‌भवण्याचे कारण विद्यार्थ्यांची संख्या आणि ज्ञानाचा साठा या दोन्हींत झालेली स्फोटक वाढ हे आहे." या प्रसंगातून निभावून जायचे असेल तर "शिक्षण-विषयक योजना आखण्याच्या कामी 'आंतर्‌राष्ट्रीय सहकार्य' करावे लागेल. शैक्षणिक योजना तयार करण्याची समस्या आज अप्रगत देशांपुढे जशी आहे, तशीच सुधार-लेल्या देशांपुढेही आहे. अप्रगत देश जसजसे अधिकाधिक सुधारू लागले तसतशी त्यांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती आणि शिक्षण यांचे परस्परावलंबन अधिका-धिक स्पष्ट होऊ लागले. उलटपक्षी या परस्परावलंबनामुळे सुधारलेल्या देशांच्या समस्याही उजेडात आल्या. म्हणून दोन्ही प्रकारच्या देशांत कनिष्ठ साहचर्य आणि देवाण-घेवाण असणे आवश्यक आहे.

शिक्षणाची केवळ योजना आखून भागत नाही. ही योजना समाजाभिमुख असली पाहिजे; त्याचबरोबर ती दूरदृष्टीचीही असली पाहिजे; कारण उत्पादनाचे चक्र सर्व प्रकारच्या कामकऱ्यांसाठी अनौपचारिक शिक्षणाची गरज आणि प्रत्येक देशाचे सीमित आर्थिक बळ या सर्व गोष्टींचा विचार शैक्षणिक योजनेत वास्तवतापूर्वक केला गेला पाहिजे.

भारतातील योजना-कार्य वरच्या दर्जाचे आहे. काही चुकत असेल तर ते योजना कार्यान्वित करण्याच्या बाबतीत चुकते. शिक्षणविषयक योजनेला संशोधनाचा आधार पाहिजे ही गोष्ट येथील अग्रगण्य शिक्षण-तज्ज्ञांच्या ध्यानी आली आहे. परंतु केवळ योजना आखून भागत नाही. अध्यापन वरच्या दर्जाचे असणे नितांत आवश्यक असते. डॉ. बेकर हे इंटर्‌नॅशनल इन्स्टिटयूट फॉर एज्युकेशनल प्लॅनिंग या युनेस्को—संचालित संस्थेचे एक प्रमुख अधिकारी असून ही संस्था शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण या दोन गोष्टींना महत्त्व प्राप्त करण्यासाठी जकार्ता, बेरूट, सँटियागो आणि दिल्ली येथील चार प्रादेशिक शिक्षण-संस्थांशी सहकार्य करीत आहे.

## □ हसरे दात

माणसाच्या एकूण आरोग्याचा प्रश्न जगभर गंभीर होत चालला आहे, पण त्यात दातांच्या आरोग्याच्या प्रश्नाला स्वतःचे वेगळे स्थान आहे याची जाणीव परवा एका परदेशी दंतवैद्याने दिल्लीत करून दिली. ते म्हणजे घानाच्या आरोग्य मंत्रालयात दातांचे डॉक्टर असलेले डॉ. कोफी. यांच्या मते माणसांच्या जेवणा-खाण्याच्या सवयी झपाट्याने बदलत आहेत, आणि विशेषतः, सुधारलेल्या देशांतील लोक 'मऊ' खाद्यपदार्थ अधिकाधिक खाऊ लागले आहेत. त्यामुळे दातांच्या आरोग्याचा प्रश्न

अधिकाधिक महत्त्वाचा होऊ लागला आहे. कमी सुधारलेल्या देशांच्या बाबतीत सध्या मलेरिया, देवी आणि इतर काही संसर्गजन्य रोगांशी लढा करण्याचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे; परंतु या देशांनीही दातांच्या आरोग्याकडे लक्ष पुरविले तर वावगे होणार नाही.

घानामध्ये सध्या स्वतः डॉ. कोफी, त्यांच्या हाताखाली काम करणारे २३ डॉक्टर्स व मोठ्या शहरांतून व्यवसाय करणारे १२ डॉक्टर्स मिळून फक्त ३६ दातांचे डॉक्टर आहेत. म्हणजे दर तीन लाख लोकांमागे एक दातांचा डॉक्टर असे प्रमाण पडते. म्हणून अधिकाधिक दातांचे डॉक्टर तयार करणे हे घाना सरकारचे उद्दिष्ट आहे. घाना-निवासी नागरिकांना परदेशी जाऊन दंत-वैद्यकाचे उच्च शिक्षण घेता यावे म्हणून शिष्यवृत्ती देण्यात येते.

ग्रामीण भागात दातांची निगा ठेवण्यासाठी काय व्यवस्था करता येईल हा विशेष महत्त्वाचा प्रश्न आहे. "कमी सुधारलेल्या देशांत किडलेल्या दातांचा प्रश्न मोठा नसून किडलेल्या हिरडयांचा प्रश्न मोठा आहे." खेडेगावांतील लोकांच्या खाण्यात 'घट्ट' पदार्थ खूप असतात, त्यामुळे त्यांचे दात मजबूत असतात. परंतु त्यांच्या आहारात काही जीवन-सत्त्वे आणि प्रोटीन्स यांची कमतरता असल्याने त्यांच्या दाढा सुदृढ नसतात. घानामध्ये खेडेगावांतील जनतेसाठी दातांचे फिरते दवाखाने उघडण्यात आले आहेत व ते फार उपयुक्त ठरले आहेत.

## □ नागरी जीवनाच्या समस्या

भारतातील नागरी जीवनाच्या समस्या साधारणपणे कशा स्वरूपाच्या आहेत, याची पाहणी करण्यासाठी डॉ. बॅरी गार्नर हे ब्रिटिश प्राध्यापक नुकतेच भारत-भेट देऊन गेले. ब्रिटनमधील या समस्येची चर्चा करताना ते म्हणाले, सर्वसाधारणपणे ब्रिटिश द्वीपाच्या दक्षिण भागाकडे उत्तरेकडून जनतेचा लोंढा वाहत आहे. त्यामुळे लंडन व लंडनचा आसमंत यांची वाढ फार झपाटयाने झाली आहे. याची कारणे अनेक आहेत, पण त्यांत विशेष महत्त्वाचे कारण म्हणजे लंडनला आणि एकूण दक्षिणेत जीवनमान, हवा आणि आधुनिक उद्योगधंदे अधिक चांगले आहेत अशी सर्वसाधारण समजूत आहे. नागरी जीवनाची ही समस्या इंग्लंडमध्ये काही नवीन नाही, परंतु अजून ती सुटलेली नाही. परंतु अशा प्रकारचे स्थानांतर इतर देशांतही पाहायला मिळते. अमेरिकेत दाट वस्तीच्या वसाहती, गगनचुंबी इमारती वगैरे मार्गांनी हा प्रश्न सुटू शकेल असे एक मत आहे, परंतु हे या प्रश्नाचे खरे उत्तर होऊ शकणार नाही, कारण या पद्धतीचा दूरवरचा सामाजिक परिणाम इष्ट होणार नाही. लंडनची वाढ आटोक्यात आणण्यासाठी एक 'हिरवा पट्टा' तयार करण्यात आला आहे, परंतु हा मार्गही सफल झालेला नाही. कारण १२७ मैलांच्या अंतरावरून लंडनला रोज नोकरीसाठी येणे ही सामान्य गोष्ट झाली आहे. **—समीर**


# गपआळ

## आनंद रामचंद्र फुले

**आयुष्यात किती तरी वेळा अक्का आईच्या भूमिका जगल्या होत्या. लाखो प्रेक्षकांची अंतःकरणं त्यांनी हलवून सोडली होती. पण त्या मात्र ह्याच क्षणाशी एकरूप झाल्या होत्या.**

भिंतीवरच्या ‘ सिकोसा ’मध्ये ठोका पडला. एकच. तशा दोघांच्याही नजरा घड्याळाकडे गेल्या. नंतर अभावितपणं नजरानजर झाली. दोघांनीही पुनः पूर्ववत माना खाली घालून जेवावयास सुरुवात केली. अन्न घशाखाली उतरत होतं म्हणूनच ‘जेवावयास’ असं म्हणायचं – एरवी त्यात काहीच स्वारस्य नव्हतं.

अक्कांच्या मनात विचारांचं काहूर उठलं होतं. जेवण झाल्यावर अनिल घरी राहणार की क्षितिजाकडं–सासरी–जाणार ह्याचा त्या अदमास घेत होत्या. अनिल मोठ्या विचित्र स्वभावाचा मुलगा होता. त्याच्या काही कल्पना–काही विचार–मते–मुलखावेगळीच होती. साधी गोष्ट. लग्न झालं. नवीन माणसाशी सोयरिक झाली. यायला–जायला नको ? पण नाही. क्षितिजानं घरी जाण्याचा प्रस्ताव मांडला की ह्याची काही तरी सबब पुढं झालीच. तसं काही कारण म्हणावं तर अजिबात नाही. क्षितिजाच्या घरचं कुणी माणूस–माणसं आली की स्वारी मोठ्या हौसेनं आईला–त्यांना जेवणाचा मस्त बेत करावयास सांगणार. गप्पांच्या ओघात वेळेचं भान-देखील राहणार नाही. पण सुनेनं घरी चलण्याविषयी सूतोवाच केलं की सबब पुढं ! बायकोनं नवऱ्याच्या ह्या तऱ्हेवाईकपणापुढं हात टेकलेत. नाद सोडून दिला. त्यांनीसुद्धा सांगून पाह्यलं पण व्यर्थ ! एकदा नाही म्हणजे अजिबात नाही. मुंबई-हून आला की बऱ्याचदा व्हायचं असं की तो क्षितिजेला परस्पर तिच्या घरी सोडून घरी यायचा. दोन-तीन दिवस घरी राहून क्षितिजा यायची. तोवर घरी मायलेकांचं राज्य ! पण आजची गोष्ट वेगळी होती. प्रसंग वेगळा होता. अनिल घरी आला होता



खरा, पण घरचं वातावरण नेहमीसारखंच होतं. अनिलच्या येण्यानं घरच्या वातावरणाला जो चैतन्याचा उजाळा यायचा तो ह्या वेळी आला नव्हता.

घरी पाऊल ठेवल्याच्या क्षणापासनं सुरू होणारी बडबड (क्षितिजाच्या भाषेतली 'टेप्') स्टेशनवर गाडी हलली तरी बंद होत नसे. ऐकणाऱ्यालाही क्वचित कंटाळा यावा, पण अनिलचा उत्साह दांडगा होता. पण आज तसं काहीच घडलं नव्हतं. तशी अपेक्षाही नव्हती.

डायनिंग टेबलावर ते बसून जेवत होते. पण संभाषणाचा शब्द नाही. आज अनिल आईची नजर चुकवीत होता.

प्रसंगाचं स्वरूप स्फोटक होतं. कुठल्याही निमित्तानं उद्रेक होऊ शकत होता. वातावरणाचा दाब स्पष्टपणं तिऱ्हाइतालासुद्धा जाणवावा असा होता. अनिल आल्यावर अक्कांनी मात्र नेहमीसारखीच चौकशी केली होती. आल्यावर नेहमीसारखंच विचारलं होतं, "सूनबाई आली नाही ?" त्यावर अनिल म्हणाला होता,

"आली, घरी उतरली." आवाजावरनं नूर स्पष्ट झाला होता. येण्याआधी मिळा-लेल्या त्याच्या पत्रानं त्यांना स्पष्ट जाणीव दिली होती. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी स्वत:च्या मनाची तयारी केली होती. मात्र त्या आपणांकडून काही निमित्त देणार नव्हत्या. आल्या प्रसंगाची वाईटातली वाईट परिणती जमेस धरूनच त्यांनी अनि-लचं नेहमीसारखंच आनंदानं स्वागत केलं होतं, पण अनिल नेहमीच्या मनमोकळे-पणानं वागू शकला नाही.

भिंतीवरच्या घड्याळात ठोका पडला तसं त्यांनी दोघांनी एकदम घड्याळाकडं पाहिलं. नंतर नजरानजर झाली. पुन: पूर्ववत मान खाली घालून जेवण सुरू झालं.

वादळापूर्वीची शांतता वातावरणात सामावून होती. एरवी उत्साही-आनंदी वातावरणाच्या मानगुटीवर बसलेल्या ह्या वादळाला अद्याप सुरुवात झाली नव्हती. अपेक्षेपोटी ताण अधिकच जाणवत होता. कशीबशी जेवणं आटोपली.

"क्षितिजा का आली नाही हे तुला ठाऊक आहे?"

एकदाचं तोंड फुटलं होतं तर! आजचा नूर वेगळा होता.

अक्कांजवळ अनिलच्या प्रश्नाचं उत्तर होतं. पण स्वत: पुढाकार घेऊन त्यांना प्रसंगाची चिरफाड करावयाची इच्छा नव्हती. पण अनिलच्या येण्यामागचा हा उद्देश होता. प्रश्नाचा रोख तसाच होता. पण त्यांनी मुद्दामच कलाटणी दिली. "सूनबाई आली नाही का, एवढंच विचारलं होतं मी मघाशी? का आली नाही हे मला विचारायचं नव्हतं. माहेरच्या गावात येऊन आपल्या लोकांना भेटावंसं वाटतं. सूनबाईच्या ह्या गोष्टीबाबत मी कधीच हरकतीच्या भावनेनं वागले नाही. एवढंच काय पण मला ही गोष्ट कधीच अशी जाणवली नाही!"

"ती मुद्दाम घरी आली नाही!" एवढं म्हणून अनिल थांबला. अशी 'सिच्यु-एशन' अक्कांना काही नवीन नव्हती. त्यांच्या भूमिकांच्या निमित्तानं येणाऱ्या खलनायकांच्या कामाच्या उठावाच्या दृष्टीने मुद्दाम अशा सिच्युएशन्स ठेवल्या असायच्या. एक वाक्य बोलून खलनायक असा थांबणार हे ठरलेलंच. अनिलचं थांबणं काहीसं अशाच प्रकारचं होतं — निदान त्यांना तरी असंच जाणवलं.

अक्का चकार शब्दानं उत्तरादाखल काही बोलल्या नाहीत.

"ती म्हणाली की पुन: मी त्या घरात पाऊल ठेवणार नाही!"

आता त्यांचा नाइलाज झाला होता.

"मग त्यावर तू काय म्हणालास?"

"मी काय म्हणणार? समाजात वावरताना आम्हांला ह्याची झळ सहन करावी लागते. प्रसंगी उपेक्षा—पाणउतारा होतो. मला अजून हेच कळत नाही की हे करून तुला काय मिळालं? आता ह्या उपशाची काय जरुरी होती?"

पुन: अनिल थांबला.

खरंच अक्कांना त्याची काय जरुरी होती?

खरंच अक्कांना ह्याची काय जरुरी होती ! जगावं लागलेल्या जीवनाच्या पारायणाची नाही–मुळात त्या जीवनाचीच काय जरुरी होती ! चारचौघींना स्वतःच्या घराची–संसाराची–मुलाबाळांची स्वप्नं पडतात तीच त्यांनीही पाहिली होती. सुखी होत्या त्या चार भिंतींतल्या सुरक्षित संसारात ! पण चारचौघींच्या वाट्याला येतं ते साधं जिणंसुद्धा पुरतं त्यांच्या नशिबी होतं कुठं ? चाळीतल्या एका नाटककंपनीतल्या गृहस्थानं कसल्याशा नाटकातल्या भूमिकेसाठी त्यांच्या यजमानांमार्फत गळ घातली. काम चांगलं झालं. खरी गोष्ट की कंपनीला सुंदर नटी मिळण्याची शक्यता निर्माण झाली. त्या अनुषंगानं कंपनीच्या चालकांची खुषामत सुरू झाली. वारेमाप स्तुतींनी बाबुरावांचंच डोकं फिरलं. त्यांनीही त्या दरवेश्यांच्या तालावर नाचावयास सुरुवात केली. स्वतःच्या बायकोला प्रथम नाटकात–मग चित्रपटात आणली. पहिल्यांदा स्तुतीला बळी पडले. नंतर नोकरी करण्याची आवश्यकताच न जाणवून गरजेपोटी बळी गेले. निर्माते-दिग्दर्शक ह्यांच्या खुषमस्कऱ्यांपैकी एक होण्यात धन्यता मानत गेले. पदोपदी टप्प्यातला पैसा जाऊ नये म्हणून तिच्यावर परिस्थितीशी केलेल्या तडजोडी लादीत गेले. विवेक ठेवला नाही. स्वतःचा तोल ठेवला नाही. नुसते भरकटत गेले. अक्कांनाही स्वतःच्या मागं ओढत रखडत नेलं.

बाबुराव स्वतःचं नवरेपण सोईस्करपणं विसरले. बायकोच्या जिवावर चैनीचं आयुष्य जगण्याची परिस्थिती आली तशी नोकरी सोडून देऊन व्यवस्थापकाच्या रूपानं तिची–तिच्या परिस्थितीची, स्वतःच्या गरजेची गुलामी पत्करली. ज्या जगात त्यांनी अक्कांना फरफटत आणून उघड्यावर सोडलं त्या जगाचं बाहेरनं जाणवणारं रूप फुलपाखराच्या पंखाच्या रंगासारखं मोहक होतं. पण वस्तुस्थितीनं ते जग फारच वेगळं होतं. कडवट होतं. त्यात तर अक्कांच्या या कुंकवाच्या धन्यानंच गुलामांचा मांडतात तसा बाजार मांडला. स्वतःची तेवढी सोय बघितली. त्यांना जाणून घेतलंच नाही. तशी गरजसुद्धा वाटली नाही.

जवळजवळ वीस वर्षांच्या झंझावाती जीवनानंतर त्या हळूहळू त्या जगापासून मागं मागं येत गेल्या. किंबहुना नव्या रक्तानिशी ते पिसाट जग त्यांच्यापासून पुढं दूर दूर होत गेलं. परिस्थितीनं मागं वळून बघण्याइतपतची निवृत्ती लादली. चार-पाच चित्रपटांतील भूमिकांच्या निमित्ताने त्यांच्या नावाचा उल्लेख अपरिहार्य स्वरूपाचा झाला होता. बस्स ! ही एवढी एक गोष्ट वगळता वीस वर्षांच्या जीवनाला अलौकिक असा काहीच अर्थ नव्हता. ज्या जगात वीस वर्षं काढली त्या जगात त्यांना त्या जगाचा बरावाईट पारंपारिक वारसा सांभाळावाच लागला होता. पाण्यात राहायचं तर पाण्याशी वैर करून कसं चालेल ? अगदी तसंच त्यांचं झालं ! चौकटीत त्यांनी स्वतःला सामावून घेतलं......

एके दिवशी अचानक एका स्त्रीविषयक मासिकाचे संपादक त्यांच्याकडे आले. स्त्रियांच्या ह्या पिढीला ज्या चित्रपटसृष्टीचे अनिवार आंधळे आकर्षण आहे त्या

चित्रपटसृष्टीचे सत्य स्वरूप कसे आहे ह्याची वस्तुनिष्ठ जाणीव अक्कांनी एखाद्या लेखाद्वारे द्यावी असं त्यांनी सुचविलं. तसं त्यांनी स्पष्टपणं सांगितलं की, " आधी केले हाडंकाडं–मग बसली देवापुढं " अशातलीच गोष्ट व्हायची. बोलण्याच्या ओघात विषयाला वेगळीच कलाटणी मिळाली. अक्कांनी आत्मचरित्रपर निवेदन का लिहू नये असाच प्रश्न उपस्थित झाला. उपदेश, मार्गदर्शन वगैरेंचा दांभिक मपका तो नाही. तेवढी एक वस्तुनिष्ठ जाणीव. ह्या त्या अर्थानं ज्यानं त्यानं घ्यावी, तथ्य वाटलं तर वाटेत पेरलेल्या खाचखळग्यांची दखल घ्यावी, निदान जाणीव असू द्यावी. नाहीतर ज्यानं त्यानं स्वतःचं दुःख स्वतःच्या ओंजळीत घ्यावं.

आत्मचरित्रपर निवेदन करण्याच्या त्या प्रस्तावानं त्यांना विलक्षण अस्वस्थ केलं. निर्णय घेता येईना. ज्या नवऱ्यानं हे जीवन त्यांच्यावर लादलं होतं तो नवरा कालवश झाला होता. ज्या मुलाच्या भविष्यावर उमेद ठेवून वर्तमानाची कडवट मात्रा घशाखाली उतरविली त्या मुलानं त्यांच्या अपेक्षा सार्थ केल्या होत्या. त्यांचं डोळ्यांचं पारणं फिटलं होतं. अशा वेळी...

अशा वेळी कशाला त्या आठवणींचा उपसा ? नुसत्या आठवणींसरशी अंगावर शहारे यावेत इतक्या कटू आठवणी–त्यांना आता कशाला जागवायच्या ? ह्यातनं काय साध्य होणार ?

संपादकांच्या खेपा चालूच होत्या. त्यांच्या मनाची चलबिचल होतच होती. काही केल्या निर्णय घेता येत नव्हता.

एकीकडं वाटायचं कशाला हे ? मग वाटायचं–का नाही ? त्यांत भ्यायचं कशाला ? कुणाला ? अन् का म्हणून ?

अक्कांनी एकदा नाही अनेकदा स्वतःच्या मनाची तयारी अजमावली. तसतशी सारं सत्य सांगण्याची–जे घडलं त्याच्याशी प्रामाणिक राहण्याची त्यांच्या मनाची तयारी होत गेली. इतकी, की प्रश्न का म्हणून आत्मनिवेदन करायचं ह्या स्वरूपाचा न राहता ते निवेदन कितपत वस्तुनिष्ठ, प्रामाणिक असेल असा झाला. कसल्याही भीती वा दडपणवजा भावनेच्या आहारी न जाता जसजसं घडत गलं तसतसं फक्त तेवढंच सांगण्याचं काम त्यांनी केलं. जे घडलं तेवढंच सांगत गेल्या. त्यावर प्रतिक्रिया नाही. भाष्य नाही. त्या निमित्ताने हिताचे, पश्चात्तापाचे बोल नाहीत. दुसरं काहीच नाही. अगदी तिऱ्हाइताच्या तटस्थतेनं त्यांनी त्या वीस वर्षांच्या धावत्या जीवनाचा आढावा घेतला. बऱ्या-वाईट कसल्याही भावनेनं त्या भारावून गेल्या नाहीत. खपली ओली असताना जरासासुद्धा धक्का सहन होत नाही पण तेच जखम बरी झाल्यावर ती खपली आपणहूनच गळून पडते. चित्रपटचंद्रिकेचं जीवन आता त्यांना तेवढंच दूर होतं. तटस्थतेनं पाहता येण्याजोगं होतं. त्यांच्या आयुष्याला झालेली ती वीस वर्षांची जखम आता जणू पूर्णपणे बरी झाली होती व निवेदनाच्या निमित्ताने आता कसलंही दुःख न देता ती खपलीच जणू आपसूक पडत होती.

एवढं मात्र खरं की, सांगताना कधी कधी कित्येक घटनांनी त्यांना त्या वेळी विलक्षण अस्वस्थ केलं. काही वेळा इतकं की नाइलाजानं त्यांना बैठक संपवावी लागली. काहीच सुचेनासं व्हायचं. मग त्या स्वतःची दिलगिरी व्यक्त करीत. बैठक संपत असे. पण त्या भल्या संपादकांनी गैरसमजूत करून घेतली नाही, की हे मनाला लावून घेतलं नाही. निवेदन पूर्ण झालं. संपादकांनी मुद्रणप्रत तयार केली व त्यांना वाचावयास दिली. सात-आठ दिवस संपादक मुद्दामच की काय न कळे पण आलेच नाहीत. अक्कांना तर वाटू लागलं की हयात व्यक्तींच्या संदर्भामुळं अब्रू-नुकसानीच्या फिर्यादीच्या संभाव्य भीतीने संपादकाच्या मनाची चलबिचल तर होत नव्हती ना! संपादक आले. त्यांनी संमतीच्या पत्रासमवेत मुद्रणप्रत दिली. दिवाळी अंकात पूर्वार्ध समाविष्ट झाला व पाठोपाठच्या दोन अंकांत आत्मनिवेदन पूर्ण झालं! दरम्यान संपादक दोनदा भेटावयास आले होते. ह्यामुळ खळबळ माजली आहे, उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त करणारी अनेक पत्रे आली आहेत, काही इतर नियत-कालिकांनीसुद्धा प्रतिक्रिया व्यक्त केली आहे, असं काहीसं म्हणाले होते. पण अक्कांना काय त्याचे ? खळबळ माजविणं हा त्यांचा तर राहोच पण संपादकांचासुद्धा हेतू नव्हता. ती एक अपरिहार्य प्रतिक्रिया होती.

अनिलच्या प्रश्नासरशी त्यांची निश्चिती झाली की वेळ आली आहे. जे अटळ आहे ते वाईटांतल्या वाईट परिणामाच्या तयारीनं सहन करायलाच हवं !

" तू ते पूर्णपणं वाचलंस का ?" त्यांच्या आवाजाला एक प्रकारची निग्रहाची धार होती.

" अं...हो ! ..."

" स्वतःच्या आईचं म्हणून की एका नटीचं आत्मचरित्र म्हणून वाचलंस ?"

अनिल भांबावला. त्याला हे सारं अगदी अनपेक्षित असंच होतं...अक्कांना मात्र हे अपेक्षितच होतं. अनिलला त्या चांगल्या रीतीनं ओळखून होत्या...

"...मुलाखत देताना असं काहीच मनात नव्हतं. त्यामागं काही भूमिकाही नव्हती. पण तुझ्या पत्रानंतर मी त्या दिशेने जसजसा विचार करीत गेले तसतशी भूमिका स्पष्ट होत गेली.

माझं-तुझं नातं आई-मुलाचं ! रक्ताचं नातं म्हणून श्रद्धेचं नातं ! आंधळ्या श्रद्धेचं नातं ! तिथं इतर विचारांना थाराच नाही. नकोच. हे 'नकोच' सर्वसामान्य आईमुलांसाठीच. पण माझी गोष्ट दुर्दैवाने इतर सामान्य चारचौघींसारखी नव्हती. माझी इच्छा तसंच असण्याची होती. पण विधिलिखित वेगळंच होतं. वीस वर्षे नाटक-सिनेमांत गेली. आणि संसारातही कारणी लागलीत. ह्या दोन गोष्टी जेव्हा अलग अलग असतात तेव्हा दोन अलग अलग जीवनाची रूपे पाहावयास मिळतात पण एकत्र येतात तेव्हा मात्र मिश्रण होतं. माझ्या बाबतीत तेच झालं. नटी आणि आई ह्या दोन भूमिका मला जगाव्या लागल्या. ना मी त्या वर्खाच्या जगात

सामावू शकले, ना ह्या चारचौघींच्या भाग्यातल्या जगात पूर्णतः वावरू शकले.

मी तुझी आई ! पण ओळख इथंच संपत नाही. एवढ्यानंच भागत नाही ! कारण मी एक नटी होते. त्या जगाचं बरंवाईट जीवन जगले. गुणदोषांची परंपरा सांभाळली. ही गोष्ट तू लहान होतास तेव्हा महत्त्वाची नव्हती. पण आता तुला पुरती समज आली आहे. माझ्याविषयी तू बाहेरच्या जगात बरंवाईट (वाईटच जास्त) वाचलं असशील, ऐकलं असशील. तू मला त्याची जाणीव दिली नसशील. शहानिशा करण्याचा विचारसुद्धा तुझ्या मनाला शिवला नसेल. स्वतःच्या आईच्या चारित्र्याविषयीच्या त्या प्रवादांनी तू स्वतःला बांधून घेतलं नसशील पण म्हणून तुझ्या मनात विकल्प आला नसणार ? त्या प्रवादांनी तुला व्यथित केलं का नसणार? स्वतःच्या आईच्या चारित्र्याची—अन् तेही चव्हाट्यावर—उघड चर्चा व्हावी ह्या-सारखी कमीपणा आणणारी गोष्ट मुलासाठी दुसरी कोणती असू शकते ? तुझ्या मनात माझी—स्वतःच्या आईची म्हणून—जी श्रद्धामूर्ती आहे तिला तुझ्या मनात उद्-भवलेल्या विकल्पांचा स्पर्श झाला नाही, असं तू माझी शपथ घेऊन सांगू शकतोस ?

हे तुझं नाही, माझं दुःख आहे. माझं दुर्दैव आहे. वीस वर्षे रुपेरी जगात काढली पण त्या जगाशी एकरूप होऊ शकले नाही. संसारानं माझा अंगिकार केला नाही. दोन्हींहिकडून माझी अशी परवड झाली.

त्या नाटककंपनीतल्या गृहस्थानं तुझ्या वडिलांना गळ घातली नसती तर कदा-चित् काय नक्कीच मी चारचौघींसारखी तुझी आई म्हणून सुखासमाधानानं जगले असते. तुझ्या मनातल्या असीम श्रद्धारूपाला पात्र ठरले असते. पण नाही; आक-स्मिकरीत्या मी प्रसिद्धीच्या झगमगाटात ढकलले गेले. तसंच आता झालं ! संपादक आले नसते तर हे झालं नसतं. आता त्याला अर्थ एवढाच की आपलं नातं डोळस-पणं विचारात घेण्याची वेळ तुझ्यावर आली आहे.

मातृत्व अभंगच असायला हवं. तिथं विकल्प—संदेहाला थारा नसावा. बव्हंशी नसतोच ! सर्वसामान्यपणं ही श्रद्धा अभंगच राहते. त्याला तडे जात नाहीत. धक्केसुद्धा लागत नाहीत. पण कधी कधी मुलाच्या दुर्दैवानं हे असं घडतं. जेव्हा ह्या बाबतीत घडलं, तेव्हा डोळसपणं विचार करण्याची वेळ येते. श्रद्धा कसाला लागते. दुर्दैवानं विचार तुला करायचा आहे. आता माझं जीवन एक स्त्री म्हणून तुझ्या धारणेत सुस्पष्ट झालं आहे, विकल्पांचं— प्रवादांचं— धुकं विरलं आहे. वस्तु-स्थिती आता त्या धुक्यात राहिलेली नाही. तुझ्या दृष्टीनं विचार करण्यासाठी वस्तुस्थिती अगदी सत्य स्वरूपात स्पष्ट झाली आहे."

जरा वेळ अक्का थांबल्या. अंमळशानं पुनः त्यांनी सुरुवात केली—

"ह्यातनं वाईटातली वाईट गोष्ट होऊ शकणार ती म्हणजे तू माझा तिटकारा करणार. परिणामी आई म्हणून असलेला संबंध तोडणार.

आज तू तशा काहीशा निर्धारानंच आला आहेस हे उघड आहे. मी तुझ्या

निर्णयाआड येणार नाही. केव्हाही नाही.

वाटेल त्या परिस्थितीचा कौल मला मान्य होईल. मी दयेची याचना करणार नाही. भिकेसाठी पदर पसरणार नाही. तुझ्या वियोगानं होणारं माझं दुःख तुझ्या मार्गात अडमडू देणार नाही.

कारण मला पूर्णपणं आई होताच आलं नाही. त्यामुळं सर्वसामान्य आईची लाचारी, अगतिकता माझ्या स्वभावात जोपासलीच गेली नाही.

आयुष्यात जे काही बरंवाईट जीवन जगले स्वतःच्या तालानं– स्वाभिमानानं– जगले, स्वतःच्या अहंकारानं 'मी–मी' म्हणणाऱ्या अनेकांना मी पायांशी नमविलं, ते जीवन झगमगाटापासून दूर झालं तरीही जीवन जगण्याची ती प्रवृत्ती माझ्यात तेवढीच तीव्र–प्रबळ आहे. प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा मी लाचार झाले नाही. नमले नाही ! कारण तो माझ्या स्वभावाचा एक स्थायीभाव झाला आहे. आताही तेच होणार. मी इतरांप्रमाणं लाचार होऊ शकणार नाही. माझा स्वभाव मला नमतं घेऊ देणार नाही.

ज्या निर्धारानं तू आलास त्याप्रमाणं तू वागू शकतोस. खरं म्हणजे न येताही तू


**डोंगरे**

# अ प्स रा

**अभिप्राय क्रमांक स्पर्धा**

त्वरा करा.

शेवटची ता. ३०।१२।६७

निर्णय घेऊ शकला असतास ! पण तुला यावंसं वाटलं– तू आलास हे माझ्या परीनं बरंच झालं. तो लेख वाचून जे तुला कदाचित जाणवलं नसतं ते मला तुला सांगता आलं.

अजूनही तुझा तू स्वतंत्र आहेस ! कोणत्याही परिस्थितीत मी तुझ्या मार्गात येणार नाही. कारण माझा तो स्वभाव नाही."

एवढं म्हणून अक्का बैठकीतनं उठून आत चालत्या झाल्या.

बिछान्यावर अंग टाकल्यावर किती तरी वेळ त्यांना झोप आली नव्हती. केव्हा तरी एकदाचा त्यांचा डोळा लागला.

अचानक त्यांना जाग आली. पायांशी कुणीतरी...

त्या दचकून उठल्या.

" अनिल, तू ? इथं– ह्या वेळी ?–"

तसा बांध फुटला. अनिल ओक्साबोक्शी रडू लागला.

" आई, मी चुकलो. मला माफ कर. मी–मी तुझ्याशी संबंध ठेवणार नव्हतो."

तसं अक्कांनी त्याला हृदयाशी कवटाळलं.

"वेडा रे ! अगदी वेडा रे, तू."

त्यांचे डोळे वाहत होते. अजूनही अनिल स्फुंदत होता.

" आई, मधाशी मी खोटं बोललो. ती काहीच म्हणाली नव्हती. तिचं नाव समोर करून मीच मला म्हणायचं ते म्हणालो. "

त्याला थोपटीत अक्का म्हणाल्या, " वेड्यासारखं रडतोस काय ? ऊठ !"

त्या स्वतः मात्र रडत होत्या. आनंदाश्रूंनी गहिवरल्या होत्या.

कसं न कळे; त्यांना आठवलं की आई घासून स्वच्छ केलेल्या पितळी भांड्यांना माती लावल्यावरच चुलीवर चढवायची. नंतर ती भांडी घासताना आईच्या जवळपास अक्का असायच्या, तेव्हा त्या जळालेल्या भांड्यांवरचा काजळलेला मातीचा थर बोटांनी काढला की दिसायचा आतला स्वच्छ पृष्ठभाग जसाच्या तसा. त्या वेळी ह्याच चाळा अक्कांना लागला होता.

पण ह्या वेळी नेमकं तेच का आठवावं ह्याचं त्यांना काही केल्या आकलन होत नव्हतं. त्याचं त्यांना फारसं वाटतही नव्हतं.

आयुष्यात कितीतरी वेळा त्या आईच्या भूमिका जगल्या होत्या. लाखो प्रेक्षकांची अंतःकरणं त्यांनी त्या वेळी हेलावली होती.

पण आयुष्यात पहिल्यांदा त्या ह्या क्षणी फक्त ' आई ' म्हणून जगत होत्या.

जणू त्यांच्या जीवनावर साकळलेली वीस वर्षांच्या रुपेरी अनुभवाची वपसाळ ह्या निमित्तानं काढली गेली होती !

O

मला डॉक्टर व्हायचंय

...आणि तुम्हांला हिच्या शिक्षणाची सोय केली पाहिजे. त्यासाठीं अर्थातच पैसा हवा आणि योजनापूर्वक बचत केल्यानेंच पैसा जमूं शकतो. तेव्हां पंजाब नॅशनल बॅंकेच्या सेव्हिंग्ज किंवा रिकरिंग डिपॉझिट स्कीममध्यें बचत करा. मग तुम्हाला तिची इच्छा पुरी करणं कठीण जाणार नाहीं.



पंजाब नॅशनल बॅंक

एक स्फोटक लेख




लेखक : दादुमियाँ

नोव्हेंबर २१ ही भारताच्या राजकीय इतिहासात अमर रात्र समजली जाईल. राज्यपाल धर्मवीर यांनी अजय मुखर्जी यांना बडतर्फ केले व पी. सी. घोष यांची नियुक्ती केली. कम्युनिस्टांना लगेच लोकशाही आठवली व लोकशाहीचा खून चव्हाणांनी केला असा आरडाओरडा त्यांनी चालू केला. इतर विरोधी पक्षांनी जवळ जवळ त्याच सुरात रडारड केली.

दुसऱ्या दिवशी सकाळी पी. सी. घोष त्यांच्या शागीर्दांबरोबर ॲसेंब्ली हॉल-मध्ये हजर झाले. बाहेर विरोधक विरोधी घोषणा करीत होतेच. नऊ वाजता ॲसेंब्ली हॉलमध्ये मारामारीस सुरुवात झाली. पी. सी. घोष यांना टेबल लँप लागला. चेहऱ्यावर जखम झाली. ९॥ वाजता स्पीकर बानर्जींनी पी. सी. घोष यांची नियुक्ती बेकायदा आहे असे जाहीर केले व सभा बरखास्त केली.

तेवढे झाल्यावर म्हणे पोलिसांनी बाहेर जमलेल्या जमावावर लाठीचार्ज केला. अश्रुधूर सोडला. इतर बऱ्याच ठिकाणी पोलिसांनी असेच प्रकार केल्याचे वृत्तपत्र-कारांनी ठळक अक्षरांत रिपोर्टस् छापले. काही भयंकर मारहाणीचे फोटोही प्रसिद्ध झाले. सर्व वृत्तपत्रे गोळा करून सर्वांचे रिपोर्टिंग वाचले तर सारांश असा निघेल : " कलकत्ता नगरी पेटली असून सर्वत्र गोंधळ माजला आहे. पोलीस सटासट बंदुका चालवून लोकांना ठार मारीत आहेत. जालीयनवाला बागेची पुनरावृत्ती कल-कत्त्यात १९६७ साली होत आहे. "

सामान्य माणूस राजकीय मते वृत्तपत्रे वाचून बनवितो. ' हे छापून आलं आहे ' एवढा छापील पुरावा त्याला पुरेसा होतो. त्यावरून त्याची मते पक्की होतात व आपले राज्यकर्ते किती नालायक आहेत, त्यांना काहीच अक्कल नाही. त्यापेक्षा आपल्याला कोणी सत्ता दिली तर आपण जास्त आत्मविश्वासाने व न्यायाने राज्य करू अशी जवळ जवळ पक्की खात्री होते. या वर्तमानपत्रवाल्यांनी लिहिले आहे ते कितपत खरे, त्यांत खोटेपणा असेल तर तो का वगैरे मामुली बाबतीत तो कधीच लक्ष घालीत नाही. त्याला राजकारणाकडे विशेष लक्ष द्यायला तेवढा वेळही नसतो.

भारत हा अज्ञानी देश आहे व ह्या देशात वृत्तपत्रे खरे छापावयाच्या ऐवजी कोणा एका व्यक्तीस वा संस्थेस खूष करण्यासाठी मजकूर प्रसिद्ध करतात, असा माझा अनुभव आहे. मुंबईच्या गोळीबारात ताया झिन्कीन् ही धाडसी ब्रिटिश वार्ताहरीण बाई खुशाल स्वतःच्या मोटारीतून हिंडत असे. बाकीचे वार्ताहर मुद्दामच गोळीबारात ठार झालेल्यांचा आकडा कमी करून लिहीत. प्रसिद्ध व ख्यातनाम अशा एका इंग्रजी दैनिकाच्या वार्ताहरास तिने असे खोटे का लिहितोस, असा प्रश्न केला. " पोटासाठी, बरं बाई, " असा तिला जबाब मिळाला. कलकत्त्यात हा धूमधडाका चालला असता आपण ताया झिन्कीन् व्हावे असे मला वाटू लागले. कलकत्ता शहर मला नवीन नव्हते. अतुल्य घोष, डॉ. त्रिगुण सेन वगैरे मंडळी परिचित होती. कम्युनिस्टांच्याही चांगल्या ओळखी होत्या. म्हटलं, चला, जरा धाडस करावे. तेथे जाताना लोकांनी मूर्खात काढले. परत आलो तेव्हा वीराचे स्वागत केले. का, तर " सुरक्षित व धड " परतलो म्हणून. मात्र इतके प्रश्न विचारून मित्रांनी भंडावून सोडले की एकदा वाटले, उगीच सुरक्षित परत आलो.

जगातील सर्वच लोकांना कलकत्ता शहराविषयी फार आकर्षण आहे. मार्क्स-देखील हिंदुस्थानाविषयी विशेष माहिती नसताना कलकत्ता व शांघाय येथून वर उत्तरेला साम्यवाद सरकेल असे भविष्य सांगून गेला. परदेशातून आलेली सारी पाहुणेमंडळी कलकत्ता पाहिल्या-शिवाय घरी परतू शकत नाहीत.

एवढे कलकत्ता शहरात आहे तरी काय? कलकत्ता शहरात विशेष असे काही नाही. मुंबई, मद्रास व नवी दिल्ली ज्याने पाहिली आहे अशा माणसास कलकत्ता बिलकुल आवडणार नाही. नाही म्हणायला तलावांचे सौंदर्य आहे. पण ते पाहायला कलकत्ता कशाला पाहिजे ?



पोटासाठी, बरं बाई !

उदयपूरला जा किंवा कोणत्याही खेडेगावातल्या कोपऱ्यावर एखादा नैसर्गिक तलाव वा सरोवर असतेच. तरीही कलकत्ता एवढे लोकप्रिय का ? याचे कारण, कलकत्त्याचे वैशिष्टच म्हणजे बंगाली लोक.

गंगाकिनारी वसलेली ही नगरी एक शापभूमी आहे. साऱ्या दुनियेची समृद्धी इथे आहे. सर्वांत श्रीमान् शठजी या नगरीत वास्तव्य करतात. जास्तीत जास्त इन्कम् टॅक्स् भरतात. असे असूनही भारतातले हे एक नंबरचे दरिद्री शहर आहे. जास्तीत जास्त दारिद्रय, जास्तीत जास्त हालअपेष्टा व जास्तीत जास्त संकटे या बंगाली लोकांनी पाहिली आहेत, अनुभविली आहेत. जास्तीत जास्त पैसा असून इतके अस्वच्छ, बकाल व बेशिस्त शहर पृथ्वीच्या पाठीवर इतरत्र कोठेही शोधून मिळणार नाही.

अतुल्य घोष व डॉ. त्रिगुण सेन ही एकेकाळची दैवते आज आऊट झालेल्या बॅट्स्‌मनप्रमाणे मंडपात परत येऊन इतरांचा खेळ बघत आहेत. त्या दोघांच्या मते कलकत्ता भविष्यात कधीही सुधारू शकणार नाही. डॉक्टरी भाषेत, ती एक Hopeless Case आहे. पाकिस्तानाने आंदण दिलेले निर्वासित आज कदाचित् आम्ही पचविले असतील. पण त्यांनी आमच्या अर्थशास्त्रावर जो भयंकर परिणाम केला आहे, आमच्या मानसशास्त्रात जो बिघाड उत्पन्न करून ठेवला आहे तो कसा व कोण सुधारणार, हा अतुल्य घोष यांचा सवाल मला मर्मभेदक वाटला.

कलकत्त्याच्या लोकांसमोर आज अनेक प्रश्न तोंड वासून उभे आहेत. पण मुख्य प्रश्न अर्थशास्त्रीय आहे. " कलकत्त्याचे सारे प्रश्न एका क्षणात मी सोडवू शकतो," असे एका रिटायर्ड काँग्रेसी नेत्याने मला सांगितले. तो पुढे म्हणतो, " पण त्यासाठी न्यूयॉर्क शहराचा खजिना मजजवळ पाहिजे." त्याच्या या पुस्तीत फार मोठा आशय आहे. आज कलकत्त्याच्या राजकारणात हे शक्य नाही. मोठमोठ्या औद्योगिक कंपन्या येथे असूनही कलकत्ता ' मुंबई ' होऊ शकत नाही.

कोणे एके काळी कलकत्ता निर्भय, निर्व्यसनी व बुद्धिवान् लोकांसाठी प्रसिद्ध होते. ब्रिटिश सरकाराने त्यांना पाश्चिमात्त्य संस्कृती शिकविली व सुशिक्षितांना " Macaulay's Bastards " बनविले. १९४७ सालानंतर तेथे औद्योगीकरण मोठ्या धडाक्यात सुरू झाले. औद्योगिक संस्कृती म्हणजेच अमेरिकन संस्कृती. सारी कृत्रिमता, सारेच खोटे व सारेच भावनाशून्य. कलकत्त्याचा पिंड भावनाप्रधान व संवेदनाशील. त्याला हा नवीन प्रकार मानवेना. पण औद्योगीकरणाच्या चरकात बंगाली माणूस सापडलेला. त्याची हिम्मत म्हणूनच त्याने आपले बंगाली वळण सोडण्याचे नाकारले. भुकेकंगाल पण ताठ; उद्योगी व्हावे ही आवड. पण जुनी शान सोडून देण्याची तयारी नाही; प्रखर बुद्धिमत्ता पण खोटेपणा करावयास जे हृदय 'कमवावे' लागते त्याचा अभाव. या दोन भिन्न प्रवृत्तींमधून सध्याचा बंगाली माणूस तयार झाला आहे. थोडा दंभ, थोडी बुद्धिमत्ता, थोडा उद्योग, थोडा

दिमाख. पण बरीचशी बडबड, बराच उथळपणा व प्रचंड निराशा. या सर्वांचे मिश्रण करून त्यात थोडीशी चीड मिसळा. त्या रसायनाचे नाव बंगाली माणूस.




बंगाली रसायन

परिस्थिती माणसाला बनविते, हा मानसशास्त्राचा मोठा सिद्धांत आहे. बंगाल परिस्थितीच्या मानाने दुर्दैवी आहे. बंगालला चांगली परिस्थिती कधी आलीच नाही. नेहमीच वाईट घडत गेल्यामुळे बंगालला आपण इतिहासापासून काही शिकावे असेही वाटत नाही. मगध साम्राज्यात जे काही चांगले दिवस बंगालने पाहिले तेवढेच. पुढे हिंदूंनी बुद्धधर्मीयांना छळले. त्यानंतर हेच बुद्धधर्मीय मुसलमान झाले. बाबर दिल्लीवर येईतोवर दिल्ली व बंगाल यांच्या रोजच्या हाणामाऱ्या होत्या. हिंदूंचे हाल चालू होते. नाही म्हणावयाला १५२१ साली नश्रतखानाने महाभारताचे बंगालीत भाषांतर करवून घेतले. मोगलांच्या आमदानीत बंगालच्या कपाळी जिझिया व जमीनदारांचा जाच. जमीनदार मुख्यतः मुसलमान. त्यांचा जाच हिंदू बायकांना. फ्रेंच व ब्रिटिश यांच्या झगडयात बंगालच्या शेतकऱ्याचे हाल चालूच होतेच. ब्रिटिश सरकार स्थापन झाल्यावर मँचेस्टरला राजाश्रय कसा मिळाला तर डाक्क्याच्या त्वष्टयांचे आंगठे तोडून !

बंगाल आज जो विचार करील तो उद्या भारतभर विचार होईल, असे लो. टिळक म्हणून गले. क्रांतिकार्यात महाराष्ट्रास साथ फक्त बंगाल व पंजाब या दोनच प्रांतांनी दिली. पण या तपश्चर्येचे फळ बंगालला काय मिळाले ? आगरकरांच्या आधी राजा राममोहन रॉय यांनी बंगालला समाजसुधारणेचे धडे दिले. पण प्रार्थनासमाज व ब्राह्मोसमाज यांचे रूपांतर ब्रिटिश सरकाराने Macaulay's Bastards असलेल्या क्लबात केले. ब्रिटिशांनी बंगालला काय दिले ? तर भीषण दुष्काळ आणि क्रांतिकारकांना फाशी. सुभाषबाबूंनी बंगालला दुष्काळासाठी लाखो टन बर्मीज् तांदूळ देऊ केला, तो ब्रिटिशांनी नाकारला. बंगालला इतिहासाने काय शिकविले ? वंगभूमी ही श्रापभूमी आहे, एवढे सत्य. कशाला मेहनत करा, कशाला उद्योग करा, नाहीतरी हालअपेष्टाच भोगावयाच्या आहेत ना, एवढे शिकण्यासाठीच जणू बंगाली इतिहास घडविला गेला.

बंगाल्यांच्या चुका झाल्या नाहीत असे मात्र म्हणावयाचे नाही. मूर्ख व रूढिप्रिय

दिमाख. पण बरीचशी वडबड, बराच उथळपणा व प्रचंड निराशा. या सर्वांचे मिश्रण करून त्यात थोडीशी चीड मिसळा. त्या रसायनाचे नाव बंगाली माणूस.



बंगाली रसायन

परिस्थिती माणसाला बनविते, हा मानसशास्त्राचा मोठा सिद्धांत आहे. बंगाल परिस्थितीच्या मानाने दुर्दैवी आहे. बंगालला चांगली परिस्थिती कधी आलीच नाही. नेहमीच वाईट घडत गेल्यामुळे बंगालला आपण इतिहासापासून काही शिकावे असेही वाटत नाही. मगध साम्राज्यात जे काही चांगले दिवस बंगालने पाहिले तेवढेच. पुढे हिंदूंनी बुद्धधर्मीयांना छळले. त्यानंतर हेच बुद्धधर्मीय मुसलमान झाले. बाबर दिल्लीवर येईतोवर दिल्ली व बंगाल यांच्या रोजच्या हाणामाऱ्या होत्या. हिंदूंचे हाल चालू होते. नाही म्हणावयाला १५२१ साली नश्रतखानाने महाभारताचे बंगालीत भाषांतर करवून घेतले. मोगलांच्या आमदानीत बंगालच्या कपाळी जिझिया व जमीनदारांचा जाच. जमीनदार मुख्यत: मुसलमान. त्यांचा जाच हिंदू बायकांना. फ्रेंच व ब्रिटिश यांच्या झगडयात बंगालच्या शेतकऱ्याचे हाल चालूच होतेच. ब्रिटिश सरकार स्थापन झाल्यावर मँचेस्टरला राजाश्रय कसा मिळाला तर डाक्क्याच्या त्वष्टयांचे आंगठे तोडून !

बंगाल आज जो विचार करील तो उद्या भारतभर विचार होईल, असे लो. टिळक म्हणून गले. क्रांतिकार्यात महाराष्ट्रास साथ फक्त बंगाल व पंजाब या दोनच प्रांतांनी दिली. पण या तपश्चर्येचे फळ बंगालला काय मिळाले ? आगरकरांच्या आधी राजा राममोहन रॉय यांनी बंगालला समाजसुधारणेचे धडे दिले. पण प्रार्थनासमाज व ब्राह्मोसमाज यांचे रूपांतर ब्रिटिश सरकाराने Macaulay's Bastards असलेल्या क्लबात केले. ब्रिटिशांनी बंगालला काय दिले ? तर भीषण दुष्काळ आणि क्रांतिकारकांना फाशी. सुभाषबाबूंनी बंगालला दुष्काळासाठी लाखो टन बर्मीज् तांदूळ देऊ केला, तो ब्रिटिशांनी नाकारला. बंगालला इतिहासाने काय शिकविले ? वंगभूमी ही शापभूमी आहे, एवढे सत्य. कशाला मेहनत करा, कशाला उद्योग करा, नाहीतरी हालअपेष्टाच भोगावयाच्या आहेत ना, एवढे शिकण्यासाठीच जणू बंगाली इतिहास घडविला गेला.

बंगाल्यांच्या चुका झाल्या नाहीत असे मात्र म्हणावयाचे नाही. मूर्ख व रूढिप्रिय



मूर्खपणा !

ब्राह्मणांनी असंख्य हिंदूंना बुद्धधर्मीय बनविले. चैतन्यप्रभूंनी त्यांना पुनश्च हिंदू बनविले. पण या अजागळांनी त्या नवहिंदूंना शूद्र म्हणून झिडकारले. काळा पहाड या राजपूत वीरावर एक मुसलमान राजकन्या माळली. ती हिंदू व्हावयास तयार झाली. पण या मूर्खांनी दोघांनाही वाळीत टाकले. संतापून, चिडून या 'काळा पहाडा'ने मुस्लिम धर्म स्वीकारला व मोठ्या उत्साहाने हजारो नवहिंदू व बौद्धधर्मीयांच्या सुन्ता करविल्या. आजच्या पूर्व पाकिस्तानास खरं म्हणजे "काळा पहाड लँड" असे नाव द्यावयास पाहिजे. १९१४ साली बंगालची फाळणी झाली. पण टिळकांच्या नेतृत्वाखाली ही फाळणी वंगवीरांनी रद्द करवून घेतली. दुर्दैवाने, हा क्षात्रधर्माचा तेजस्वी पाठ वंगीय विसरले ते कायमचेच.

वस्तुत:, काली ही बंगालची देवता. हिंसा हा वंगभूमीचा स्थायीभाव. पण कळत नकळत वंगीयांनी गांधीजींची अहिंसा स्वीकारली. सुभाषबाबूंना उचलून फेकून देण्यात आले. न पेलवणाऱ्या पट्टीत वंगीय पुढाऱ्यांनी गायला सुरुवात केली. १९४१ च्या शिरगणतीवर महात्माजींच्या नेतृत्वाखाली बहिष्कार टाकण्यात आला. त्याचा परिणाम काय झाला ? १९३१ च्या शिरगणतीमध्ये बंगालमध्ये मुसलमान ७८ टक्के होते. १९४१ साली ते ८१ टक्के झाले. काही विभागांत ते ९८ टक्के झाले. लोकांना विचार पडला, हिंदु स्वस्थ बसले आहेत काय ? ते षंढ तर नाहीत ? १० वर्षांत हिंदूंची प्रजोत्पत्ती काय झालीच नाही ? महात्माजींनी "स्वस्थ बसा" हा आदेश दिला आणि हे मूर्ख लोक स्वस्थ बसले. जीनांनी "हसके लिया पाकिस्तान" अशी जी वल्गना केली त्यामागे ही खुळी व आंधळी "चूप मरो" ची विचारसरणी होती हे लक्षात ठेवले पाहिजे.

सारी काँग्रेसी घेंडे सुभाषबाबूंचा काटा काढण्यात मश्गुल झाली होती. ह्या घेंडांत सध्याचे मुख्य मंत्री पी. सी. घोष हेही होते, हे नमूद केले पाहिजे. त्यांच्यावर विषप्रयोग सुरू झाले. स्वत:च्या बंधूंनीच पाठीत सुरा खुपसल्यावर सुभाषबाबूंना भारताबाहेर पळण्याशिवाय दुसरा मार्ग काय होता ? वैफल्याने गांजलेल्या बंगालने सर्वच बंगाली थोरांना सुरुवातीला सतावले आहे. विवेकानंदांना कोणीही विचारीत नव्हते ! शिकागो येथून चांगले रिपोर्टस् आले, परदेशस्थांनी त्यांना प्रशस्तिपत्रक दिले व मगच बंगालला विवेकानंदांच्या प्रेमाचा पान्हा फुटला.

रवींद्रनाथ टागोर यांची तीच अवस्था! एकदा कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या बी. ए. च्या पेपरात या श्रेष्ठ कवीचा एक गद्यात्मक उतारा दिला होता व "शुद्ध बंगालीत त्याचे रूपांतर करा" असा आदेश परीक्षकाने विद्यार्थींना दिला होता. त्यांना नोबेल पदक मिळाले व बंगालमध्ये धूम रवींद्र संगीत व रवींद्र काव्याचा पूर वाहू लागला. डॉ. श्यामाप्रसाद हयात होते त्या वेळी कलकत्त्यामध्ये जनसंघाचे सदस्य किती होते हे सांगितले तर शरम वाटेल.

मुस्लिम लीगची मोहीम बंगाल प्रांतापुरती अत्यंत पद्धतशीर होती. त्यांची लोकसंख्या फुगविली जात होती, त्यांना जास्त चांगल्या नोकऱ्या मिळत होत्या, पोलीस सारे मुसलमान होते व न्याय त्यांच्यासाठी होता. पाकिस्तान झाले. त्याबरोबर हजारो-लाखो हिंदू बंगालमध्ये हजर झाले. त्याची प्रतिक्रिया नोआखली व बिहारच्या काही भागांत झाली तर अहिंसेच्या पुजाऱ्यांनी त्या भागात बाँब टाकून हिंदू खेडी उद्ध्वस्त केली. बंगालच्या जखमेवर मीठ चोळण्यासाठीच जणू महात्माजी कलकत्त्यात हिंदूंची कत्तल करणाऱ्या पाकिस्तानी नबाबजाद्यांबरोबर पदयात्रा करीत होते!

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींना बंगालने सतावून सोडले. "काही करता येत नाही तर राजीनामा द्या व हातांत बांगड्या घालून हिमालयावर जा!" हा डोस डॉक्टरांना झोंबला. त्यांनी वल्लभभाई पटेलांना बंगालची व्यथा आकडे व सत्य सांगून पटविली. पटेलांनी सबंध सरहद्दीवर लष्करी सेना उभी केली. हैदराबादप्रमाणे पूर्व पाकिस्तानावर 'पोलीस ॲक्शन' घ्यावी असे नक्की झाले. हे ऐकताच लियाकतअल्लीसाहेब दिल्लीस दाखल झाले व नेहरू-लियाकत करार जन्मास आला. हा करार ताश्कंद कराराप्रमाणे फुसका होता हे कळावयास फार दिवस लागले नाहीत. पण सरदार स्वर्गस्थ झाले होते व डॉ. श्यामाप्रसादही कंटाळून दिल्लीहून कलकत्त्यास स्थायिक झाले होते. कंटाळलेल्या बंगाल्यांना दिल्लीहून आदेश आला: "पहिले पाढे पढ पंचावन्न."

डॉ. रॉय हे बंगालचे खरे लोकप्रिय पुढारी. डॉ. खऱ्यांनंतर डॉ. मेहता व डॉ. रॉय हे गांधीजींचे डॉक्टर्स होते. एवढा वडिलकीचा वारसा असलेला नेता नेहरूंना कलकत्त्यात नको होता. हा ब्रह्मचारी डॉक्टर नेहरूंना 'तुम् तुम्' म्हणे. ते त्यांच्या खानदानी स्वभावाला मानवत नसे. बंगाली भाषेत 'आप' म्हणण्याची पद्धत नाही काय? खानदानी हिंदीत फक्त कुत्रा व गुलाम यांनाच 'तुम् तुम्' म्हणतात. पण डॉ. बी. सी. रॉय यांच्याविना कलकत्त्यात कम्युनिझमला थोपवील असा प्रचंड पुरुष कोणीच नव्हता. अतुल्य घोष हे बंगालचे डॉ. रॉय यांच्यानंतर सर्वेसर्वा! डॉ. त्रिगुण सेन ही त्यांची निवड. अजय मुखर्जींचा भाऊ हा पक्का कम्युनिस्ट. त्याचे व अतुल्य घोष यांचे वाकडे म्हणून अजय मुखर्जी हे अतुल्य घोष यांच्या काळ्या यादीत. पी. सी. घोष ही अतुल्यांच्या खास मर्जीतली व्यक्ती. ती व्यक्ती आज सिंहासनावर

आहे,(?)याचे श्रेय अतुल्य घोषबाबू यांनाच! नेहमीप्रमाणे बंगालच्या राजकारणातही वैयक्तिक हेवेदावे जोरात आहेतच. तत्त्व, सचोटी, इझम् याला बंगाली राजकारणात फार मोठी किंमत आहे असे मानावयाचे बिलकुल कारण नाही.

सुभाषबाबू सोशॅलिस्ट होते. तरीही बंगालमध्ये ते विशेष मूळ धरू शकले नाहीत. काँग्रेसचा स्टीम रोलर मात्र धडाक्याने बंगालमध्ये फिरत होता. हिंदुमहासभेचे बंगालच्या कालिभक्तांना आकर्षण होते. पण महासभेपाशी बंगालमध्ये काम करण्यासाठी कोणी सच्चे कार्यकर्तेच नव्हते! संघाचे कार्य काही ठिकाणी मायक्रोस्कोपिक प्रमाणात चालते. ते ऐकू येते पण दिसत मात्र नाही. जनसंघाची तीच अवस्था आहे. कदाचित् या विरोधी मंडळींपाशी मोर्चेवाले, घेराववाले, कंत्राटदार या मंडळींना पैसे वाटण्यासाठी फंड नसतील! थोडक्यात साम्यवादी या बाबतीत भांडवलदार आहेत. याउलट तथाकथित भांडवलदारी संस्था या बाबतीत अज्ञानी व खंक आहेत. स्वतंत्र तर कुठे ऐकूच येत नाहीत. तसे म्हटले तर कम्युनिस्टांचे तरी बूड कोठे स्थिर आहे? साम्यवाद्यांत लाल पाच व गुलाबी पाच अशा दहा छटा आहेत. हे असे का, हे समजून घेण्यासाठी कलकत्त्याच्या लोकसंख्येकडे नजर फिरविली पाहिजे.

कलकत्त्याचे मुख्य लोक बंगाली व बिहारी. एक बाबू लोक व दुसरे मजूर. म्हणजे एक मेंदू व दुसरे हातपाय. याशिवाय असंख्य लोक कलकत्त्यात ठाण मांडून बसले आहेत. चिन्यांची भारतातील जास्तीत जास्त वस्ती इथे आहे. सारेच चिनी सारखे दिसतात. त्यामुळे कोण आला व कोण गेला हे कळतच नाही. पाकिस्तानी लोकांच्या हातात गंगा नदीतून चालणारी वाहतूक आहे. त्यामुळे कलकत्त्यास लुळे बनविण्याची किल्ली पाकिस्तानच्या हाती आहे. अमेरिकन्स् व रशियन्स् या दोघांपेक्षा इंग्रज येथे फारच आहेत. बहुतेक सर्व पूर्व हिंदुस्थानातील कंपन्या ब्रिटिश आहेत. भारतीयांना अजूनही हे ब्रिटिश लोक काळा आदमी (Nigger) म्हणतात व तशीच वागणूक देतात. मुंबई व दिल्ली येथील परदेशस्थ असे उद्दामपणाने वागत नाहीत. गुजराथी व मारवाडी लोक कलकत्त्याचा व्यापार सांभाळतात. सारा पैसा यांच्या तिजोऱ्यांत अडकलेला आहे. शीख लोकांच्या हाती टॅक्सीचे मिटर्स आहेत. पंजाब्यांच्या हाती मिटर नसलेल्या अँबॅसेडर 'स्पेशल' टॅक्स्या आहेत. कोणी सहज विचारील, मग बंगाल्यांजवळ काय आहे? त्यांच्या हातात मायक्रोफोन्स् व तोंडात साम्यवादी घोषणा आहेत.

मुंबई व कलकत्ता यांची येथे चांगली तुलना होऊ शकेल. मुंबईत मराठी माणूस व कलकत्त्यात बंगाली बाबू यांना दुसऱ्या वर्गाचे नागरिकत्व प्राप्त झाले आहे. कारकुनाच्या वा मुनिमाच्या नोकऱ्या यांनी कराव्यात. तिजोरीच्या किल्ल्या मात्र गुजराथी व मारवाडी लोकांच्या हातांत. बंगले बंगाल्यांनी बांधावेत व मारवाड्यांनी त्यात राहावे! १९४७ पर्यंत कलकत्त्यात बंगाली माणसाची गळचेपी होती. निदान स्वातंत्र्य मिळाल्यावर आपली हलाखीची परिस्थिती सुधारेल अशी आशा त्याला वाटली. प्रत्यक्षात झाले उलटे. अन्नान्नदशा वाढली, संकटे वाढली, समस्या वाढल्या.

निर्वासितांचे लोंढे आले व कलकत्ता विद्रूप झाले. फार मोठे उद्योग कलकत्ता शहरात वाढले. गंगानदीच्या एका तीरावर प्रचंड Industrial Estate च उभी राहिली. औषधे, यंत्रे, मोटारी, विद्युत उपकरणे, पंखे, सायकली—कलकत्त्यात तयार काय होत नाही आज ? प्रश्न असा आहे : हा सारा तयार माल बंगाली माणसाला किती वापरावयास मिळतो ? त्याला तो परवडतो का ? त्याला भरपूर खायला, राहायला व नेसायला मिळते का ?



बंगाल्यांजवळ काय आहे ?

हा प्रश्न बिहारमध्ये कोणी विचारणार नाहीत. उत्तर प्रदेशात विचारणार नाहीत. काश्मीरमध्ये नाहीत. पण केरळ, महाराष्ट्र वा बंगालमध्ये तेथील लोक हे प्रश्न नक्कीच विचारतील. कारण केसांच्या खाली मेंदू नावाची चीज तेथे आढळते. शिक्षणाने हा मेंदू चांगला तजेलदार झाला आहे. साम्यवादी पुढाऱ्यांनी माणसाच्या आवश्यक गरजा कोणत्या हे सामान्य माणसाला चांगले पढवून ठेवले आहे. त्या गरजा कांग्रेस सरकार पुरवू शकत नाही हे सत्यही प्रत्येक माणसाला नीट उमगले आहे. साम्यवादी पक्षाने दुर्दैवाने बंगाली माणसाला " एवढेच " शिकविले आहे. काम जास्त कसे व का करावे, उत्पादन राष्ट्राच्या अभ्युदयासाठी वाढवावे, राष्ट्रीय ऐक्य संगोपन करावे, राष्ट्रवाद वाढीस लावावा वगैरे गोष्टी साम्यवादात " कमनशिवाने मारतात " बसूच शकत नाहीत. चीन व रशिया येथे तेथील साम्यवादी पक्ष त्या त्या देशांच्या कल्याणाची व वाढीची चिंता वाहतात, त्यासाठी झटतात. आमच्या साम्यवादी पक्षास हे काही नको आहे. हे असे का व्हावे हा प्रश्न मला सारखा सतावतो.

एका पेकिंगवादी कम्युनिस्ट पुढाऱ्याला मी म्हणालो, " इतके दिवस मी एका इंग्रजी कवितेचे उत्तर शोधीत होतो. ते आज मला सापडले."

" कोणती कविता ? "

Breathes there the man
With soul so dead.
Who never to himself
Hath said,
' This is my own,
My native land ' ? "

" आणि उत्तर ? "

" आपण, बाबूजी. "

इंगळासारखे डोळे लाल करून तो पुढारी उत्तरला, " माझ्या मित्रा, गैरसमजूत झाली आहे तुम्हा लोकांची. तू जेवढा देशभक्त आहेस तेवढा मीही आहे. तू धर्माला मानतोस, मीही मानतो."

" फरक एवढाच, की तुझी बुद्धी पेकिंगमध्ये गहाण ठेवली आहेस."

त्याने समोर बोट दाखविले व तो म्हणाला, " ती स्टीफन्स इस्टेट पाहिलीस का ? ती आमच्या एका काँग्रेस पुढाऱ्याने एका रकमेने विकत घेतली. हा परवाचा शाळा मास्तर आणि आज पन्नास लाखांची इमारत विकत घेतो. पैसे काय आकाशातून पडतात होय ? आमच्या अंगाची लाहीलाही होते. या दरोडेखोरांना एकदा चांगली अद्दल घडविली पाहिजे, त्यांना लाथा मारून हाकलवून दिले पाहिजे."

ही धोक्याची व विचित्र विचारसरणी ऐकून कोणीही श्रोता थंड होईल. या विचारसरणीमागे त्याचे डोके कसे व का असे चालते ते बघणे मोठे मनोरंजक ठरेल. त्या कम्युनिस्टाने मला सांगितले, " आम्ही एके काळी काँग्रेसमध्ये होतो. ज्यांना थोर व त्यागी समजले गेले त्यांनीच आम्हांला फशी पाडले. हे पुढारी माजले का ? स्वार्थ व लाचलुचपत यांनी त्यांचे हात बरबटलेले आहेत. आम्ही त्यांना कडकपणे का वागवीत आहोत ? निदान भावी पिढी तरी चांगली निपजावी ही आमची इच्छा आहे. "

काँग्रेसला प्रतिष्ठा डॉ. बी. सी. रॉय यांनी आणून दिली. गांधीजी नोआखलीमध्ये हिंडत होते, त्या वेळेस त्यांच्या पदयात्रेचे धादांत खोटे रिपोर्टस् वार्ताहरांनी वृत्तपत्रांत छापविले. गांधीजींची प्रत्येक स्थळी छी:थू बंगाल्यांनी मिळेल तेथे व मिळेल तेवढी केली. नेहरूंच्या अंगावर तर १९४९ साली पार्क मैदानात बाँब फेकला गेला. काँग्रेसला " जरा बरे " दिवस शास्त्रीजींच्या काळात आले. शास्त्रींनी त्यांच्या मुत्सद्देगिरीने कम्युनिस्टांचा काटा काढला असता. ती ताकद आज इंदिराबाईंच्या अंगात दिसत नाही. १९६२ सालीच काँग्रेसवाल्यांना केरळ व बंगाल येथे आपली सद्दी संपल्याची जाणीव झाली. १९६७ साली त्या विषयीची खात्री होऊन चुकली. ही कम्युनिस्टांची लागण बंगालमध्ये कशी वाढली ?

बुद्धिवान माणसाची अखेर शोकांतिका ही ठरलेली असते. कोणाचीही तत्त्वे व सिद्धांत ठरलेले असतात. जनतेस त्यांचाही कंटाळा येतो. पण सवंग लोकप्रियतेसाठीही वृद्ध मंडळी कोणत्याही थराला वाकू शकतात. आज गांधीजी असते तरी त्यांचीही हीच शोकांतिका अटळ असती. बंगालच्या बुद्धिवंतांना काँग्रेसचे सारे पटते. पण आर्थिक परिस्थितीत काहीच फरक न पडल्यामुळे त्या बुद्धिवंतांचा काँग्रेसवरचा विश्वास उडाला. नैराश्याने, विफलतेने हे बुद्धिवंत साम्यवादाकडे वळले. साम्यवादावर त्यांची फार मोठी श्रद्धा आहे असे नाही. युनायटेड फ्रंटने या बुद्धिवंतांचे डोळे उघडले आहेत. कम्युनिस्टांचे चाळे आज उघडकीस आले आहेत.

त्यांचे उद्दिष्ट, त्यांची चीन व पाकिस्तान या शत्रू राष्ट्रांकडे बघण्याची दृष्टी आणि त्यांचे राष्ट्रवादी पक्षांशी हाडवैर या गोष्टींनी खुद्द साम्यवादी लोकांमध्येच आता फुटाफूट झाली आहे. बुद्धिवंत लोक सर्वत्र सारखेच. कम्युनिस्ट पक्षामध्ये शिरले तरी भांडाभांडी करावयाची प्रवृत्ती कशी थंडावेल ?

कम्युनिस्ट असले तरी बंगाली अस्सल भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी आहेत हे विधान तसे चमत्कारिक आहे, पण ती वस्तुस्थिती आहे. मनाने मागासलेले, जमीनदारी पद्धतीचा पगडा असलेले, भाषेचे अंधाभिमानी, कालीमातेचे पुजारी व भारतीय इतिहास मुखोद्गत असलेले हे बुद्धिवान बंगाली भारतीय संस्कृतीचा फार अभिमान बाळगून आहेत. त्यांच्या स्वभावानुसार बंगाली संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृती हा आग्रह वेडेपणाचा वाटेल. हा वेडेपणा पूर्व बंगालच्या पाकिस्तानी पुढाऱ्यांना डोकेदुखी वाटते. उर्दूस तेथे राजमान्यता नाही. पंजाबी वेश, पंजाबी आहार, पंजाबी दादागिरी आणि पंजाबी बुद्धी या सर्वांना बंगाली-बाबू मुसलमान असले तरी जोरदार विरोध करतात. मुसलमान असूनही सारी संस्कृती हिंदू आहे. भांगात शेंदूर आहे, पोरीबाळींत शालीनता व निष्ठा आहे आणि वाङ्मयात फाजीलपणा नाही. हे चित्र पूर्व बंगालचे. पश्चिम बंगाल तर त्या मानाने संस्कृतीच्या बाबतींत जास्तच सोवळा आहे. कम्युनिस्ट असल्याकारणाने अमेरिकन संपत्ती वा अमेरिकन संस्कृती या दोघांचेही आकर्षण नाही. खरे कारण, गंगेच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या कोणालाच नव्याचे विशेष आकर्षण नाही. नवे खराब आहे म्हणून नाही तर जुने कशाला सोडा ? ते कष्ट कोण करील ? इंग्रजांनी कलकत्त्यातील काही घराणी नखशिखांत इंग्रजी करून सोडली. तरीही त्यांच्या कपाळावरील गंध गेले नाही, सत्यनारायणाची पूजा वा कालीमातेचा प्रसाद यांना खंड नाही. इंग्रजी भाषेचा अभिमानी बाँगला भाषेचा तितकाच कडवा वेडा असतो. बाहेर "मझा" करणारा जमीनदारही घरी 'धोपट मार्गा सोडू नको' असेच म्हणणारा आहे.

प्रश्न उभा राहतो, ह्या लोकांनी जनसंघ का पत्करला नाही ? येथील कम्युनिस्ट हा जनसंघास तर जवळचा आहे. दुर्दैवाने हिंदुत्ववादी संस्थांनी बंगालचे मानसशास्त्र समजून घतले नाही. हिंदुत्ववादी संस्था 'राष्ट्रवाद' एवढाच मंत्र जपत बसल्या. अर्थशास्त्राविषयी अज्ञान हे त्यांच्या ऱ्हासाचे पहिले कारण. पैशाविषयी कडवा तिरस्कार हिंदुत्ववादी पुढाऱ्यांनी पद्धतशीर जोपासला. हिंदुमहासभा मेली ती त्यांच्याजवळ त्यांच्या कार्यकर्त्यांना द्यावयास पैसा नव्हता म्हणून. चांगल्या कार्यकर्त्यांची जरूर लागते त्याहून चांगल्या फंडाचीही जरूर लागते. सभावाले विक्रम सावरकर व जनसंघीय बलराज मधोक यांच्याशी चर्चा करीत असताना मला आढळून आले, त्यांना ही "नवी जाणीव" जोरात होऊ लागली आहे. त्यांची भाषाही आता हळूहळू बदलत चालली आहे.

जनसंघाने नव्या पद्धतीने बंगालात कार्य सुरू केले तर मारवाडी, गुजराती व

पंजाबी धनिकांचे त्यांना बरेच साहाय्य होऊ शकेल. ज्या पक्षाजवळ economic thought व economic programme नाही तो पक्ष बंगालमध्ये टिकूच शकणार नाही. "बंगाल्यांना तीन गोष्टीची जरूर असते," डॉ. त्रिगुण सेन मला सांगत होते. "तांदूळ, नाटक व रसगुल्ले." मासा ही चौथी वस्तू नंतर त्यांनी जास्तीची म्हणून सांगितली. या चिजा जर तुम्ही देणार नसाल तर तुमच्या बाकीच्या गप्पा कोणीच ऐकणार नाही. इतर तत्त्वज्ञान रोटीच्या तत्त्वज्ञानापुढे सब झूट आहे. कम्युनिस्ट ही रोटी देऊ शकतील असे आज बंगालमध्ये कोणालाच वाटत नाही. नक्षलबारीने रोटी मिळणार नाही ही जाणीव तेथे होऊ लागली आहे. दुर्दैवाने त्यांच्या डोळ्यांसमोर चांगला असा पक्ष व चांगली आदर्श वाटावी अशी पुढारी मंडळीच नाहीत.

काँग्रेस पेन्शनरांची संस्था झाली आहे. वैयक्तिक हेवेदावे व असूया म्हणजे काँग्रेसचे राजकारण. प्रत्येक काँग्रेसवाला चांगला गब्बर झाला आहे. सोशॅलिस्ट संस्था कम्युनिस्ट संस्थांच्या मानाने आळणी वाटतात. तेथे खमंगपणा नाही, डोळ्यांत चढणारी नशा नाही. साम्यवादी पक्षापाशी नशा आहे, पण पक्षासाठी शिस्त, जबाबदारी, संघटना व इतरांना आकर्षून घेण्यासाठी लागणारे पुढारीपण, शालीनता आणि रुबाब नाही. कम्युनिस्ट पक्ष पेंढाऱ्यांच्या टोळीप्रमाणे वाटतो. तत्त्वज्ञानाने भारावलेली, राष्ट्रनिष्ठेने पेटलेली, त्यागी, चारित्र्यशुद्ध व बुद्धिमान अशा तरुणपिढीचा अभाव कम्युनिस्टांपाशी आजतरी दिसतो. त्यांच्या रेड् गार्डसच्या गप्पा म्हणून फोल वाटतात. डॉ. हेडगेवार व आप्पाजी जोशी यांनी शिकविलेले व वर वर्णन केल्याप्रमाणे पाच हजार स्वयंसेवक आज कलकत्त्यात उतरले तर सत्तर लाख बंगाली लोक सुताप्रमाणे सरळ येतील!

कम्युनिस्टांचा कल Chaos निर्माण करण्याकडे वाटतो. काँग्रेसचा कल सत्ता टिकविण्याकडे आहे. इतर कोणी ऐकूच येत नाही. त्यातल्या त्यात कम्युनिस्ट निदान काहीतरी आरडाओरडा करतात, म्हणून सारे साम्यवादी पक्षाच्या पेटीत मते टाकतात. साम्यवादी पक्षाजवळ पाच टक्केसुद्धा साम्यवादी तत्त्वज्ञान समजलेले लोक नाहीत. मात्र त्यांच्यापाशी उत्कृष्ट प्रचारयंत्रणा आहे. असल्याचे नसते व नसल्याचे असते करण्याच्या किमयेपुढे काँग्रेस सरकारनेही हात टेकले. कंड्या उठवाव्यात त्या ह्या कम्युनिस्टांनीच. घबराट उत्पन्न करून कोणतीही परिस्थिती आपल्या बाजूस वळवून घ्यायच्या त्यांच्या युक्तीपुढे कोणताही पक्ष आज तेथे टिकणार नाही. 'लोकमत घ्या' ही त्यांची वल्गना ह्या किमयेवर आधारलेली आहे.

परवा स्पीकरच्या घरावर बाँब टाकला तो यांच्याच लोकांनी. नाहीतर पी. सी. घोष यांच्याविरुद्ध असंतोष कसा निर्माण व्हावयाचा? जगात दुःखी माणसास आपोआपच सहानुभूती मिळते हे मानसशास्त्रीय सत्य साम्यवाद्यांनी पुरते ओळखले आहे. अजय मुखर्जींचा विश्वनाथ मुखर्जी हा कम्युनिस्ट भाऊ परवा गर्दीत सापडला.

खुशाल तो मेल्याची अफवा या लोकांनी हवेत सोडून दिली. प्रत्येकजण पोलिसांवर तापला. मुख्य मंत्र्यास बडतर्फ केले, त्याच्या भावास मारून टाकला की हो ! अशा आशयाची चर्चा तापून तापून प्रत्येक कोपऱ्याकोपऱ्यावर ऐकू येऊ लागली. Sensationalism हे ब्लिटझ्चे जे धोरण आपण वाचतो ते प्रत्यक्षात कलकत्त्यात पाहावयास मिळते.



बंगालची गरज

बंगाली पिंडच Sensationalism ला अनुकूल आहे. टिळकांना 'लोकमान्य' महाराष्ट्राने केले. बंगालने त्यांना पुढे जाऊन 'महामान्य' ही पदवी बहाल केली. आपल्याकडे आपण कुणास पॉल मुनी बनवितो, कोणास मेरीलिन मन्रो बनवितो. तीच तऱ्हा बंगालमध्ये दिसते. आज सारी वृत्तपत्रे कम्युनिस्ट पक्षाच्या आधीन आहेत. आमचे Intellectuals म्हणजे कोण ? तर वर्तमानपत्रांचे वाचक हे या पुढाऱ्यांनी चाणाक्षपणे बरोबर हुडकून काढले आहे. त्यांना Appeal होतील अशा बातम्या देऊन त्यांचा मेंदू बरोबर तापत राहील अशी उत्कृष्ट प्रचारयंत्रणा आज त्यांच्या पक्षापाशी आहे. सामान्य अशिक्षित माणसाच्या मनात चीड, गोंधळ व आपल्याविषयी प्रेम कसे तयार करावे हेही हा पक्ष नीट ओळखतो. सारे कलकत्ता शहर पेटले आहे हा प्रवाद त्या साम्यवादी पक्षाच्या प्रचारयंत्रणेचा विजय आहे. इतरांनी हा भाग जरूर शिकण्यासारखा आहे.

उदाहरणार्थ, आम कलकत्ताभर माओचे पन्नास हजार फोटो चिकटविण्यात आले. यात अवघड काय आहे ? दहा हजार रुपये कंत्राटदाराला दिले की हे काम लंडनमध्येसुद्धा होऊ शकेल. त्याचप्रमाणे लाल झेंडे सर्वत्र लावले गेले. ठेकेदाराच्या माणसास तो कोणाचे झेंडे लावत आहे वा कोणाचे फोटो लावीत असतो याचे काहीही भान नसते. कुश्चेव आला त्या वेळी याच कंत्राटदारांना कॉंग्रेस पक्षाने पैसे चारले होते. स्पूटनिक सोडणाऱ्या रशियनांना बनविणारी आमची मंडळी हुशार नाहीत असे कोण म्हणेल ? एक रुपयाला एक माणूस हा साधा हिशेब आहे. चार आणे माणसाला, चार आणे पक्षाला व आठ आणे कंत्राटदारांना – हा खुलासा जाणत्यांसाठी. 'मोर्चा' व 'घेराव' यांचा भाव थोडा जास्त, कारण एखाद्या वेळी पोलिसाची लाठी खावी लागते.

पब्लिकमध्ये बघी मंडळी नेहमीच मिळू शकतात. कंत्राटदाराची माणसे व त्यामागे ही बघ्यांची गर्दी – देखावा मोठा छान दिसतो ! परदेशी तर सोडा पण

आमचेही बातमीदार त्या देखाव्याने थंड होतात व आपल्या रिपोर्टात कम्युनिस्ट पक्षाच्या संघटनेविषयी रकानेच्या रकाने आपल्या कल्पनाशक्तीस ताण देऊन लिहीत बसतात. परवा असेंब्लीसमोर निदर्शने झाली. याचा अर्थ काय? दोनशे-तीनशे कम्युनिस्ट रेड गार्डस् शिस्तीत उभे होते. त्यांच्या हातांत लाल निशाणे होती. तोंडात लाल घोषणा होत्या. त्यांच्यामागे कंत्राटदाराचे पाचशे ते आठशे लोक होते. भाडोत्री ( Mercenary ) असले तरी घोषणा ओरडण्यास काय जाते? आणि त्यांच्या पल्याड ( सुरक्षित अंतरावर ) बघ्या लोकांची ही गर्दी! हे बघे कोण? ऑफिसेस सोडून आलेले, कारखान्यास बुट्टचा मारून आलेले व शाळा-कॉलेजांना टांग मारून आलेली ही जवान मंडळी आरडाओरडा करण्यात पटाईत असतात. -पोलिसांना चिडवितात ती हीच मंडळी! कम्युनिस्ट पक्षाचे नाव बिघडले तर यांच्या बापाचे काय बिघडते?

बघ्यांचे मानसशास्त्र अभ्यास करण्यासारखे आहे. त्यांच्यावर जबाबदारी काहीच नाही. पोलीस आले की धूम पळायचे. पोलिसाने लाठीचार्ज करायच्या आधीच! आता चेंगराचेंगरी झाली की थोडे लोक त्यात मरावयाचेच. कुंभमेळयात वा ख्रिसमसमध्ये तर त्याच्याहीपेक्षा जास्त लोक मरतात. कसे पळायचे याचेही तंत्र ठरलेले आहे. हमरस्त्यावर पोलीस पाठीमागे लागतात. गल्ल्यांत व बोळांत पोलीस, त्यांचे घोडे व त्यांच्या ट्रक्स् येऊ शकत नाहीत. शिवाय गल्लीतून पत्थरबाजी करता येते ते निराळे. आताचे भोळ बातमीदार हे सारे पाहतात, खोलात न शिरता रिपोर्टस् लिहून मोकळे होतात! समजा, रेडिओने म्हटले, सारे शांत आहे. पण रेडिओ म्हणजे मध्यवर्ती सरकारचा. त्याच्यावर विश्वास कोण ठेवणार? रेडिओने चार बळी म्हटले आहे म्हणजे चारशे असणार असा हिशेब हॉटेलच्या खोलीत बसून रिपोर्टर्स करतात. त्यांच्या बातमीपत्रांवर विश्वास ठेवून साऱ्या भारतभर लोक तापून तापून चर्चा करीत असतात!

कलकत्त्यात, विशेषतः, कम्युनिस्ट राज्यात, अतिशयोक्ती फार. बाँबच्या बातम्या आपण वाचतो. पण हे बॉम्स कोठल्यातरी शाळकरी पोराने बनविल्यासारखे वाटतात. काचेच्या गोलकात ॲसिड वा पोटॅश भरला की झाले बंगाली बाँब! मिलीटरी आणली गेली हे कलकत्ताभर झाले! लष्कर Stand-by म्हणून आणले ेले हे कोणाच्या लक्षात येते? त्याचप्रमाणे ६० हजार पोलीस आणले गेले ही बातमी! ७० लाखांच्या वस्तीत तीस हजार पोलीस रोजच असतात. आपल्याकडे कार्य असले की नाही का आपण एखादा आचारी वाढवितो? म्हणून दुप्पट पोलिसांची जरूर लागली तर त्यात आश्चर्य काय? अर्थात् रोज पाच-दहा पोलीस पाहून घाबरणारा वाचक बातमी वाचून ओरडतो, "बापरे, कलकत्त्यात साठ हज्जार पोलीस!"

हे पोलीसही भाडोत्रीच. तरीदेखील लोक यांना कसले घाबरतात. मग लष्करास नुसते पाहूनच पळ काढतील!

कलकत्त्याच्या सामान्य माणसाचा या प्रचारात उत्कृष्टपणे " मामा " बनतो. मला कालीघाटला जायचे होते. टॅक्सीवाला कोणीही यायला तयार नाही. बॉम्ब् बनविण्याचा कारखाना म्हणे तेथे होता. तो Explode झाला ! म्हणून तेथे कर्फ्यू आहे, पोलिसांचा कडक पहारा आहे. पण रेडिओवर तशी बातमी नाही ? बाबूजी, रेडिओवर अशी बातमी दिली तर भारतभर घबराट नाही का होणार ? शेवटी कंटाळून ' लेफ्ट राईट ' करत तेथे गेलो, एकही पोलीस तेथे नव्हता. कसला बाँबचा कारखाना अन् कसले explosion ? Figment of Communist imagination !

जदावपूर या युनिव्हर्सिटी विभागात म्हणे भयंकर दंगा माजला ! प्रत्यक्षात पाहिले तर ही पोरे तीन ते नऊ असे दोन शोज् पाहण्यासाठी थेटरांवर रांगेत उभी होती ! रायटर बिल्डिंगच्या निर्मनुष्यपणाचे वर्तमानपत्रात खूप कौतुक होते. येथे रोज वस्ती कोणाची ? भित्र्या पण अंग्रेजाळलेल्या Macaulay's Bastards ची ! हे का दंगा पाहण्यासाठी बाहेर येणार ? काही वृत्तपत्रांनी बायकांचे व इतर सज्जन नागरिकांचे हात वर असलेले फोटो छापले. इथेही ठेकेदारीची पद्धत आली ! विमल रॉय व सत्यजित रे यांच्या बंगालमध्ये पाहिजे तसे फोटो काढून मिळतील. पोलिसांनी काहीच केले नाही असे सुचविण्याचे माझे मानस नाही. पण हे पोलीस भाडोत्री आहेत, स्वतःच्या जिवास जपणारे आहेत, आळशी आहेत, बंगाली आहेत हे मात्र ओरडून सांगावेसे वाटते. साधा २००–३०० यार्डांचा प्रसिद्ध हौरा पूल ओलांडावयास १–१॥ तास लागतो. मुंबईत गर्दी असते का नाही ? पण बंगालच्या पोलिसांचा आळस वेगळाच ! माझ्यासमोर जमावाने एका चांगल्या कुटुंबाची गाडी थांबविली. का तर म्हणे हरताळात गाडीतून नाही फिरावयाचे ! चाकांतली हवा काढली, काचा फोडल्या. आणि हे समोर १०–१५ पोलीस असताना ! कलकत्त्यास जे ६० हजार पोलीस आणण्यात आले ते सारे असेच ! म्हणा, पोलिसांचेही बरोबर आहे. आजचा फडतूस माणूस उद्या मंत्री म्हणून यावयाचा. त्याला स्वतःच्या नोकरीची व जिवाची भीती आहेच की !

कम्युनिस्ट लोकांना chaos करावयास आवडतो आणि पोलिसांचा नाकर्तेपणा It is takan for granted. त्यात गौशे व हौशे लोकांची मात्र चांगली चलती आहे. ही हौशी मंडळी हजारोंनी उपस्थित राहतात व देशोदेशींच्या वार्ताहरांना वाटते, बापरे, कम्युनिस्टांनी केवढी ही संख्या ! एक कम्युनिस्ट कार्यकर्ता धाय मोकलून रडत होता, " आमच्याजवळ पेटलेले व विश्वासाचे असे पाच टक्केदेखील कार्यकर्ते नाहीत ! हा ९५ टक्के लोंढा उद्या असाच पी. एस. पी. वा जनसंघाकडे पळून जाईल ! काल हा मूर्ख मॉब काँग्रेसपाशी होता. आज आमच्यापाशी आहे." अगदी सुरक्षित अंतरावर उभे राहायचे, निदर्शने करायची व घोषणांची बोंबाबोंब करायची. बस्स्, राजकारण संपले की गल्लोगल्ली चकाट्या पिटायच्या, जो सिंहा-

-सनावर असेल त्याला खाली खेचा अशा वल्गना करावयाच्या आणि खिशात पैसा असेल तर सिनेमा वा नाटके जेथे होतात तेथे गर्दी करावयाची! पैसे नसतील तर? कलकत्त्याची लोकवस्ती ७० लाख आहे ती वाढविण्याच्या तजविजीत लागावयाचे!

गौशे मंडळी बहुधा बिगरबंगाली वाटतात. आज बाहेरगावाहून टोळचाच्या टोळचा कलकत्त्यात येऊन राहिल्या आहेत. जोरदार अफवा पसरविण्यासाठी आज कम्युनिस्टांना यांचा चांगलाच फायदा होत आहे. हे चोर लोक लुटालूट कोठे करतात ? तर बिचाऱ्या लहान लहान लोकांना छळतात. कोणाची फळेच खा, कोठे सिगारेटचे पाकीट पळव, खाद्यपदार्थ खा, एखादी वस्तूच घेऊन ये, वगैरे प्रकार चाललेले असतात. या लहान व्यापाऱ्यांना कोणाचेच संरक्षण नाही. कोर्टात जायला पैसा नाही. पोलिस आले रे, " गोलमॉल हॉय् " " फॉयरिंग हॉय " वगैरे कंड्या पिकविल्या की लुटालूट चालू. बिर्लांची एम्प्रेस बिल्डिंग किंवा फॉरेन एक्स्चेंजची दगडी बिल्डिंग लुटायची कोणाची हिंमत नाही. म्हणून अजापुत्रो बलिम् दद्यात् !

साम्यवादी असला तरी बंगाली माणूस सांस्कृतिकदृष्टचा भारतीय आहे. त्या भारतीयत्वात गबाळेपणा व रूढिप्रियता आलीच. ही सारी सरंजामशाहीची देणगी आहे. काम न करता वडवड करावयाची हे तत्त्वज्ञान आजच्या औद्योगिक युगास नामंजूर आहे. कलकत्त्याचे औद्योगीकरण तर मोठ्या धडाक्याने डॉ. बी. सी. रॉय यांनी चालविले. पण मनाचे औद्योगीकरण कोण व कसे करू शकणार ? इंग्रज साऱ्या जगात Conservative ! बंगाल अजून हेस्टिंग्ज् व कॉर्नवॉलीसच्याच काळात मनाने वावरत आहे. साम्यवाद्यांमुळे अमेरिकन संस्कृती श्रेष्ठ हे म्हणणे बिलकुल नामंजूर ! आणि अमेरिकन संस्कृती कितीही Amoral असली तरी दिवसाचे आठ तास हाडे मोडून काम करून घेते ! ते इथे कसे जमायचे ?

वाढत्या महर्गतेमुळे व रोजच आयात होणाऱ्या निर्वासितांमुळे येथे रोजच्या भाकरीचा प्रश्न बिकट झाला आहे. पंजाबी व सिंधी निर्वासितांनी १२–१२ तास राबून स्वतःची व पंजाबची उन्नती साधली. इथे काम मंजूरच नाही. म्हणून आम्हांस पोसायची जबाबदारी ही सरकारची हे साम्यवादी तत्त्वज्ञान एकदम पसंत ! प्रत्येक निर्वासित भीक मागणार. कम्युनिस्ट राज्यकर्तेदेखील या असल्या आळशीपणाने घाईला येतील. जास्त गडबड करायला जातील तर लोकशाहीच्या गप्पा त्यांनाच ऐकावयास मिळणार ! जनसंघ आला तर हुकूमशाही करून लोकांना सरळ आणले जाईल, हे माझे विधान ऐकून एक बंगाली सामाजिक धुरीण हताशपणे उद्‌गारले, " हुकूमशाही हाच इथे एकमेव मार्ग आहे.. ठोकून काम करवून घेणे हा बंगालवर राज्य करावयाचा अविकृत रस्ता. लोकशाही व बंगाल एकमेकांचे वैरी आहेत. तुम्ही जनसंघ इथे आला तरची बात करता. पण तो येणे शक्य नाही. जनसंघास आमच्या भाकरीचा प्रश्न समजणे शक्य नाही. उद्या येथे हिंदू–मुसलमानांचा दंगा होऊ द्या ! परवाला वाजपेयजी वा मधोक विमानाने इथे हजर होतील. पण तांदळाच्या व इतर औद्यो-



शेवटचे पुण्यकृत

गिक प्रश्नांवर या लोकांनी चुकूनही एकही ठराव पास केला का कुठे ?"

या बाबूजींचे म्हणणे कडू होते पण सत्यही होते. आज लोकशाहीत सत्य लोपले आहे, कडू पण लोकोपयोगी कायदे करण्याची हिंमत कोणाजवळच उरलेली नाहीं. हे Goody–goody राजकारण दमदार वाटत नाही. विद्वान लोक आज गव्हर्नरने केले ते योग्य का अयोग्य, कायदेशीर वा बेकायदेशीर याची चर्चा करीत आहेत. एका कायदेपंडितांनी मला आपल्या Constitution ची कलमे फोड करून सांगितली. तेथेही 'कायदा गाढव आहे' हे पटते. दोन्ही बाजू चूक व दोन्ही बाजू खोटया हे पटते ! या Constitutional पंडितांमुळे देशाचे काय भले होणार आहे ? ही बुद्धिवंत मंडळी मेकड पण सरकारधार्जिणी वाटतात. जे सत्तारूढ ते सरकार ही त्यांची Constitutional व्याख्या ! आणि इतर कोठे भाव नाही, कर्तृत्वाची जरब नाही, हिंमत नाही, म्हणून शब्दांचे कीस काढायचे व तेही नाही जमले तर ' एकला चालोरे ' हे रवींद्रसंगीत आळवायचे. या रडयांना Following च नाही, हे ' एकला चालोरे 'च म्हणावयाचे. ज्योत विझायच्या आधी थोडे सतेज होते. त्याप्रमाणे यांचे शेवटचे पुण्यकृत्य म्हणजे त्यांना कोणे एके काळी वशिल्याने व लांगूलचालनामुळे प्राप्त झालेली पद्मश्री वा इतर किताब सरकारला परत देणे ! आज कलकत्त्याला या गोखल्यांच्या अनुकरणाची बिलकूल जरूर वाटत नाही.

दुर्दैवाने राजकीय अघू दृष्टी व बंडलबाजी बंगालच्या राजकारणात सर्वच पक्षांत


स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड


# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

आढळते. अजय मुखर्जींची कथा काय ? हा सद्गृहस्थ तीन डिसेंबरला जाहीर करतो, "ह्या कम्युनिस्टांना चीन व पाकिस्तान यांची मदत आहे. त्यांना सर्वत्र नक्षलवारी पाहिजे आहे. चीनचे आक्रमण यांना पाहिजे आहे." भल्या गृहस्था, गेले दोन महिने राष्ट्रवाद, देशप्रीती, देशकार्य वगैरे गुणांची जोपासना व्हावी, यासाठी तू काय काय केलेस बरे ? सत्तेचा मोह तुझ्याच्याने का बरे थेट शेवटपर्यंत सोडवला नाही ? तीच कथा स्पीकर विनयकुमार बानर्जींची. आज हा माणूस डी. पी. घोष यांचे मंत्रिमंडळ बेकायदेशीर आहे, असे जाहीर करतो व सभा बरखास्त करतो. भल्या सद्गृहस्था, त्या बेकायदेशीर सभेत तू स्पीकर कायदेशीर कसा ? तुझे बोलणे, तुझी विधाने कायदेशीर कशी ? बेकायदेशीर सभेत बेकायदा स्पीकरने कोणत्या कायद्याच्या आधारे सभा बरखास्त केली ?

एक उर्दू शायरीकार प्रेमाच्या बाबतीत म्हणतो, "हे असे का झाले व कसे झाले ह्या नसत्या पंचायती तू करू नकोस. हे झाले खरे, आणि हे असेच होत राहणार. ते तसे नाही झाले, तर प्रेम आटले म्हणून समज !" बाप रे, कलकत्त्यात सध्या असलेच असुरी प्रेम चालू आहे. आमचे गृहमंत्रीजी धीमेपणाने व उत्कृष्टपणाने एक एक पाऊल उचलीत आहेत. त्यांचे कौतुक आज बंगालमध्ये निश्चित होत आहे. पण एका कम्युनिस्टाने रोकडा सवाल मला विचारला, "समजा, मॉस्कोहून दबाव आले तर हा गृहमंत्री काय करणार ? पुन्हा ताश्कंदच ना ?"

माझ्या मस्तकात झिणझिण्या उठल्या. समजा, असे झाले तर ? तर काय ? Goodbye to Bengal and Assam ! लाल क्रांती झिंदाबाद ! चिन्यांनी तिबेट फटाक्यांवर मिळविला व फटकाऱ्यांनी तो त्यांनी टिकवून धरला आहे. इथे त्यांना बंगाल व आसाम फक्त घोषणा, अफवा व गुंडबाजी यांच्या जोरावर मिळेल. तो प्रदेश टिकणे न टिकणे त्यांचे प्रारब्ध !




## तुमच्या मुलाला उच्च शिक्षण घेता येईल का?

दहावीच्या परीक्षेंत मुकुंदाला ७१ टक्के मार्क मिळाले. पण त्याला वरच्या वर्गांत जाऊन शिक्षण पुढें चालवणें अशक्य झालें आहे. पुष्कळ मुलें हुषार असून पैशांच्या अडचणीमुळें त्यांना शिक्षण अर्धवटच सोडावे लागते. आयुष्यांत थोडी कर्तबगारी करून दाखवायला लागणारी शिदोरीच त्यांना मिळत नाहीं.

तुमच्या मुलाला उत्तम प्रकारें उच्च शिक्षण मिळावे म्हणून तुम्ही निश्चित स्वरूपाची तरतूद केली आहे काय? अशी तरतूद करावयाचा एकमेव मार्ग म्हणजे विमा. ठरलेल्या वेळीं, ठरलेले पैसे तुमच्या मुलाला मिळतील. मग तुम्ही असा वा नसा. विमा उतरवा आणि आजच तुमच्या मुलाला वरच्या वर्गांत घाला.

आयुर्विम्याला पर्याय नाही

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ☐ फॅशनची अन्नान्नदशा

हिंदुस्थानातल्या बायकांना सोन्याच्या दागिन्यांची हौस फार. मला वाटले होते की हिंदुस्थान आता अन्नान्नदशेला लागला असल्याने ही हौस मावळली आहे, पण तसे नाही महाराजा ! जेथे अन्नधान्याची लयलूट आहे आणि दुधा-तुपाच्या—चुकलो, कोकाकोलाच्या नद्या वाहत आहेत अशा अमेरिकेतच फॅशन अन्नान्नदशेला लागली आहे. नाही समजले कसे ते ? मग सांगतो—थोडया दिवसांपूर्वी वर्तमानपत्रांत वाचले की अमेरिकेत छोटया छोटया बिस्किटांच्या इयर-रिंग्ज, माळा, अन् ब्रेसलेट करून हे दागिने अंगावर मिरविण्याची फॅशन निघाली आहे. पाहिलेत ? अन्न हे ब्रह्म आहे, तर फॅशन हे परब्रह्म आहे; पण अन्न आणि फॅशन यांची ही सुग्रास युती पाहून कुठल्या उपाशी माणसाला ब्रह्मांड आठवणार नाही ? ब्रह्मांडावरून सुचले—अंडयाचे ऑम्लेट गळयात तन्मणी म्हणून नाही का वापरता येणार ?

अस्मादिकांच्या लहानपणी निरनिराळया पशु—पक्ष्यांच्या आकाराची बिस्किटे मिळायची. त्या वेळी कोंबडीच्या बिस्किटाची मान मोडून खाताना मला अगदी रोस्ट चिकन खाल्ल्याचा आनंद व्हायचा. गेले ते दिवस—अन् गेली ती बिस्किटे. बिस्किटांचा उपयोग खाण्यासाठी असतो ही देजाब समजूतही आता जाऊ लागलेली दिसते. आता पार्ले आणि ब्रिटानिया कंपन्या कॉलेज-कन्यका व कारकुनिकांसाठी ' कॉस्च्यूम ज्युएलरी ' तयार करणार—" अय्या, सुशे, केव्हा ग मोनॅकोचे टॉप्स घेतलेस ? कित्ती छान दिसतात, नाही...? " " नलू, तू म्हणे ग्लूकोचा नेकलेस करायला टाकलास...? आहे बाई थाट ! " " अग, शकूनं म्हणे ब्रिटानियाचे लॉकेट पाहिजे असा यजमानांकडे हट्ट धरलाय्..."

—बस, ठरले ! आपण बायकोला पुढच्या दिवाळीला खाऱ्या बिस्किटाची अंगठी प्रेझेंट देणार !

## ☐ काहीही न करण्याची कला

ऑस्ट्रेलियाची राजधानी कॅनबेरा येथे नुकतीच स्थानीय निवडणूक झाली, तेव्हा "निवडून दिल्यास मी काहीही करणार नाही " असे जाहीर आश्वासन देणारा

एक माणूस निवडून आला आहे. भले शाबास ! काहीही न करणे हा तर आम्हा भारतीयांच्या हातचा मळ आहे. पण ऑस्ट्रेलियासारख्या मागासलेल्या देशात ही गोष्ट अवघड समजली जात असावी, म्हणून ती करून दाखविण्याचे प्रस्तुत उमेदवाराला आश्वासन द्यावे लागलेले दिसते. पण आतां निवडून आल्यावर तरी या माणसाला ही गोष्ट जमली आहे का ? नसेल जमल्यास त्याने या गोष्टीचे उच्च शिक्षण घेण्यासाठी हिंदुस्थानात यावे अशी माझी त्याला सूचना आहे. हिंदुस्थानात पार्लमेंटपासून लोकल बोर्डांपर्यंत कुठल्याही निवडणुकीत निवडून आलेला उमेदवार दोन निवडणुकींच्या मधला काळ काहीही न करता कसा घालवावा याचे उत्कृष्ट प्रात्यक्षिक करून दाखवू शकेल.

इतकेच काय, पण लोकशाहीला वाहिलेल्या या आपल्या देशात काहीही न करण्याचे अनेक प्रकारही शोधून काढण्यात आले आहेत. एक प्रकार म्हणजे जी गोष्ट करायची असेल तिच्यावर पल्लेदार भाषण करणे. कारण जगात इतरत्र वाफेवर चालणारी यंत्रे असली तरी हिंदुस्थानात ती तोंडाच्या वाफेवर चालतात. दुसरा प्रकार म्हणजे त्या गोष्टीवर "विचार चालू" आहे अशी ग्वाही देणे. अर्थात् "विचार चालू, काम बंद." तिसरा प्रकार म्हणजे त्या गोष्टीवर सेमिनार भरविणे. कारण "अधिक धान्य कसे पैदा करावे ? " या सोप्या प्रश्नाचे "अधिक शेती करून " हे अवघड उत्तर शोधून काढायला चाळीस विद्वानांना चार दिवस चर्चा करावी लागते. तेव्हा काहीही न करण्याचे तंत्र शिकू पाहणाऱ्या कोठल्याही माणसाला हिंदुस्थानात निष्क्रियतेवर झालेला हा रिसर्च डोळ्याआड करून चालणार नाही.

## □ " हिंग्लिश " भाषा

राज्यकारभाराची भाषा इंग्लिश असावी की हिंदी यावर सध्या दिल्लीत खडाजंगी चालू आहे. पण प्रेमाची भाषा कोणती असावी ? दिल्लीच्या एका प्रेमवीर ऑटो रिक्षावाल्याने हिंदी आणि इंग्लिश यांचा प्रेमविवाह करून ' हिंग्लिश ' भाषा तयार केलेली दिसते. परवा त्याच्या रिक्षावर पाठीमागे मी एक कविता वाचली—

" ऑफर करता हूँ दिलको, रिफ्यूज न करना,
मेरी मोहब्बत के बल्बको फ्यूज न करना.

मार डाला ! एखादे कोल्ड्रिंक ऑफर करावे तितक्या अगत्याने दिल ऑफर केलेले पाहून कोणत्या प्रेयसीचे हृदय त्या कोल्ड्रिंकसारखे द्रवणार नाही ? अन् त्याच्या मोहब्बतचा शंभर कँडलपॉवरचा बल्ब प्रकाशताना पाहून तिच्याही हृदयात प्रीतीचा ट्यूबलाइट लागला तर नवल काय ? मला वाटते हा रिक्शावाला लवकरच फिल्मी गीतांचा लेखक म्हणून पुढे येणार. कारण लव्ह इन् टोकियो, अराउंड द वर्ल्ड, फिफ्टी–फिफ्टी, मिस्टर एक्स इन् बॉम्बे अशा हिंदी भाषेतल्या पण इंग्लिश नावांच्या चित्रपटांना आवश्यक असणारी द्विभाषिक खिचडी त्याला चांगली जमेल. ●

# नेहरू हॉकी स्पर्धेचा निष्कर्ष

२२ नोव्हेंबर ते ११ डिसेंबरपर्यंत नव्या दिल्लीतील लेडी हार्डिंज क्रीडांगणावर पंडित जवाहरलाल नेहरू स्मारक हॉकी स्पर्धेचे सामने झाले. त्यांमधील अंतिम सामना नॉर्दर्न रेल्वे आणि इंडियन नेव्ही या दोन संघांत होऊन कुणाचाच गोल न झाल्याने बरोबरीत सुटला. त्यामुळे 'नेहरू करंडक' दोन संघांकडे सहा-सहा महिने ठेवण्याची परवानगी देण्यात आली.

भारतामधील हॉकीची ही एक महत्त्वपूर्ण स्पर्धा आता बनली आहे. पुढील वर्षीच्या मेक्सिको येथील ऑलिंपिक स्पर्धाकरिता भारताचा संघ निवडण्याकरिता नेहरू स्पर्धेने एक मोठीच कामगिरी बजावली आहे. मुख्य काम म्हणजे नेहरू स्पर्धा भरविणाऱ्या चालकांनी ती निःस्वार्थपणे, कळकळीने आणि मन लावून पार पाडली. सर्व व्यवस्था चोख आणि जिथल्या तिथे होती. मैदानाची परिस्थिती वरच्या दर्जाची सतत राखण्यात आली होती आणि तेथील कार्यकर्ते अहोरात्र ही स्पर्धा यशस्वी व्हावी म्हणून झटत होते. साहजिकच स्वर्गीय नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाचे वलय तेथे रेंगाळत होते !

परंतु नेहरू स्पर्धेतील बहुतेक सामने कंटाळवाणे आणि चमकदार खेळाच्या अभावानेच जाणवले. पुष्कळ सामने अनिर्णित राहिले, ते पुन्हा खेळले गेले आणि क्वचितच कुठे दर्जेदार आणि आक्रमक हॉकीचा प्रत्यय आला. भारतीय हॉकीचा झोक आणि कलात्मक रेखीवपणा कमी झालेला आढळला. खेळातील तंत्रावर भर देण्यापेक्षा घसमुसळेपणा आणि सामर्थ्यावर अवलंबून राहून खेळाडूंनी भारतीय हॉकी परंपरेची शान कमी केली. आघाडीच्या फळीतील हॉकीपटू एकत्र वावरताना क्वचितच आढळले. त्यांच्यात योजनाबद्ध हालचालही नव्हती.

परंतु या सर्व धकाधकीत संयुक्त विद्यापीठ संघातील तरुण खेळाडूंचा संच प्रकर्षाने चमकला. पंजाबी संघाचा पराभव करून ते उपान्त्य पूर्वफेरीत पोहोचले आणि मीरतच्या शीख रेजिमेंटल संघाला त्यांनी केवळ एक गोलाने नामोहरम करून उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली. शीख रेजिमेंटल १९६५ मधील 'नेहरू करंडका'चे विजेते होते एवढी एकच गोष्ट लक्षात घेतली म्हणजे विद्यापीठ हॉकीपटूंचे कर्तृत्व ध्यानात येते.

विद्यापीठाच्या खेळाडूंच्या विजयाचे रहस्य काही केवळ त्यांच्या तरुण रक्तात नव्हते. मैदानावरील त्यांची प्रत्येक हालचाल शास्त्रशुद्ध आणि आक्रमक होती. त्यात सामर्थ्याप्रमाणे वेगही भरपूर होता. जिंकण्याची जिद्द होती, काही तरी करून दाखवावे अशी ईर्ष्या होती. आणि सतत ते संघभावनेने खेळले. आमच्याकडे निदान दहा-बारा खेळाडू तरी इतके चांगले निघतात की काहीशा उत्तेजनाने व सरावाने

भारताचे भवितव्य ते आज ना उद्या घडवू शकतील.

नेहरू स्पर्धेत जुन्या-नव्यांचा संघर्ष घडला. यापेक्षाही हॉकीचे नवे तंत्र आणि दुर्लक्ष, ताकदीचा योग्य उपयोग आणि बेफिकिरी, चापल्य आणि शिथिलता असा विरोधाभासच जाणवला. याचे कारण एकच की नेहरू स्पर्धेकडे नव्यांनी ज्या ईर्ष्येने आणि अहमहमिकेने पाहिले तसे जुन्यांनी तिकडे लक्ष दिले नाही. कदाचित या स्पर्धेपेक्षा वरच्या श्रेणीचे सामने खेळल्यामुळे त्यांच्यात ही भावना आली असेल. क्वचित् त्यांच्या शारीरिक ठाकठीकपणावरही सतत खेळून ताण पडला असेल. नुकत्याच लंडनच्या महोत्सवी स्पर्धेत पाकिस्तानने भारताचा १–० असा पराभव केला. १९ ते २६ जानेवारीपर्यंत लाहोर येथे आंतरराष्ट्रीय महोत्सवी हॉकी स्पर्धा घेण्यात येणार आहे. भारतीय निवड समितीला आताच ठरवावयास पाहिजे की भारतीय संघ निवडण्यासाठी कोणत्या मूलभूत गोष्टींचा आपण विचार करावयास हवा. केवळ नावाचे हॉकीपटू घेण्यापेक्षा अचूक तंत्र, योग्य हालचाल, ताब्यात राहणारा वेग, बौद्धिक क्लृप्त्या, शारीरिक तन्दुरुस्ती आणि सांघिक भावना राखणाऱ्या खेळाडूंनाच यापुढे भारतीय संघात संधी दिली जावी. मगच त्यात नव्या-जुन्या खेळाडूंचा उत्तम संघ बनू शकेल.


## □ शासनाशी ' मुष्टीयुद्ध '

तिसऱ्या आशियाई मुष्टियुक्त स्पर्धेत भारतीय संघाने भाग घेतला नाही. ९ डिसेंबरपासून त्या कोलंबो येथे सुरू होणार होत्या. सहा किंवा सात मुष्टियुद्धपटू, एक–दोन व्यवस्थापक आणि शिक्षक सिलोनला गेले असते तर काही बिघडत नव्हते. परदेशी हुंडणावळही फार लागली नसती.

एक महिन्यापूर्वीच कोलंबोला संघ पाठविण्याचे भारतीय बॉक्सिंग फेडरेशनने ठरविले होते. संलग्न संस्थांना त्यांनी पत्रे पाठवून कलकत्ता येथे एक शिक्षण व सराव–शिबिरही भरविण्याचे ठरविले होते पण कुठे माशी शिंकली कोण जाणे ! नंतर मुष्टियुद्ध संस्थेने ' सरकारच्या मौना 'मुळे हा प्रकार घडल्याचे प्रकट केले. परंतु केंद्र सरकारच्या एका प्रवक्त्यान सांगितले की ५० टक्के मदत आम्ही देण्याचे कबूल केले होते. त्यात विमानाचा येण्या-जाण्याचा खर्च होता. ही गोष्ट भारतीय मुष्टियुद्ध संस्थेला ८ नोव्हेंबर रोजीच कळविण्यात आली होती. दोन वर्षांपूर्वी सेऊल येथे झालेल्या आशियाई स्पर्धेतूनही भारतान ऐनवेळी अंग काढून घेतले. आणि याच व अशाच कारणांसाठी. पण या वेळी तर सरकार निम्मा खर्च देण्यास तयार होते आणि तेही अगदी वेळेवर कळवून.

भारतीय मुष्टियुद्ध संस्थेचे अध्यक्ष अशोक चतर्जी म्हणाले की ८ नोव्हेंबरचे पत्र आम्हांला दहाला मिळाले. प्रवेश–अर्ज भरण्याची तीच अखेरची तारीख होती.

[पृष्ठ ६१ वर]



# पुस्तके

एका कसबी टीकाकाराच्या नात्याने नव्हे तर संस्कारक्षम वाचक म्हणून ‘ कालचक्र ’ या कादंबरीविषयी लिहिण्याचा प्रयत्न करणार आहे. यापूर्वी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की माझे जन्मस्थान ‘ आंबेजोगाई ’ म्हणजे बीड जिल्ह्यातील एक तालुका आहे. ही कादंबरी बीड येथे घडलेली आहे. ‘ कालचक्र ’च्या रसग्रहणाशी याचा तसा काही संबंध नसला तरी माझ्या जीवनातील लहानपणीच्या स्मृती या बीड जिल्ह्याशी निगडीत आहेत. पारगावकरांनी या कादंबरीमध्ये मराठवाड्यातील (बीड) एका प्रसिद्ध वकील घराण्याच्या जीवनाचे अंतरंग कलाबद्ध केलेले आहे. विशेषत: या घराण्यातील अंतरंग म्हणजे स्त्रीजीवनच वारुणेच्या रूपाने त्यांनी उभे केले आहे. अर्थात या जीवनाला शब्दांकित करीत असताना कालाचे चक्रही त्यांनी असे फिरविले आहे की, त्या गतीमध्ये वारुणाच्या जीवनाचा विकास साधता यावा. जीवनाचा हा विशाल पट उभा करण्याचा आवाका निश्चित मोठा आहे. तरीही ही कादंबरी वाचल्यानंतर मनात अनेक प्रश्न निर्माण होतातच. पारगावकरांच्या लेखनातील गुण तसेच दोषही ठळक होतात. या गुणदोषांचे विवेचन मी येथे यथाशक्ती करणार आहे.

पारगावकरांच्या लेखनातील एकमेव शक्ती म्हणजे ते कलाजीवनात निर्माण होणाऱ्या भावनांचे विश्लेषण अतिशय समर्थपणे करतात. यासाठी त्यांच्या ‘ अस्थी ’, ‘ पंचरंगी स्वप्न ’, ‘ स्वाती ’ या कथांचे उदाहरण देता येईल. या कथांचे एकमेव यश नाजूक भावनांचे सुजाण विश्लेषण हेच आहे. ‘ कालचक्र ’ या कादंबरीतील पहिले यशही तिथेच आहे. पारगावकरांची प्रतिभा पात्रांच्या भावजीवनात इतकी रमते की, परिणामत: हे भावजीवन ती सर्व सामर्थ्यानिशी आपल्या कलाकृतीच्या द्वारे उभी करू शकते. मनुष्यमात्राचे भावजीवन मुळातच इतके सामर्थ्यशाली असते आणि स्वभावत:च या जीवनाचे आवाहन वाचकांनाही असते. याच भावजीवनाला कलारूप देण्याचे पारगावकरांचे सामर्थ्य अलौकिक आहे आणि हे सामर्थ्यच त्यांना प्रसिद्ध कथाकार आणि कादंबरीकार म्हणून यश मिळवून देण्यासाठी त्यांच्या पाठीशी उभे आहे.

परंतु आजचा वाचक भावजीवनात रमून जाण्याचे नाकारतो. त्याला जीवनातील

# सर्व गुणदोषांसकट यशस्वी ठरलेली कलाकृती : ' कालचक्र '

प्रश्नांचे उत्तर बौद्धिक पातळीवरून अथवा तर्कसंगत आविष्कारावरून हवे असते. पारगावकर आपल्या कलाकृतीमध्ये या मार्गाने गेलेले दिसत नाहीत. त्यांच्या कलाकृतीला भावनांच्या रंगरूपाशीच आपले नाते जोडावेसे वाटते. ' कालचक्र 'मधील नायिका वारुणा हिच्या भावजीवनाचाच आविष्कार या कादंबरीचा मुख्य गाभा आहे. मात्र या भावजीवनाचे चित्रण येथे अतिशय समर्थपणे केले गेलेले आहे, या एकाच निकषावरूनदेखील या कादंबरीचे यश मानावेच लागेल.

अर्थात या ठिकाणी मी भावनांच्या समर्थ चित्रणाविषयी जेव्हा उल्लेख करतो तेव्हा माझ्या मनात भावनांची शक्ती म्हणजे आकांत करणारी, डोळे डबडबायला लावणारी, ऊरबडवी (Tear jerking) असे भावनांचे रूप मला अभिप्रेत नाही. भावनांचे असे सवंग विश्लेषण हा दोष केव्हाही शिरलेला नाही.

व्यक्तीच्या आंतरिक जीवनाला स्पर्श करायचा असेल, तिच्या मर्मस्थानांचा परिचय करून घ्यावयाचा असेल तर त्या व्यक्तीचे संस्कारमय जीवन जाणून घेणे आवश्यक असते आणि असे संस्कारमय जीवन जाणून घेण्यासाठी तिच्या भावविश्वाची ओळख अवश्य आहे. आणि हे संस्कारमय जीवन म्हणजे काय ? परंपरा, रूढी, आदर्श, त्याग अशांसारख्या मूल्यांना प्रमाण मानणारे आणि त्यांसाठीच जगणारे जे जीवन ते संस्कारमय जीवन होय. आणि जेव्हा एखाद्या व्यक्तीचे संस्कारमय जीवन कलेत चित्रीत केले जाते तेव्हा त्या पात्राची जीवनमूल्येदेखील स्पष्ट होतात. आणि जीवनमूल्यांचा असा आविष्कार करीत असताना खऱ्या कलावंताला भावनातिरेक करण्याची मुळीच गरज नसते. ' कालचक्र ' वाचीत असताना माझ्या डोळयांत पाणी आले नाही. मला वाटते कोणत्याही वाचकाच्या येणार नाही. कारण हाच संयम हे पारगावकरांचे दुसरे सामर्थ्य आहे. अर्थात ' कालचक्र 'मधील वारुणेविषयी वाचकांना आपुलकी आणि सहानुभूती नक्कीच वाटते. शिवाय वारुणा ही व्यक्ती समकालीन नसतानादेखील वाटते, हेदेखील कलेचे यशच मानावे लागेल.

आता वारुणेविषयी सहानुभूती का वाटते याचे विश्लेषण करू. वारुणेच्या स्वभावविशेषाविषयीही काही वेगळया दृष्टीने विचार करता येतो का ते पाहिले पाहिजे.

वारुणेविषयी वाचकांच्या मनात सहानुभूती निर्माण होते असे मी वर म्हटले

आहे. याचे सहज कारण असे की तिचे जीवनचित्रण संस्कारमय आहे. वारुणा ही स्त्री संस्कारांपासून अलिप्त राहून जगूच शकणार नाही. संस्कार उणे वारुणा बाकी शून्य असे गणित मांडले तर ते चूक ठरणार नाही.

## वारुणा : प्रभावी चित्रण

'कालचक्र' या कादंबरीतील वर मांडलेल्या समीकरणाच्या दृष्टीने पाहता कादंबरीत हा उणेपणा आहे हे जसे प्रस्थापित करता येईल तसेच या कादंबरीतील पारगावकरांचे यशही तेच आहे हेही कबूल करावे लागेल. माझ्या या विधानामुळे आपल्या मनाचा गोंधळ उडेल हे मला माहीत आहे. परंतु एकदा 'कालचक्र' या कादंबरीचा विषय 'मानवाचे संस्कारमय जीवन' आहे हे मान्य केल्यानंतर त्या जीवनचित्रणातील यशापयशाचा आढावा घेताना पारगावकरांनी या जीवनामध्ये विलक्षण ताकद ओतली आहे हे कबूल करावे लागते. वारुणेच्या जीवनातील संस्कारांचे चित्रण, त्यांची प्रेरणा, उगमस्थान आणि विकास या तिन्ही टप्प्यांवरून पारगावकरांनी चांगले यश मिळविले आहे हे सहज दिसून येते.

वारुणा ही राजेकरांच्या घराण्यात येते ती स्वतःला भाग्यवान समजूनच. आणि तेथून पुढचे तिचे सारे प्रयत्न या घराण्याचे संस्कार समजावून घेण्यात आणि शिकण्यात जातात. लेखकाने त्यासाठी योजिलेला प्रत्येक प्रसंग प्रत्ययकारी आणि कलेच्या दृष्टीनेही यशस्वी आहे. इतकेच नव्हे तर दादासाहेब–वारुणेचा नवरा–यांचे चित्रण दुय्यम दर्जाचे करण्यातील पारगावकरांचा हेतू जितका स्पष्ट दिसतो तितकेच त्यांचे चित्रणही स्वाभाविक वाटते. वारुणेच्या मनावर तिच्या पतीचा जेवढा प्रभाव नाही तेवढा तिच्या सासऱ्याचा–भाऊसाहेबांचा–आहे. शिवाय या संस्कारांच्या बाबतीत असे म्हणता येईल, की 'कालचक्र'मध्ये वारुणेच्या उपस्थितीत त्यांचे जेवढे चित्रण झालेले आहे तेवढेच तिच्या अनुपस्थितीतील भागांतही या संस्कारांचे चित्रण झालेले आहे. जणू संस्कार, मर्यादा, भावभावना, आदर्श, प्रतिष्ठा या सर्व गोष्टी कादंबरीचा स्थायीभावच बनलेला आहे. आणि या स्थायीभावांचे उगमस्थान भाऊसाहेब आणि प्रणेती वारुणा आहे.

वारुणा वयात येते तेव्हा भाऊसाहेबांचा मृत्यू होतो. परंतु तेव्हापर्यंत वारुणेने या घराच्या विशिष्ट व्यक्तित्वाचा पूर्णपणे ताबा घेतलेला असतो. भाऊसाहेबांच्या मृत्युनंतर राजेकरांच्या घराण्यामध्ये मोठे परिवर्तन होते. या परिवर्तनात वारुणेची सासू–गोपिकाबाई–देखील डळमळीत होते. आदर्श मूल्यांचा विसर पडून विकारी भावनांच्या ती आहारी जाते. परंतु त्या वेळी वारुणा मात्र अविचल असते. भावाभावांतील संघर्ष, मुलगा आणि आई यांच्यांतील उथळ पातळीवरील बेबनाव, मुलगी–आक्का आणि आई–गोपिकाबाई यांच्यांतील आदर्शाला गालबोट लावणारे संगनमत, या साऱ्या कसोटीच्या प्रसंगांना एका अत्यंत धीरोदात्त भूमिकेवरून वारुणा तोंड देते. येथेच वारुणेच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख पटते आणि लेखकाने मिळविलेल्या

यशाचेही दर्शन घडते.

स्वभावपरिपोष आणि भावनामय निवेदन या दोन गोष्टींचा नीट अर्थही 'कालचक्र'च्या संदर्भात समजावून घेणे आवश्यक आहे. पारगावकरांनी ज्या ज्या ठिकाणी स्वभावपरिपोषासाठी भावनांच्या विश्लेषणाचा उपयोग केलेला आहे त्या त्या ठिकाणी कलेची फलश्रुती यशस्वी झालेली आहे. याचे एकमेव आणि उत्तम उदाहरण म्हणजे वारुणेचे जीवनचित्रण. नंतर भाऊसाहेब, तात्या, आनंदी आणि आक्का. मात्र ज्या ठिकाणी फक्त भावनामय निवेदनच केल्यामुळे व्यक्ती निर्जीव, मुक्या आणि अस्पष्ट राहिलेल्या आहेत त्या म्हणजे नानू आणि माधव. नानूच्या बाबतीत तर लेखकाकडून फार अन्याय झालेला आहे असे म्हणणे भाग आहे आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'कालचक्र'मधील साऱ्या व्यक्ती केवळ वारुणेच्या दृष्टिकोनातून लेखकाने पाहिल्या आहेत असे विधान करण्याइतका सबळ पुरावा या कादंबरीत मिळतो. एक भाऊसाहेब सोडले तर बाकीच्या सर्व व्यक्ती आपले स्वत:चे काही वैशिष्टय व्यक्त करतात असे दिसत नाही. लेखकाच्या वरील दृष्टिकोणामुळे हा दोष आला असावा असे मानावे लागते.

या कादंबरीमध्ये दुसरा महत्त्वाचा भाग नानू आणि वारुणा यांच्या (कादंबरीतील) नात्याचा आहे. नानूच्या प्रसंगानेच कादंबरीची सुरुवात होते आणि हा प्रसंग वारुणेच्या संदर्भातच आहे. (ती न्हाणीघरात आंघोळ करीत असताना सोळा वर्षांचा तिचा दीर नानू तिचे उघडे शरीर गच्चीवरून पाहतो.) हा प्रसंग घडल्यानंतरपासून नानू घर सोडून जाईपर्यंतचा कादंबरीतील भाग कलेचे आव्हान स्वीकारून लिहिलेला आहे. परंतु पुढे नानूचा सबंध कादंबरीभर कुठेही उल्लेख आलेला नाही. कादंबरीच्या शेवटी नानू येतो. (तेव्हा दोघेही वृद्ध झालेले आहेत.) तो परत आल्यानंतरचे त्यांचे संवाद ठीक आहेत. त्याने आपल्या प्रेमाच्या, त्यागाच्या आणि अनुभवाच्या गोष्टी वारुणेला सांगितल्या, तिने त्या शांतपणे ऐकल्या. इथेही स्पष्टपणे लक्षात येण्यासारखी गोष्ट ही आहे की नानूचा बोलघेवडेपणा आणि वारुणेचा अबोल स्वभाव मनावर परिणाम करून जातात. तरी पण कादंबरीच्या सुरुवातीच्या मानाने तिचा शेवट परिणामकारक वाटत नाही.

कादंबरीतील पात्रांचा विचार केला तर अगदी ठळकपणे एक गोष्ट लक्षात येते. ती म्हणजे तिच्यातील पुरुषपात्रांपेक्षा स्त्रीपात्रांचे चित्रण प्रभावी झालेले आहे. वारुणा तर आहेच परंतु गोपिकाबाई, आक्कावन्सं आणि आनंदी यांचे चित्रण जिवंत झालेले आहे. स्त्रियांचे भावजीवन पुरुषपात्रांच्या भावजीवनापेक्षा अधिक प्रभावी झालेले आहे. दादासाहेबांचे व्यक्तिचित्रण तर अगदीच अस्पष्ट वाटते. शिवाय भाऊसाहेब आणि दादासाहेब यांच्यांतील अंतर्द्वन्द नीट व्यक्त झाले असते. तर आणखी एक मोठा आशय कलाकृतीला मिळाला असता.

## वातावरण

हे झाले कादंबरीचे अंतरंग. आता तिच्या बाह्यांगाविषयी काही लिहिता येण्यासारखे आहे. ही कादंबरी बीड शहरात घडते. बीड येथील राजेकर आडनावाच्या एका घराण्यातील बदलत्या संस्कारांचे हे कलात्मक चित्रण आहे. त्या दृष्टीने पाहता जर कोणाला असे वाटले की 'कालचक्र'मध्ये बीड शहराच्या बाह्यांगाचे अथवा अंतरंगाचे काही चित्रण पाहावयास मिळेल तर ते खरे नाही. प्रादेशिक विशेषता तेथील जीवनाशी निगडित असते. इतकेच नव्हे तर ते सारे प्रादेशिक वातावरण आणि त्याचे जीवनाशी नाते अपरिहार्य असते असे मला वाटते. परंतु 'कालचक्र'मध्ये बीडऐवजी 'परभणी' किंवा 'सातारा' शहराचा उल्लेख केला असता तरी कादंबरीत काही फरक पडला नसता. प्रादेशिक वातावरणाला पारगावकरांनी इथे इतके गौण महत्त्व दिले आहे. दुसरे म्हणजे कादंबरीमधील जो काळ आहे तेव्हा बीड येथे निजामाचे राज्य होते. त्या दृष्टीने उर्दूचा तेथील मराठी भाषेवर एक विशिष्ट प्रभाव पडलेला आहे. तेथील मराठी भाषा भिन्न आहे. परंतु 'कालचक्र'मध्ये अशा बोलीभाषेला स्थान मिळालेले दिसत नाही. तसेच बीड येथील कलेक्टर हे पारगावकरांनी जॉन हंटर या नावाचे आणि डॉक्टर डिक् या नावाचे आणलेले आहेत. ब्रिटिश राज्यातील जिल्ह्यांत ते शोभून दिसले असते. बीडमधील एखादा मोहिउद्दिन किंवा अब्दुल सत्तार अथवा अकबर अल्ली ही नावे जास्त युक्त ठरली असती असे वाटते.

वारुणेच्या संस्कारमय मनाच्या कालचक्राप्रमाणे बीड शहराचेही 'कालचक्र' पारगावकरांना चित्रित करता आलेले नाही.

यावर लेखकाचे असे समर्थन येण्याची शक्यता आहे की, 'कालचक्र'मधील नायिका वारुणा हिनेदेखील उभ्या आयुष्यात बीड शहराचे पूर्ण दर्शन घेतले नाही तर तिला सोडून वाचकांना मी त्या शहराचे दर्शन का द्यावे?'

लेखकाचे हे उत्तर असले आणि त्याच्यापुरते ते बरोबर असले तरी कलाकृतीची मागणी लेखकाच्या बाजूने कौल देणार नाही.

आता शेवटचा मुद्दा नानू आणि वारुणा यांच्यांतील संबंध आणि चित्रणाविषयी घेऊ. या कादंबरीतील एकमेव बुद्धिप्रधान पात्र म्हणजे नानू. शिवाय कादंबरीची सुरुवात आणि शेवटही नानू आणि वारुणेवरच आधारलेले आहेत. तरीही या

---

**कालचक्र : लेखक वि. शं. पारगावकर**

**इनामदार बंधू प्रकाशन, पुणे**

**पृष्ठे : २४० : मूल्य ६ रुपये**

कादंबरीचा विषय नानू आणि वारुणा नाही, तर केवळ वारुणाच आहे. कारण नानू ह्या प्रथम येतो आणि नंतर सबंध कादंबरीमध्ये लुप्त होतो. तो पुन्हा प्रकट होतो अगदी शेवटी शेवटी. तरीही तो विजेचे तेज प्रकट करतो. तर्कसंगत बुद्धीच्या निकषावर तो आपल्या जीवनाचे विश्लेषण करतो. आणि वारुणेच्या मनाला प्रचंड धक्का देतो. त्याच्या जीवनाची ज्योत विझतेवेळी मोठी होते, प्रखर होते. त्या तेजाने वारुणेची बुद्धी चाळवते, मन भांबावते आणि नानूने सांगितलेल्या जीवनातील विशिष्ट सत्याचा धक्का तिच्या भावनाशील संस्कारी मनाला सहन होत नाही. तिच्या मनात प्रलयाच्या लाटा उसळू लागतात. आणि चहूकडे अंधार दिसू लागतो.

–आणि इथेच ' कालचक्रा 'च्या गतीचे एक आवर्त पूर्ण होते !

शेवटी सर्व गुणदोषांचे विश्लेषण करूनदेखील एक गोष्ट अबाधित राहते. ती म्हणजे पारगावकर यांच्यातील जीवनविश्लेषणाची शक्ती. प्रतिभेचा एक कणदेखील प्रबळ आणि समर्थ असेल तरीदेखील कलाकृती महत्त्वपूर्ण होऊ शकते.

' पंचरंगी स्वप्न ', ' स्वाती ', ' मोर ', ' अस्थी ' आणि अगदी अलीकडे ' बेट ' या कथा समर्थपणे उभ्या करणाऱ्या पारगावकरांची ही कादंबरी आहे एवढेच शेवटी म्हटले तरी पुरे आहे.

[ मूळ हिंदीवरून ]

**–डॉ. राजमल बोरा,**
तिरुपती

---

## क्रीडांगण

[ पृष्ठ ५५ वरून ]

परंतु चतर्जी यांनी स्वतःच म्हटले आहे की कोलंबो येथील स्पर्धा–चालक भारतीय संघाला प्रवेश देण्यास उत्सुक होते. ट्रंक–कॉल करून पाठवूनही भारताला अगदी ऐनवेळी भारतीय संघ पाठविण्याची तजवीज करता आली असती. पण भारतीय संस्थेने तसे मनावर घेतले नाही व हालचालही केली नाही.

भारतीय मुष्टियुद्ध संस्थेला जर खरोखरीच भाग घ्यावयाचा असता तर सरकारच्या परवानगीपूर्वीच त्यांनी मोघम प्रवेश–अर्ज भरून पाठवून आपली जागा नक्की केली असती. पण भारतीय संस्थेला ते शक्य झाले नाही. सरकारवर ठपका ठेवणाऱ्या मुष्टियुद्ध संस्थेचे पितळ उघडे पडले हे एकंदरीत बरे झाले. पण दुःख होते ते याकरिताच की आशियायी स्पर्धेत आपण भाग घेऊ शकलो नाही !

**–मनोहर रेगे**

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## जानेवारी १९६८ चे भविष्य

**मेष** : शौर्य, जिद्द, सामर्थ्य, सौन्दर्य आणि प्रेम एवढी सारी सामग्री घेऊन नवे वर्ष तुम्हांस भेटण्यास येत आहे. त्याच्या स्वागतास सिद्ध राहा. तुमचं अधिकाधिक भलं करावं हीच त्याची आंतरिक तळमळ. प्रगती आणि प्रतिष्ठा, राजकीय मान्यता आणि व्यावसायिक उन्नती यांची तुमच्यावर आता खैरात होऊ लागेल. समाजातील अनंत हस्त तुमच्या सहकार्यासाठी पुढे होतील. प्रत्येक पाऊल पवित्र्यात पडू लागेल.

या माझ्या म्हणण्याचा दुसऱ्या पंधरवडयात आपणांस हातोहात प्रत्यय येऊ लागेल. अनेक समर्थ ग्रह तुमच्या लाभस्थानी वाटचाल करू लागलेले आहेत. ते तुम्हांला हवं ते देतील. तुमच्या साऱ्या अपेक्षा सफल करून जातील.

दि. २ ते ९, १९ ते २४, २९ ते ३१ घवघवीत यशदायक दिवस.

**वृषभ** : हे नवे वर्ष नव्या योजना घेऊनच उजाडत आहे. तुमच्यासारख्या कर्तव्यदक्ष व निष्ठावंत माणसांची त्याला नितांत गरज भासू लागेल.

पहिल्या पंधरवडयात फक्त विचार, योजना, ठराव, बैठका. दुसरा पंधरवडा सुरू होताच (दि. १४) आपल्या कल्पना आकार घेऊ लागतील, सारे काही अपेक्षेप्रमाणे घडत आहे, असा साक्षात्कार घडून यायला लागेल. दि. २० चा सूर्य-हर्षल त्रिकोण अलौकिक, अनन्यसाधारण असं काही आपल्या हातून घडवून आणील. कला-क्रीडा-साहित्य या क्षेत्रांत नवा इतिहास निर्माण करू शकाल. नोकरी-धंद्यांतही याच वेळी उत्क्रांती घडून यावी.

दि. ५ ते ९, १६ ते २२, २४ ते २९ या कालाचे स्मरण ठेवा.

**मिथुन** : आठवा मंगळ संपला आणि त्याच वेळी आपला सारा अनिष्ट काल इतिहासजमा झाला. प्रगतीच्या नव्या वाटा दिसू लागतील. कर्तृत्वाला उधाण

यायला लागेल. नवी रम्य क्षितिजे दिसू लागतील.

प्रवास–बदल असेही जानेवारीच्या दुसऱ्या पंधरवड्यात घडून यावे. बदली-बढतीचे योग कोणत्याही क्षणी यावेत. आजवरच्या तुमच्या साऱ्या परिश्रमांचे श्रेय आताच तुमच्या पदरी पडावे.

मंगळ भाग्यस्थानी आला की, आशा–आकांक्षा सफल झाल्याच म्हणून समजावे.

संशोधन क्षेत्रात, ग्रंथप्रकाशन व्यवसायात चांगलाच जम बसेल. सामाजिक पुढारीपणही लाभेल.

दि. ३ ते ९, १७ ते २२, २६ ते ३१ या काली अनेक योजना वेग घेऊ लागतील.

**कर्क :** आजवर मंगळ सातवा होता, आता तो आठवा झाला. यामुळे तुमच्या परिस्थितीत काही फरक पडेल असे नाही. त्याच अडचणी, त्याच व्यथाविवंचना. थोडाफार फरक फक्त तपशिलात. आपणांस गुरू अनुकूल आहे खरा पण तेवढ्या अनुकूलतेने सध्याचे सारे पेचप्रसंग सुटण्याची शक्यता फारच कमी.

दुसऱ्या पंधरवड्यात तर चिंता, अस्वस्थता, अनारोग्य यांना अगदी ऊत येईल– पण अनुकूल गुरू एवढेच करील की, आपली कुठेही अप्रतिष्ठा होऊ देणार नाही.

अशा काली जपून आणि सावधानतेने वागणे हाच एकमेव तोडगा. मित्र धोका देतील, नोकरचाकर फसवतील.

दि. ६ ते १२, १६ ते २२, २७ ते २९ या काली आपले परिश्रम वाया जाणार नाहीत इतकेच.

**सिंह :** तुमच्या सहवासात गुरू आला आहे. त्याच्या साहचर्याने दाही दिशा उजळून निघतील. साऱ्या वाटा लख्ख दिसू लागतील. केवळ पाऊल उचलायचा अवकाश अपेक्षित यश पदरी पडलेच म्हणून समजावे. इतका अनुकूल कौल ग्रहांनी यापूर्वी क्वचितच दिला असेल. मंगळ सातवा, शनी आठवा म्हणून तुम्हांला कुणी-तरी उगीचच भिववतील. अशा विघ्नसंतोषी लोकांच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नका. सरळ चला, निर्भयपणे वागा आणि जे हवं आहे ते मिळवून घ्या.

दुसरा पंधरवडा तुमच्या प्रगतीचा वेग खूपच वाढवील. जीवन म्हणजे बारीक-सारीक अडीअडचणी यायच्याच. पण अशा गोष्टींची दखल घ्यायला तुम्हांला वेळच कुठे आहे ?

राजकीय कार्यक्रमाची आखणी करावयाची आहे. नव्या व्यवसायधंद्याच्या योजना आखावयाच्या आहेत. अनंत कामे हातावेगळी करावयाची आहेत.

दि. ६ ते १२, १९ ते २३, २७ ते ३१ या दिवसांची नोंद ठेवा.

**कन्या :** या वेळचे ग्रहमान असे आहे की, तुमच्या मनातील वैषम्याची, वैफल्याची भावना साफ निघून जाईल. अपेक्षित यश पदरी पडावयास आता सहसा कोणत्याच

अडचणी येणार नाहीत. पहिला पंधरवडा यथातथाच. दुसऱ्या पंधरवड्यात मात्र जे कधी ध्यानी मनी नव्हते ते घडून येईल, अपेक्षित लाभ पदरी पडतील, प्रज्ञा विकसेल, प्रतिष्ठा उंचावेल. चारित्र्याला झळाळी चढेल.

मंगळ षष्ठात–तो तुमचा सारा विरोध मोडून काढील आणि प्रगतीचा मार्ग निर्वेध–निष्कंटक बनवील. दि. २० च्या सूर्य-हर्षल त्रिकोणात सारे लक्ष केंद्रित करा. तो हवं ते मिळवून देईल, अपेक्षेपेक्षाही अधिक.

दि. २ ते ६, ११ ते २१, २४ ते २८ या काली साऱ्या विवंचना मिटाव्यात.

**तूळ :** मंगळ चतुर्थातून पसार झाला. आता हायसे वाटू लागेल. हरवलेले स्वास्थ्य गवसण्याची लक्षणे दिसायला लागतील. अकराव्या गुरुला आता तुमच्यासाठी काही भरीव कार्य करण्याची संधी लाभेल.

तरीसुद्धा हा महिना संपूर्ण स्वास्थ्याचा, अपेक्षित लाभाचा नव्हेच. अगदीच नैराश्याचा नाही एवढेच.

पहिल्या पंधरवड्यात सूर्य पराक्रमस्थानी. थोडेफार यश धावपळ–धडपडीनंतर पदरी पडेल. दुसऱ्या पंधरवड्यात तीही शक्यता कमी. काहीसे जपून. थोरांच्या सल्ल्याने, विचाराने वागण्याची सतत गरज भासेल.

नोकरीधंद्यात ठीक चालेल. सामाजिक–राजकीय क्षेत्रात मात्र भाग घ्यायचे शक्यतो टाळा.

दि. ५ ते ८, १४ ते २२, २७ ते २९ या काली आपले प्रयत्न अगदीच वाया जाऊ नयेत.

**वृश्चिक :** तिसऱ्या मंगळाचा उत्साही काल संपला आणि चौथ्या मंगळाची भुण-भुण पाठीशी लागली. दशमातील गुरू मंगळाने विद्ध झालेला असल्याने त्याच्या भरंवशावरही अवलंबून राहण्यात अर्थ नाही. अशा या बेभरंवशी कालात तुम्हांला फारच जपून राहायला हवे.

अनारोग्याच्या कटकटी, स्थावराच्या, राहत्या जागेच्या भानगडी आणि नोकरी-धंद्यांत खोटेनाटे आरोप या सर्वांना निर्धाराने, धीराने तोंड द्यायची तयारी ठेवा. तुमच्या अनवधानपणाचा ते निश्चितच फायदा उठवतील. हाती घेतलेली कामे रेंगाळतील, पैसा दिसेनासा होईल, स्वास्थ्य बिघडेल.

दि. ५ ते ९, १५ ते २२, २६ ते २९ या काळी थोडेफार अपेक्षेप्रमाणे घडावे.

**धनू :** मंगळ पराक्रमात आला. आता तुम्हांला कुणाचीही डर नाही. भाग्यात गुरु, तृतीयात मंगळ. यामुळे एकाएकी स्थानांतर घडेल आणि त्यामुळे थोडीफार प्रगतीही होईल. न होणारी, रेंगाळलेली सारी कामे या वेळी झटपट निकालात निघतील. मंगळाला रेंगाळत चालणे, घोळ घालीत बसणे मंजूरच नाही. एक घाव दोन तुकडे हा त्याचा शिपाईबाणा व्यवहारातही प्रत्ययाला यायला लागेल.

राहत्या जागेची विवंचना मिटेल, यांत्रिक–तांत्रिक धंद्यातील पेचप्रसंग सुटायला लागतील, विरोधक मागील दाराने पसार होतील. मंगळाचा दवदबाच असा आहे की, कोणी विघ्नसंतोषी तुमच्या जवळपासही फिरकू शकणार नाही.

दि. ३ ते ९, १८ ते २३, २६ ते २९ या काळात अनेक समस्या सुटू लागतील.

**मकर :** कित्येक दिवसांची तुमच्या राशीतील मंगळाची उपस्थिती टळली आणि त्यामुळेच तुमची डोकेदुखी थांबली. चिंता, हुरहूर, काळजी हे सारे आपण आता विसरू शकता. पूर्णत्वाने नसले तरी थोड्याफार प्रमाणात तरी.

बाराव्या सूर्यामुळे पहिला पंधरवडा ओढाताणीचा, कटकटीचा, दुसरा पंधरवडा, विशेषत:, २० जानेवारीचा सूर्य-हर्षल योग तुमचे जीवन प्रसन्नतेने न्हाऊन काढील, ध्यानीमनी नाहीत अशा अनेक प्रगतीच्या व प्रतिष्ठा वाढविणाऱ्या घटना भराभर घडून यायला लागतील. असा योग कित्येक वर्षांनी घडत असतो आणि म्हणूनच तो काहीतरी अघटित, अनन्यसाधारण असे कार्य करून जातो.

दि. ५ ते १०, १९ चे २४, २७ ते २९ हे दिवस विशेष काही करून जातील.

**कुंभ :** मंगळ आता तुमच्या राशीत आला आहे. बाराव्या मंगळापेक्षा तो पुष्कळच बरा. शिवाय सूर्य अजून काही दिवस लाभस्थानी आहेच की. साराच जानेवारी महिना–विशेषत: पहिला पंधरवडा– तुमच्या अंगीकृत कार्यात उत्तुंग यश व अमाप लाभ देऊन जाईल.

दुसरा पंधरवडाही तसा अनिष्ट नाहीच. प्राप्तीचे मान थोडेफार मंदावेल इतकेच. गुरू-मंगळ तुम्हांला हवं ते साहाय्य करायला उद्युक्त आहेत.

नवा धंदा याच वेळी उभारला जाईल. कौटुंबिक जीवनात अत्यानंदाच्या घटना घडून येतील. परिस्थिती आशादायक दिसू लागेल. धनिकांचे हार्दिक साहाय्य कोणत्याही क्षणी लाभेल.

दि. ३ ते ९, १४ ते २१, २५ ते ३० या काळाचे महत्त्व प्रत्ययास यायला लागेल.

**मीन :** मंगळ बारावा आल्यामुळे थोडेफार खटकल्यासारखे जाणवेलही, पण त्यामुळे तुमच्या कार्याची गती काही मंदावणार नाही. सांपत्तिक खर्चाला थोडाफार आळा घालायचा प्रयत्न मात्र करायला हवा.

उद्योगधंद्याचे तंत्र थोडेफार बदलल्याशिवाय गत्यंतर नाही. शिवाय सहकाऱ्यांशी, भागीदारांशी जुळते-मिळते घेण्याची तयारी ठेवायला हवी. अपयश, अपेक्षाभंग असं काही घडणार नाही पण प्रत्येक गोष्टीत सावधानता अवश्य बाळगायला हवी.

दि. २० च्या सूर्य-हर्षल त्रिकोणावर सारे लक्ष केंद्रित करा. त्या कालाच्या घटना घडून याव्यात. या महिन्यात प्रवासाचे प्रकर्षाने टाळा.

दि. १ ते ३, १० ते २१, २६ ते २८ या वेळी काही महत्त्वाची कामे यशस्वी व्हावीत.

o

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649

चवथी सचित्र आवृत्ती

# राजा शिवछत्रपति

**ब. मो. पुरंदरे**

**मूल्य : रुपये बेचाळीस फक्त**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.